# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड शनिवार । दि. ८ ऑगस्ट २०२६ । अंक ६३ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## मिसिंग लिंक बोगद्यात भीषण अपघात

**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकच्या सुमारे नऊ किलोमीटर लांबीच्या बोगद्यात शुक्रवारी पहाटे दीडच्या सुमारास फॉर्च्युनर कार आणि मालवाहू टेम्पोची भीषण धडक झाली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाला आहे. फॉर्च्युनरमधील अन्य तिघे जण सुखरूप बचावले. पुण्याहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या फॉर्च्युनर (एमएच १४ एमजी ०००७) ने मुंबईकडे भाजीपाला वाहतूक करणाऱ्या मालवाहू टेम्पोला पान ५ वर

## राफ्टिंगच्या थरारात तरुणाचा मृत्यू

**रोहा :** कोलाड येथील धगडवाडी परिसरात रिव्हर राफ्टिंगदरम्यान झालेल्या दुर्घटनेत मुंबईतील तरुण पर्यटक मनोज अमर नाथ याचा मृत्यू झाल्याच्या घटनेला आता गंभीर वळण मिळाले आहे. या दुर्घटनेमागे केवळ अपघात नसून, घातपाताचा संशय असल्याचा गंभीर आरोप मृत तरुणाची आई जानकीदेवी अमर सिंह नाथ यांनी केला आहे. संबंधित रिव्हर राफ्टिंग कंपनी, रिसॉर्ट, आयोजक, प्रशिक्षक आणि इतर जबाबदार व्यक्तींविरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री, पान ५ वर

## वेधक

### मुख्यमंत्र्यांच्या कौटुंबिक वादावर अखेर पडदा

**नवी दिल्ली :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि लोकप्रिय अभिनेते सी. जोसेफ विजय यांच्या कौटुंबिक वादावर अखेर पडदा पडला आहे. विजय यांची पत्नी संगीथा यांनी चेंगलपट्टू येथील कौटुंबिक न्यायालयात दाखल केलेली घटस्फोटाची याचिका शुक्रवारी अधिकृतपणे मागे घेतली आहे. या निर्णयामुळे राजकीय तसेच चित्रपट वर्तुळात रंगलेल्या विविध चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. शुक्रवारी या प्रकरणाची सुनावणी झाली असता, संगीथा यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजेरी लावली. आपल्याला हा खटला पुढे चालवायचा नाही आणि याचिका मागे घ्यायची आहे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी न्यायालयासमोर मांडली.

### कर्जमाफीचा पहिला हप्ता वितरीत

**मुंबई :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेचा पहिला टप्पा सुरू करत तब्बल ६.२२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२९ कोटी रुपयांची रक्कम जमा केली आहे. शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका क्लिकद्वारे ही रक्कम संबंधित बँकांच्या कर्जखात्यांमध्ये हस्तांतरित केली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, योजनेची पहिली यादी सर्व ग्रामपंचायतींना पाठवण्यात आली होती. शेतकऱ्यांना कोणताही अर्ज भरावा लागला नाही. केवळ आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या कर्जखात्यात थेट लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची कर्जखाती पूर्णपणे निल झाली आहेत.

### मोटारसायकलस्वार कारच्या धडकेत जखमी

**महाड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाडजवळील वहूर गावाजवळ सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मुंबईकडून महाडकडे येणाऱ्या कारने मोटारसायकलस्वाराला पाठीमागून दिलेल्या धडकेमध्ये मोटारसायकलस्वार जखमी झाला असून, त्याला वैद्यकीय उपचारासाठी महाड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. महामार्गावर महाडजवळील वहूर गावाजवळ सायंकाळी पाचच्या सुमारास मुंबईकडून महाड बाजूकडे येणाऱ्या एम.एच. ०१.इ.आर. ९८६६ या टाटा कंपनीच्या पंच कार चालकाने वेगाने वाहन चालवून महाड बाजूस जाणाऱ्या एम.एच. १२ के.एक्स. १७९७ होंडा पान ५ वर

# कांदळवनाचा शेतीवर कब्जा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यातील शेतीमध्ये उधाणाचे पाण शिरून भातशेती नापिक होण्याचे संकट वाढले आहे. जिल्ह्यातील अकरा हजार हेक्टर जमीन कांदळवनाखाली गेली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या कोंडीमध्ये सापडला आहे. भातशेतीसह इतर पिके घेणे जिकिरीचे बनले आहे. त्यामुळे सरकारने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या या प्रश्नांवर गांभीर्याने लक्ष देऊन त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे शेतकरी संघ समितीचे चिटणीस अनिल पाटील यांनी केली आहे.**



एकेकाळी रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. भातपीक लागवड करून येथील शेतकरी त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होता. मात्र, जिल्ह्यामध्ये गेल्या काही वर्षात औद्योगिकीकरण आणि नागरीकरण तसेच सिंचनाचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे भातशेतीचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होऊ लागले. एक लाख २४ हजार हेक्टर असलेली भातशेती आता सुमारे ८३ हजार हेक्टरवर आली आहे.

रायगड जिल्ह्याला २४० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. समुद्रातील उधाणाचे पाणी शेतांमध्ये शिरण्याचे संकट वाढत आहे. शेतजमीन संरक्षणाचे असलेले बांध फुटून खारे पाणी शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील भातशेती नापीक होण्याचे संकट वाढू लागले आहे. त्यामुळे खारेपाटात कांदळवनाचा प्रश्न गंभीर झाला आहे. हजारो एकर जमीन नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. पिकत्या जमिनीवर कांदळवनांनी विळखा घातल्याने शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीच्या सात बारा उताऱ्यावर खासगी वने अथवा महाराष्ट्र शासनाचे शिक्के बसविले जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे शेतीचे असलेले अधिकार नष्ट होत आहे. शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन सरकार जमा होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ ही घेता येत नाही.

रायगड जिल्ह्यातील अकरा हजार हेक्टर जमीन कांदळवनाखाली असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या कोंडीमध्ये पान ५ वर

- **अकरा हजार हेक्टर जमीन कांदळवनाखाली**
- **जिल्ह्यातील असंख्य शेतकरी संकटात**
- **भातशेतीसह इतर पिके घेणे बनले जिकिरीचे**

> खारेपाटातील कांदळवनाचा प्रश्न मोठा आहे. समुद्राचे खारे पाणी शेतांमध्ये शिरत आहे. त्यामुळे भातशेती नापीक होत आहे. समुद्रातील उधाणामुळे मातीचा बंधारा फुटून बंधाऱ्यांना खांडी जातात. हजारो एकर जमिनीवर या खाऱ्या पाण्याचा परिणाम होतो. खारलँड विभागाकडून याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड हानी होते.
>
> – अनिल गोमा पाटील, अलिबाग तालुका शेतकरी आघाडी प्रमुख

# मंत्री, लोकप्रतिनिधींनो, दिखावेगिरी बंद करा!

**। पेण । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव जवळ आला की मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पाहण्यांचा, बैठकींचा आणि घोषणांचा सिलसिला सुरू होतो. मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी महामार्गाची पाहणी करतात, विकासाच्या गप्पा रंगतात, आश्वासनांची खैरात होते; मात्र महामार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या लाखो नागरिकांच्या नशिबी आजही खड्डे, वाहतूक कोंडी, धोकादायक वळणे आणि जीवघेणा प्रवासच येत असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.

याच पार्श्वभूमीवर एक अनोखी पण वास्तववादी मागणी पुढे आली आहे. यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची पाहणी करणाऱ्या सर्व मंत्री, अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी किमान एकदा तरी महाराष्ट्र शासनाच्या लालपरीने (एसटी बस) या मार्गावर प्रवास करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

वातानुकूलित आलिशान वाहनांच्या बंद काचांमधून महामार्गाचे वास्तव दिसत नाही. रस्त्यावरील प्रत्येक खड्डा, प्रत्येक धक्का, तासन्तास सुरू असलेली वाहतूक कोंडी, अपूर्ण सेवा रस्ते आणि नागरिकांचा रोजचा संघर्ष याची खरी जाणीव फक्त एसटी बसमधून प्रवास केल्यावरच होऊ शकते, असेही सांगण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवापूर्वी महामार्गाच्या पाहण्या होतात, बैठका घेतल्या जातात आणि कामे लवकर पूर्ण करण्याची आश्वासने दिली जातात. मात्र, प्रत्यक्षात परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. त्यामुळे यंदा तरी केवळ पाहण्या आणि घोषणांपुरते मर्यादित न राहता, लोकप्रतिनिधींनी सामान्य नागरिकांसोबत एसटीने प्रवास करून वास्तव अनुभवावे, अशी पान ५ वर

# पीक विम्याकडे शेतकऱ्यांची पाठ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

खरीप हंगामातील भात व नाचणी पिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेला रायगड जिल्ह्यात अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. ३१ जुलैपर्यंत १५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी अपेक्षित असताना अवघ्या ६ हजार शेतकऱ्यांनीच योजनेत सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे विमा कंपनी आणि कृषी विभागासमोर उद्दिष्ट पूर्ण करण्याचे आव्हान निर्माण झाले असून, आता १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ मिळाल्याने नोंदणीला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



- **३१ जुलैपर्यंत केवळ सहा हजार शेतकऱ्यांचा सहभाग**
- **मुदतवाढीनंतर १० ऑगस्टपर्यंत पुन्हा संधी**

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना यंदाही खरीप हंगामात लागू करण्यात आली आहे. मात्र, रायगड जिल्ह्यात या योजनेला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळालेला नाही. ३१ जुलैपर्यंत केवळ ६ हजार शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी नोंदणी केली असून, सुरुवातीचे १५ हजार शेतकऱ्यांचे उद्दिष्ट अपूर्ण राहिले आहे. रायगड जिल्ह्यात पान ५ वर

### आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड, नमुन्यातील अर्ज, पेरणीचे स्वयंघोषणापत्र, ई-पीक पाहणी नोंद, ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक, बँक पासबुक, भाडेपट्टा करार (लागू असल्यास).

योजनेवर दृष्टिक्षेप

अपेक्षित नोंदणी : १५,००० शेतकरी

३१ जुलैपर्यंत प्रत्यक्ष नोंदणी : ६,००० शेतकरी

विमा संरक्षित क्षेत्र : २,३७० हेक्टर

नोंदणीची वाढीव अंतिम मुदत : १० ऑगस्ट

भात विमा संरक्षण : ६५,००० रु. प्रति हेक्टर

नाचणी विमा संरक्षण : ४०,००० रु. प्रति हेक्टर

# पूल चोरीतील आरोपी आता वनगे मारहाणीतही!

## रणजीत दळवी चौथा आरोपी । ८० हजार, पाच तोळ्यांची चेन लुटल्याचा आरोप

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणमध्ये गाजलेल्या पूल चोरी प्रकरणानंतर आता उद्योजक मयूर वनगे यांच्यावरील कथित मारहाण, चोरी आणि जीवे मारण्याच्या धमकीच्या प्रकरणामुळे पुन्हा एकदा रणजीत दळवी याचे नाव चर्चेत आले आहे. वनगे प्रकरणात रणजीत दळवी हा आरोपी क्रमांक चार असून, त्याच्यासह मंगेश दळवी, हरेश दळवी आणि रुपेश दळवी यांच्यावर गंभीर आरोप आहेत. यातील आरोपी अद्याप



पोलिसांच्या हाती लागले नसल्याची माहिती असून, ते लपून बसल्याची चर्चा पेणमध्ये जोर धरू लागली आहे.

रणजीत दळवी याचे नाव यापूर्वी पेणमध्ये गाजलेल्या पूल चोरी प्रकरणात समोर आले होते. या प्रकरणात दोन पूल अपहार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला होता. संबंधित प्रकरणात रणजीत दळवी याने पोलिसांसमोर कबुली दिल्याचेही सांगितले जाते. पान ५ वर

# राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष बदला

## प्रशांत किशोर यांचा सुनेत्रा पवारांना सल्ला



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशातील नामवंत राजकीय रणनीतीकार आणि बिहारचे आमदार प्रशांत किशोर यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घेतलेली भेट चर्चेचा विषय ठरली. मुंबईतील देवगिरी या शासकीय निवासस्थानी तब्बल सहा तास चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत प्रशांत किशोर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. "भविष्यात मी निवडणूक रणनीतीकार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेससोबत काम करावे असे वाटत असेल, तर राज्यातील विद्यमान नेतृत्व आणि प्रदेशाध्यक्ष पदाबाबत तातडीने निर्णय घ्या," असा सल्ला प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा पवार यांना दिल्याचे समजते.

बिहारमधील बांकीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या उमेदवाराचा पराभव करून प्रत्यक्ष राजकारणात आपला करिश्मा सिद्ध केल्यानंतर प्रशांत किशोर हे पहिल्यांदाच मुंबईत दाखल झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते खासदार पार्थ पवार हे स्वतः विशेष विमानाने प्रशांत किशोर यांना दिल्लीहून मुंबईत घेऊन आले होते. पान ५ वर

## सव्वातीन लाखांचा दारुसाठा जप्त

**पोलादपूर :** गटारी अमावास्येच्या पार्श्वभूमीवर अवैध मद्यविक्रीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने पोलादपूर तालुक्यात धडक कारवाई करत गोवा बनावटीच्या मद्याचा तब्बल ३ लाख २५ हजार रुपयांचा साठा जप्त केला. दिविल आणि कापडे बुद्रुक येथे करण्यात आलेल्या या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून, एक आरोपी फरार झाला आहे.राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत विदेशी मद्याचे २४ बॉक्स आणि गोवा बनावटीच्या देशी मद्याचे १५ बॉक्स असा मोठा साठा जप्त करण्यात आला. गटारी अमावास्येच्या काळात अवैध मद्याची पान ५ वर




**गणेशोत्सवासाठी एसटीच्या तब्बल ५,२२० जादा बसेस** | **चाकरमान्यांचा कोकण प्रवास होणार सुखकर**

# कोकणवासियांना बाप्पा पावला!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच मुंबई, ठाणे, पालघर आणि परिसरातील चाकरमान्यांना कोकण गाठण्याची लगबग सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने कोकणवासियांसाठी मोठी घोषणा केली असून, गणेशोत्सवात तब्बल ५ हजार २२० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी आणि उत्सवासाठी गावाकडे जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असून, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत जादा बसेस विविध कोकण मार्गांवर धावणार आहेत, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



गणेशोत्सवाच्या जादा वाहतुकीच्या नियोजनासाठी एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या आढावा बैठकीत मंत्री सरनाईक यांनी पान ५ वर

### १० ऑगस्टपासून गट आरक्षण

किमान ४० प्रवाशांच्या गटासाठी १० ऑगस्टपासून गट आरक्षणाची सुविधा सुरू होणार आहे. गट आरक्षणामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के भाडेसवलत, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के भाडेसवलत लागू राहणार आहे. जादा बसेसचे आरक्षण एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर, बसस्थानकांवर तसेच अधिकृत भ्रमणध्वनी अनुप्रयोगाद्वारे करता येणार आहे. यामुळे चाकरमान्यांची सोय होणार आहे.

### महामार्गावर दुरुस्ती पथके

गणेशोत्सवाच्या गर्दीत वाहतूक सुरळीत राहावी यासाठी प्रमुख बसस्थानके आणि थांब्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. कोकणातील प्रमुख महामार्गांवर आवश्यक ठिकाणी वाहनदुरुस्ती पथकेही तैनात करण्यात येणार आहेत.

# टीबीमुक्त बारा ग्रामपंचायतींचा गौरव

| आगरदांडा | प्रतिनिधी |

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन-२०२५ मध्ये टीबीमुक्त घोषित झालेल्या मुरूड तालुक्यातील बारा ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला. हा सोहळा मुरुड पंचायत समितीमधील महाराष्ट्र भुषण आ. डॉ.ति.श्री. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात येथे पार पडला.

यावेळी पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम, गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षय सोळंके, कोर्लई ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री मिसाळ, औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत, विजय वाघमारे, शालीकराव पावरा, मयुर पाटील, आरोग्य सेवक राजेंद्र चुनेकर यांच्यासह आरोग्य विभागाचे कर्मचारी, ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सन-२०२५ मधील कामगिरीच्या आधारे कोर्लई, नांदगाव आणि वेळास्ते या ग्रामपंचायतींना गोल्ड श्रेणी, मजगाव, साळाव आणि तेलवडे यांना सिल्व्हर श्रेणी, काकळघर, मिठेखार, सावली, तलेखार, वावडूंगी आणि वळके या ग्रामपंचायतींना ब्राँझ श्रेणी या ग्रामपंचायतींना सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम व पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांच्या हस्ते प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी तालुका आरोग्य विभागाने उपस्थितांना 'निक्षयमित्र' बनून क्षयरुग्णांना पोषण व मानसिक आधार देण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत सभापती निलेश घाटवळ व कोर्लई ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री मिसाळ यांनी पाच क्षयरुग्ण दत्तक घेण्याची घोषणा केली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षय सोळंके यांनी क्षयरोगाची लक्षणे, उपचारपद्धती आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत मार्गदर्शन केले. उपस्थितांनी टीबीमुक्त मुरूड तालुका घडविण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.




**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे**
**पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती जाहिरात- २०२६**

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांच्या आस्थापनेवरील शासकीय आश्रमशाळेतील पेसा/ नॉनपेसा क्षेत्रातील रिक्त असलेली प्राथमिक शिक्षक (शिक्षण सेवक), माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) व उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) या संवर्गातील पदे पवित्र पोर्टलद्वारे १०० टक्के भरणेकरिता खालील नमूद केलेल्या पदापैकी शैक्षणिक व व्यावसायिक अहर्ता धारण करीत असलेल्या पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अहर्ता | विषय | ठाणे (पेसा) | पुणे (पेसा) | पालघर (पेसा) | ठाणे विभाग (नॉन पेसा) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) | एच.एस.सी. डी. एड | सर्व विषय | २६ | ९ | ८९ | १८४ | ३०८ |
| २ | प्राथमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) | एच.एस.सी. डी. एड | सर्व विषय | ७ | ० | २ | २१ | ३० |
| ३ | माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) | बी.ए.बी.एड बी.एस्सी बी.एड. | मराठी व इतर, गणित, विज्ञान, इंग्रजी | ८ | २ | ४४ | ९७ | १५१ |
| ४ | माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) | बी.ए.बी.एड. बी. एस्सी बी.एड. | मराठी व इतर, गणित, विज्ञान, इंग्रजी | २ | ० | ० | ६ | ८ |
| ५. | उच्च माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) | एम.ए.बी.एड एम.एस्सी. | मराठी, इंग्रजी, इतिहास / राज्यशास्त्र, भूगोल/अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र | १० | १ | ५३ | ५२ | ११६ |
| | एकूण | | | ५३ | १२ | १८८ | ३६० | ६१३ |

वरील जागा हया अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विमाप्र इमाव, ई.डब्ल्यू.एस, एसईबीसी, अराखीव यानुसार समांतर व सामाजिक आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी https://tait२०२५.mahateacherrecruitment.org.in उमेदवारांना प्राधान्यक्रम Generate करण्याची सुविधा दिनांक ०६/०८/२०२६ पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच प्राधान्यक्रम Lock करण्यासाठी दिनांक ०६/०८/२०२६ ते ११/०८/२०२६ असा कालावधी देण्यात येत आहे.

आदिवासी विकास विभागातील अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील प्राथमिक शिक्षक (शिक्षण सेवक), माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) व उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) संवर्गाची सविस्तर जाहिरात आदिवासी विकास विभागाच्या https://tribal.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ठिकाण :- ठाणे
दिनांक :- ०७/०८/२०२६

(स्वाक्षरी/-)
**(गोपिचंद कदम, भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.**

**विमाका/कोवि/२०२६-२७/७२**

**e-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-24/26-27 7000041042 | Replacement of existing battery set by new conventional SAN type battery sets at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 5900/-+GST** | **Rs. 178.84 Lakhs Including GST.** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 07.08.2026 at 11:00 Hrs. to 17.08.2026 up to 15:00 hrs, Opening date:- 17.08.2026 @15:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Mobile No. 8412050202, E-mail ID: se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## नौशाद काझी यांचे निधन

**माणगाव :** तालुक्यातील लोणशी मोहल्ला येथील नौशाद अजीज काझी यांचे गुरुवारी (दि.६) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ४८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शोक व्यक्त केला जात आहे.

जय भवानी //श्री// जय शिवाजी

**जय भवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अलिबाग**
अलिबाग- रायगड
नोंदणी क्रमांक: आरजीडी/एबीजी/आर एस आर/सी आर ३०९ दि. ०६/०६/१९९२

जा.क्र. ४३/ज.ना.स.प./ऑगस्ट २०२६ दि. ०७/०८/२०२६

३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

मा.श्री./श्रीमती. ..........................................................

सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता हॉटेल सन्मान, पहिला मजला पी.एन.पी नाट्यगृह जवळ, रेवदंडा बायपास रोड चेंढरे अलिबाग येथे मा. ॲड. मिलिंद गजानन चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली कार्यसुची तालिकेप्रमाणे कामकाजाचा विचार विनिमय करण्यासाठी घेण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**-: कार्यसुची :-**

१) संस्थेचे दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचुन मंजुर करणे.
३) दि. ३१/०३/२०२६ रोजीचे वार्षिक ताळेबंद व नफा - तोट्यांचा हिशोब वाचुन त्यास मंजुरी घेणे.
४) दि. ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या व्यवस्थापक समितीने शिफारस केलेल्या नफा वाटणी प्रस्तावास व लाभांश वाटपास मंजुरी देणे.
५) पुढील वर्षाकरिता अंतर्गत व वैधानिक लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे व मेहनताना ठरविणे.
६) सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) ३१/०३/२०२६ अखेरचा शासकिय लेखा परिक्षकांचा अहवाल वाचन.
८) संस्थेचे कार्यक्षेत्र अलिबाग तालुका मर्यादीत असून ते रायगड जिल्हा कार्यक्षेत्र वाढीबाबत विचार विनिमय करून मा. निबंधकांस प्रस्ताव सादर करावे.
९) सभासदांना प्रशिक्षण देणे.
१०) नागरी/सहकारी, बिगर शेती सहकारी संस्था सुधारित उपविधी स्विकारण्याकरिता विचार विनिमय करून मंजुर करणे.
११) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे.

कार्यकारी मंडळाचे आदेशाने

**अलिबाग** सचिव
दि. ०७/०८/२०२६ **श्री. मंगेश दामोदर म्हात्रे**
जय भवानी नागरी सहकारी पत मर्या. अलिबाग

**विशेष सुचना -**
१. वरील सभा पुरेशी गणसंख्ये अभावी तहकुब झाल्यास अशी तहकुब सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी नियत वेळेच्या अर्ध्या तासानंतर भरेल व या सभेस पुरेशी गणसंख्या नसली तरी वरीलप्रमाणे कामकाज चालेल.
२. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा प्रश्न विचारायचे असल्यास अथवा ठराव मांडायचा असल्यास त्याने लेखी सुचना दि. १४/०८/२०२६ पर्यंत व्यवस्थापकांकडे देणे.

ॲड. सागर जनार्दन वदे मोबाईल नंबर ८४४६ २६७५२१

**जाहिर नोटीस** निशाणी नं ८/ड
दिवाणी चौ.अर्ज नंबर १३५/२०२६
नेता - ०९/०९/२०२६

**कर्जत येथिल मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१. श्री. निलेश पंढरीनाथ भोपी
वय -३८ वर्षे व्यवसाय मोलमजुरी
रा - घर नं १९०१/डी. मानीवली
ता कर्जत, जि रायगड- ४१०१०१
२. रविंद्र पंढरीनाथ भोपी
वय - ४८ वर्षे व्यवसाय मोलमजुरी
रा- घर नं ७८, विठ्ठल मंदिर, मोठे भींगार,
आजिवली महाराष्ट्र ४१०२२१
३. सारिका संतोष भोपी
वय ४८ वर्षे व्यवसाय गृहिणी
रा. मानिवली, ता कर्जत, जि रायगड -४१०१०१
४. मेघना समीर वायले
वय-२२ वर्षे व्यवसाय - गृहिणी
रा- मु. नेवाली, पो. मांगरूल, अर्जदार
ता अंबरनाथ, जि रायगड -४२१३०१

विरूद्ध

सामनेवाला कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरील चौकशी अर्जामधील अर्जदार क्रमांक १ व २ यांची आजी व अर्जदार क्रमांक ३ यांची आजीसासु तसेच अर्जदार क्रमांक ४ यांची पणजी कै. आनंदीबाई गणपत भोपी या दिनांक ०४/०६/२००४ रोजी मौजे : बदलापुरगाव ता. अंबरनाथ जि ठाणे येथे मयत झालेले आहेत. त्यांची मौजे कळंब ता. कर्जत जि. रायगड येथे १) सर्व्हे नंबर २५ हिस्सा नंबर २ क्षेत्र ०.४१.५० हे. आर. पॉ. आकार ०.२२ रू. पै. २) सर्व्हे नंबर १५० हिस्सा नंबर ३ क्षेत्र ०.०९.०० हे. आर. पॉ. आकार ०.०९ रू. पै, ३) सर्व्हे नंबर १६४ हिस्सा नंबर १ क्षेत्र ०.५८.०० हे. आर. पॉ आकार ०.७३ रू. पै, ४) सर्व्हे नंबर १६४ हिस्सा नंबर ६ क्षेत्र ०.१५.०० हे. आर. पॉ. आकार ०.११ रू. पै., ५) सर्व्हे नंबर १७० हिस्सा नंबर १ क्षेत्र ०.७८.८० हे. आर. पॉ. आकार ७.६२ रू. पै, ६) सर्व्हे नंबर १७१ हिस्सा नंबर १ क्षेत्र ०.८९.०० हे. आर. पॉ. आकार ५.०० रू. पै, ७) सर्व्हे नंबर १८ हिस्सा नंबर १ क्षेत्र ०.६६.८० हे. आर. पॉ. आकार ५.८७ रू. पै. ८) सर्व्हे नंबर १८१ हिस्सा नंबर ४ क्षेत्र ०.७३.४० हे. आर. पॉ. आकार ८.३२ रू.पै अशा वर्णनाच्या वैयक्तिक आणि सामाईक जमिन मिळकती आहेत.

सदर अर्जदार यांनी या मे. न्यायालयात वारस दाखला मिळणेकरीता चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. आनंदीवाई गणपत भोपी यांच्या वारसांबाबत हरकत व तक्रार असल्यास ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह या मे न्यायालयात हजर व्हावे अन्यथा सदरील अर्जदार १. श्री. निलेश पंढरीनाथ भोपी २. रविंद्र पंढरीनाथ भोपी ३. सारिका संतोष भोपी ४. मेघना समीर वायले हे यांचे कायदेशीर वारस आहेत असे समजून सदरील अर्जदार यांस मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे. आज दिनांक ०७/०८/२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कर्जत
को.दा.ता.

सही/- सही/-
**कनिष्ठ लिपिक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय कर्जत** **दिवाणी न्यायालय कर्जत**

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात**
**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५** मान्य दिनांक: १४/०६/२०२६
प्रसिद्धी दिनांक : ०६/०८/२०२६

संस्थेचे नाव ( 2724E001 ) Education Officer Primary RAIGARH (Primary) Without Interview
शैक्षणिक स्तर Primary
Education Officer Primary RAIGARH या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | १९ | १० | ६ | ३ | १ | ३ | २२ | ६४ |
| २ | अनु. जमाती | ३१ | १५ | १० | ५ | २ | ५ | ३४ | १०२ |
| ३ | अनु. जमाती (pesa) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | वि.जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भ.ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | भ.ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | इ.मा.व | १८ | ९ | ६ | ३ | १ | ३ | २१ | ६१ |
| ९ | वि.मा.प्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | ई.डब्लू. एस | ८ | ४ | ३ | १ | १ | १ | ९ | २७ |
| ११ | एसईबीसी | १५ | ७ | ५ | २ | १ | २ | १७ | ४९ |
| १२ | खुला | ५५ | २७ | १८ | ९ | ४ | ९ | ६० | १८२ |
| | | दिव्यांग (४%) | | | | | | | |
| | | | | | Intellectual Disability & Multpile Disability (1%) | | | | एकूण |
| | | अस्थिव्यंग (१%) ४ | कर्णबधिर (१%) ४ | अंध/अल्पदृष्टी (१%) ४ | ID ४ | MD ३ | | | १९ |
| | | अनाथ (१%) | | | | | | | |
| | | अनाथ संस्थात्मक ३ | अनाथ संस्थाबाह्य २ | | | | | | एकूण ५ |
| १३ | एकूण | १४६ | ७२ | ४८ | २३ | १० | २३ | १६३ | ४८५ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील मान्य दिनांक: १४/०६/२०२६

| अ.क्र | माध्यम | पद | वेतनश्रेणी/मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Marathi | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay-UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper 1 | 485 |
| | | | | | | | | | Total | 485 |

सर्वसाधारण सूचना :

१ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.
२ इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करून पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३ इ.१ली ते इ ५ वी व इ. ६ वी ते इ ८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२५ (TAIT) परीक्षेपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/ CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करू शकतील.
४ इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५ इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील विज्ञान/गणित/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET / CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६ इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यांपैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७ इ १ली ते ८ वी/इ. ९वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२५ (TAIT) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.
८ शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये 'उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना' या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करून स्वतःची खात्री करूनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९ व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
१० व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
११ व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शवलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२ उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयामध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३ जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१/०६/२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
१४ महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, दि. २६/०२/२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)** **मुख्यकार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग** **रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात**
**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५** मान्य दिनांक: १४/०६/२०२६
प्रसिद्धी दिनांक : ०६/०८/२०२६

संस्थेचे नाव ( 2724E001 ) Education Officer Primary RAIGARH (Primary) Without Interview
शैक्षणिक स्तर Primary
Education Officer Primary RAIGARH या व्यवस्थापनच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अनु. जमाती | ४ | २ | १ | १ | ० | १ | ४ | १३ |
| ३ | अनु. जमाती (pesa) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | वि.जा.(अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ५ | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६ | भ.ज. (क) | १ | १ | ० | ० | ० | ० | ३ | ५ |
| ७ | भ.ज. (ड) | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ८ | इ.मा.व | ३ | १ | १ | ० | ० | ० | ५ | १० |
| ९ | वि.मा.प्र | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| १० | ई.डब्लू. एस | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | दिव्यांग (४%) | | | | | | | |
| | | | | | Intellectual Disability & Multpile Disability (1%) | | | | एकूण |
| | | अस्थिव्यंग (१%) १ | कर्णबधिर (१%) ० | अंध/अल्पदृष्टी (१%) ० | ID ० | MD ० | | | १ |
| | | अनाथ (१%) | | | | | | | |
| | | अनाथ संस्थात्मक ० | अनाथ संस्थाबाह्य ० | | | | | | एकूण ० |
| १३ | एकूण | ११ | ४ | २ | १ | ० | १ | १६ | ३५ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील मान्य दिनांक: १४/०६/२०२६

| अ.क्र | माध्यम | पद | वेतनश्रेणी/मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Urdu | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay-UGT (16000) | Aided | All Subjects | Urdu | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper 1 | 35 |
| | | | | | | | | | Total | 35 |

सर्वसाधारण सूचना :

१ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.
२ इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करून पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३ इ.१ली ते इ ५ वी व इ. ६ वी ते इ ८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२५ (TAIT) परीक्षेपूर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/ CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करू शकतील.
४ इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५ इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील विज्ञान/गणित/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET / CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६ इ. ६ वी ते इ. ८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यांपैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper-2 / CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७ इ १ली ते ८ वी/इ. ९वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२५ (TAIT) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.
८ शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये 'उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना' या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करून स्वतःची खात्री करूनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९ व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
१० व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकूण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
११ व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शवलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२ उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयामध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३ जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१/०६/२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
१४ महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, दि. २६/०२/२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)** **मुख्यकार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग** **रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

## ‘देवाची कृपा आम्हावर, कोळ्यांना पोसतोय समिंदर’

# रेवदंडा बाजारात ताज्या मासळीची रेलचेल

## दोन महिन्यांच्या बंदीनंतर भरघोस मच्छी जाळ्यात

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

‘देवाची कृपा आम्हावर, कोळ्यांना पोसतोय समिंदर’, ‘मी डोलकर... डोलकर... डोलकर दर्याचा राजा’ अशी पारंपरिक कोळीगीते गुणगुणत रायगड किनारपट्टीवरील मच्छिमार पुन्हा नव्या जोमाने समुद्रात उतरले आहेत. दोन महिन्यांच्या मासेमारी बंदीनंतर समुद्रात पुन्हा नौकांची वर्दळ वाढली असून रेवदंडा बाजारपेठेत ताज्या मासळीची रेलचेल पाहायला मिळत आहे. बोंबील, कोळंबी, मांदेली, चिवणी यांसारख्या माशांची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने खवय्यांचीही चंगळ झाली आहे. सरकारी नियमांनुसार १ जून ते ३१ जुलै या कालावधीत खोल समुद्रातील मासेमारीवर बंदी घालण्यात आली होती. या काळात केवळ बिगर यांत्रिकी नौकांनाच किनारपट्टी व खाडी परिसरात मासेमारीची परवानगी होती. परिणामी बाजारात मासळीची आवक घटली होती आणि दरही वाढले होते.





मात्र १ ऑगस्टपासून बंदी उठल्यानंतर मच्छिमारांनी पुन्हा समुद्र गाठला असून बाजारात ताज्या मासळीची भरभरून आवक सुरू झाली आहे. रेवदंडा बाजारपेठेत सध्या बोंबील, कोळंबी आणि मांदेलीला मोठी मागणी आहे. घरगुती ग्राहकांसह खानावळी, उपाहारगृहे आणि हॉटेल व्यावसायिकही मोठ्या प्रमाणावर मासळी खरेदी करत आहेत. काही दिवसांपूर्वी महाग झालेली मासळी आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आली असून ग्राहकांचा ओढा वाढताना दिसत आहे.

दरम्यान, बंदी संपल्यानंतरही अद्याप सर्व नौका समुद्रात उतरलेल्या नाहीत. सध्या केवळ सुमारे ३० टक्के नौकाच मासेमारीसाठी रवाना होत आहेत. अनेक नौकामालकांसमोर खलाशांचा प्रश्न उभा ठाकला आहे. जिल्ह्यातील अनेक नौकांवर उत्तर प्रदेश, बिहार आणि छत्तीसगडमधील खलाशी काम करतात. बंदीच्या काळात हे खलाशी आपल्या गावी गेले होते. त्यांपैकी अनेक जण अद्याप परतले नसल्याने नौकामालकांना प्रतीक्षा करावी लागत आहे.पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याने समुद्रही तुलनेने शांत झाला आहे. त्यामुळे मच्छिमारांच्या चेहऱ्यावर समाधान तर खवय्यांच्या ताटात ताजी मासळी दिसू लागली आहे.

मासेमारीवरील बंदी संपल्यानंतर आम्ही पुन्हा समुद्रात उतरलो आहोत. मात्र, पावसाळा पूर्णपणे संपलेला नसल्याने फार दूरवर जाऊन मासेमारी करत नाही, असे बाबल्या चौलकर आणि खुशाल चौलकर यांनी सांगितले.

गेल्या दोन महिन्यांपासून समुद्र खवळलेला होता आणि मासेमारीवर बंदी असल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. आता किनारपट्टीवर पुन्हा मासेमारी सुरू झाल्याने आमच्या पोटापाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागला आहे, अशी भावना चेतना कोळीण यांनी व्यक्त केली. दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर पुन्हा एकदा समुद्राने कोळी बांधवांच्या जाळ्यात भरभरून दान टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे मच्छिमारांच्या खिशात पैसे खुळखुळू लागले असून रेवदंडा किनारपट्टीवर पुन्हा एकदा मत्स्यव्यवसायाला चैतन्याचे दिवस परतल्याचे चित्र दिसत आहे.

> बंदीच्या काळात नौकांची डागडुजी आणि जाळ्यांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली. आता समुद्रात कोळंबी, मांदेली आणि बोंबील मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने मच्छिमारांना चांगला दिलासा मिळत आहे.
> – गणेश भांजी नाखवा
> मच्छिमार

**सध्याचे मासळीचे दर**

| | |
|---|---|
| बोंबील | : १०० रुपये वाटा, |
| कोळंबी | : १५० ते २०० रुपये वाटा, |
| मांदेली | : ५० ते १०० रुपये वाटा. |

# शेतकऱ्यांनी रस्त्याची मोजणी उधळवून लावली

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील पालीतर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीत टोरंट वीज कंपनी धरण बांधणार आहे. त्या धरणावर जाण्यासाठी आवश्यक असलेला रस्ता बनवण्यासाठी राज्य सरकारने जमीन अधिग्रहण करण्यासाठी अधिसूचना काढली आहे. मात्र, नोटीस काढल्यानंतर ६० दिवस पूर्ण होण्याआधीच रस्त्याची मोजणी करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी पोहचले. दरम्यान, शेतकरी आणि ग्रामस्थांनी ही मोजणी उधळवून लावली असून रस्त्यासाठी जमीन देण्यास हरकत असताना तुम्ही आमच्या जमिनीवर आलेच कसे? असा प्रश्न उपस्थित केला आहे.



कर्जत तालुक्यात प्रस्तावित असलेल्या टोरंट जलविद्युत प्रकल्पाला दिवसेंदिवस विरोध वाढत वाढला आहे. पालीतर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीतील साई डोंगर परिसरात टोरंट जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे.

आंबोट परिसरात ग्रामस्थांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या रस्ते मोजणीच्या कामाला तीव्र विरोध दर्शविला. साई डोंगर परिसरातील प्रस्तावित प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मोजणीसाठी महसूल विभाग व अन्य शासकीय यंत्रणांचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले होते. मात्र, स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी या कामावर आक्षेप घेत आंदोलनात्मक भूमिका घेतली. आंबोट येथे ग्रामस्थांनी व्यक्त केलेला विरोध हा आगामी काळात अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत असून टोरंट प्रकल्पाचा मुद्दा कर्जत तालुक्यातील प्रमुख जनआंदोलनांपैकी एक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तालुका पर्यावरण संघर्ष समितीचे संयोजक ॲड. कैलास मोरे यांच्या नेतृत्वाखाली या प्रकल्पाला विरोध सुरू असून पर्यावरण, वनसंपदा आणि स्थानिक जनजीवनावर होणाऱ्या परिणामांचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## निवडक

### शिवानी ताईंकडून विद्यार्थ्यांना मदत



**खोपोली :** खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्ष शिवानी संतोष जंगम यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक शाळा, खालापूर येथे छताचा पंखा भेट देण्यात आला. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. याशिवाय खोपोली येथील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थ्यांनाही खाऊचे वाटप करण्यात आले. शिवानी जंगम यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी कार्यकर्त्यांकडून विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यापूर्वी त्यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले होते. खालापूर येथील मराठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी छताचा पंखा भेट देण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ उत्सव साजरा न करता सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले. या उपक्रमास खोपोलीतील सामाजिक कार्यकर्त्या कांचन जाधव, खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगरसेविका ममता चौधरी, तृप्ती जंगम, सामाजिक कार्यकर्ते हेमंत जंगम यांच्यासह खालापूरमधील नागरिक उपस्थित होते.

### कालिवली-सारसई रस्ता खचला

**रसायनी :** पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील ग्रामपंचायत चावणे हद्दीत येणाऱ्या कालिवली ते सारसई या गावांना जोडणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्याचा



काही भाग खचल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या मार्गावरून दररोज अवजड वाहने, कंपन्यांमधील कामगार तसेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. रस्ता खचल्यामुळे एखादे वाहन खाली कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, संबंधित ठिकाणी प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचे रॅलींग किंवा सुरक्षित कठडे उभारण्यात आलेले नाहीत. अपघात टाळण्यासाठी ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेत खचलेल्या ठिकाणी दगडगोटे ठेवून तात्पुरती खबरदारी घेतली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते संतोष शिंगाडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी निवेदन देऊन तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

### इंद्रप्रस्थ सोसायटीत चोरी

**रसायनी :** चांभार्ली गावाजवळील गुरुद्वाराच्या पाठीमागे असलेल्या इंद्रप्रस्थ सोसायटीत सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत. इंद्रप्रस्थ सोसायटीत राहणारे संजय नंदेश्वर (वय ५७) हे काही काळासाठी घराबाहेर गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून सोन्याचा ऐवज लंपास केला. एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल आहे.

# युवा महोत्सवात जेएसएम महाविद्यालयाचे यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

विद्यार्थी विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ आणि पी.एन.पी. महाविद्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मुंबई विद्यापीठाच्या ५९ व्या युवा महोत्सवाच्या रायगड (दक्षिण) विभागीय फेरीत जे. एस. एम. महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत २६ स्पर्धांपैकी तब्बल १६ स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावत विभागात सर्वाधिक यश संपादन केले.



या महोत्सवात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, नाट्य, वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन, चित्रकला, रांगोळी, कोलाज, पोस्टर मेकिंग, कार्टूनिंग, मूर्तीकला आदी विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सांस्कृतिक प्रतिभेला प्रोत्साहन देणे हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश होता.

या उल्लेखनिय यशाबद्दल जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, प्रा. जयेश म्हात्रे, प्रा. श्वेता पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक प्राध्यापक, दिग्दर्शक आणि सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. युवा महोत्सवात यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड होईल, असा विश्वास ॲड. डॉ. गौतम पाटील यांनी व्यक्त केला. महाविद्यालयाने दिलेला सातत्यपूर्ण पाठिंबा, उपलब्ध करून दिलेल्या सुविधा तसेच प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश संपादन करता आल्याची भावना यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# अजित थळे सेवानिवृत्त



| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चिरनेर शाखेच्या कॅशियर पदावर कार्यरत असलेले अजित रामचंद्र थळे हे ३६ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले आहेत. त्याबद्दल कर्मचारी वर्गाच्या वतीने चिरनेर शाखेत नुकताच निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. थळे यांनी ३६ वर्ष जिल्हा मध्यवर्ती बँकेची सेवा केली. यामध्ये ग्राहकांचे तसेच बँकेचे हित व बँकेची प्रतिष्ठा सांभाळून अत्यंत जबाबदारीने व कर्तव्यनिष्ठेने त्यांनी काम केले. सर्व कर्मचारी व ग्राहकांना त्यांच्याकडून सन्मानाची वागणूक मिळाली. त्यांनी चिरनेर शाखेसह पेण, जोहे आणि अन्य बँक शाखेत अकाऊंटन म्हणून व काही दिवस शाखाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. थळे यांच्या कर्तव्यनिष्ठ कार्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी त्यांच्या कामाचा गौरव करून त्यांना पुढील आयुष्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शाखाधिकारी मदन कोळी, श्रुतिका भोईर, साहिल पाटील, संतोष पाटोदेकर, प्रतिमा राणे, मानसी म्हात्रे, अंकित पाटील रंगनाथ चौलकर आदी उपस्थित होते.

## नवीन शौचालयास नागरिकांचा विरोध

**माणगाव :** माणगाव शहरातील जुना स्टॅण्ड थांबा परिसरात प्रस्तावित सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामाला स्थानिक नागरिकांसह व्यावसायिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. हे ठिकाण शहरातील सर्वाधिक वर्दळीचे असून येथे शौचालय उभारल्यास दुर्गंधी, अस्वच्छता, वाहतुकीस अडथळा तसेच परिसरातील व्यापारी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागेल, अशी भूमिका संजय गांधी यांनी माणगाव नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन देत मांडली आहे. या निवेदनात सदरील जागा ही अत्यंत वर्दळीची आहे तसेच या आधी खासदार निधीतून माणगाव नगरपंचायत परिसरात शौचालय होती तसेच नगरपंचायत परिसरात नव्याने बांधावे. संबंधित ठिकाणी आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना बस थांबा बांधावा परिसर सुशोभीकरण करावे. सुरू असलेले काम थांबवावे यासंदर्भात गांधी यांनी प्रशासनाला इशारा देत, सदर शौचालयाचे काम तातडीने बंद करण्यात आले नाही तर आपण अमरण उपोषणास बसणार असल्याचे जाहीर केले आहे. नागरिकांच्या भावना विचारात न घेता काम सुरू ठेवले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. या संदर्भात मंत्री, जिल्हाधिकारी, तहसीलदारांना देखील निवेदन देण्यात आले आहे. नागरिकांनी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता मान्य केली असली तरी त्यासाठी योग्य आणि पर्यायी जागेची निवड करावी, अशी मागणी केली आहे.

## माथेरानमधील अश्वांची होणार तपासणी

| कर्जत | प्रतिनिधी |

माथेरानमधील प्रवासी वाहतुकीचे साधन असलेले घोडे यांची आरोग्य तपासणी शासनाच्या माध्यमातून केली जाणार आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम; कर्जत तालुक्यातील अश्वपालांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राजिपच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ११ ऑगस्ट रोजी माथेरान येथील इंदिरा गांधी नगर पशुवैद्यकीय चिकित्सालयात अश्व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. माथेरानमधील अश्वपाल आणि घोडेमालकांसाठी हे शिबीर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या शिबिरात घोड्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात येणार असून, ग्लँडर्स या संसर्गजन्य रोगाच्या निदानासाठी रक्तजल नमुने संकलित केले जाणार आहेत. तसेच अँटी-रेबीज लसीकरण आणि जंतुनाशक औषधांचे वितरण केले जाणार आहे. या उपक्रमाचे आयोजन डॉ. सुदर्शन मुंढे, डॉ. शामराव कदम, डॉ. सचिन देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

# श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची वाहने रस्त्यावर

| श्रीवर्धन | प्रतिनिधी|

ब्लूफ्लॅगपायलटनामांकनासाठी प्रस्तावित असलेला नयनरम्य समुद्रकिनारा, लवकरच पुर्णत्वास येणारे श्रीमंत पेशवे यांचे भव्य स्मारक आणि मनमोहक शिवसृष्टी यामुळे श्रीवर्धन शहरात भविष्यात पर्यटन वाढणार आहे. मात्र, वाढते पर्यटन व्यवसाय या बरोबरच शहरात वाहतूक कोंडी वाढ आहे. शहरात लॉजेस, रिसॉर्ट्स आणि हॉटेल्सची पेव फुटले आहे. मात्र, नफा कमावण्याच्या नादात बहुतांश पर्यटन व्यावसायिकांनी आपल्या इमारती



उभारताना पर्यटकांच्या वाहनांसाठी वाहनतळाची ची व्यवस्था केलेली नाही. परिणामी, पर्यटकांना आपली वाहने मुख्य रस्त्यांवरच उभी करावी लागत आहेत. श्रीवर्धनमधील रस्ते अरुंद आहेत, त्यातच नगर परिषदेचे वाहनतळ उपलब्ध नसल्याने रस्त्यांची अवस्था पार बिकट झाली आहे. भविष्यात श्रीवर्धन शहर वाहतूक कोंडीच्या मोठ्या समस्येने पूर्णपणे ग्रासले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भविष्यात पर्यटनाचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासन या अनधिकृत पार्किंग आणि पर्यटनाच्या नियमावलीबाबत काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आरोपीचा पोलिसांवर हल्ला

**नवीन पनवेल :** पनवेल न्यायालयाच्या आवारात रिमांडसाठी आणलेल्या आरोपीने कोर्टाच्या आवारात पोलीस अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून एका पोलिसावर हल्ला करुन पोलिसांच्या तोंडावर लाथ मारली या प्रकरणी सदीक अख्तर मोहम्मद खान याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी त्याला एका गुन्ह्यामध्ये अटक केली होती. त्याच्या नातेवाईकांना कोर्टाच्या आत येऊन न दिल्याचा राग आल्याने आरोपीने पोलिसांना मारुन सरकारी कामात अडथळा आणला.

# चारफाट्याजवळ फेरीवाल्यांचा विळखा

| उरण | प्रतिनिधी |

उरण शहरातील अत्यंत वर्दळीच्या चारफाटा परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांनी अक्षरशः मक्तेदारी निर्माण केली असून, मुख्य रस्त्यावरच व्यवसाय थाटल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून चालावे लागत असून वाहनचालकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



■ तातडीने कारवाईची नागरिकांची मागणी

चारफाटा हा उरण शहराचा प्रमुख वाहतूक केंद्रबिंदू आहे. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत फेरीवाल्यांनी ठाण मांडल्यामुळे पादचारी मार्ग पूर्णपणे अडविण्यात आला आहे. फळे, भाजीपाला, खाद्यपदार्थ आणि विविध वस्तूंची दुकाने थेट रस्त्यावर उभारण्यात आल्याने नागरिकांना वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढावा लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

विशेष म्हणजे, सीआयडीकोच्या जागेवर कोणतीही वैध परवानगी नसताना अनेक फेरीवाले खुलेआम व्यवसाय करत आहेत. अनेक वेळा लेखी आणि तोंडी तक्रारी करूनही सीआयडीकोच्या अतिक्रमण विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांचा थेट आरोप आहे की, सीआयडीको अतिक्रमण विभागातील काही अधिकाऱ्यांचे या अनधिकृत फेरीवाल्यांशी आर्थिक लागेबांधे असल्यामुळेच कारवाईला जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. कारवाईचे केवळ दिखावे केले जातात; मात्र दोन-चार दिवसांत पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण उभे राहते. त्यामुळे ही कारवाई केवळ कागदोपत्रीच राहते की काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

यामुळे नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्या अधिकृत व्यापाऱ्यांवर अन्याय होत असून, अनधिकृत फेरीवाल्यांना मात्र अभय मिळत असल्याची भावना व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे.

## श्रावणीच्या स्वप्नांना मिळाली नवी दिशा | आयआयईएसटी शिबपूरमध्ये एरोस्पेस इंजिनिअरिंगला प्रवेश

# स्वप्न अंतराळाचं, ध्येय इस्त्रोचं!

| चौल | प्रतिनिधी |

आकाशात दिसणाऱ्या चंद्र-ताऱ्यांकडे केवळ कुतूहलाने पाहणाऱ्या एका चिमुकल्या मुलीने तेव्हाच मनाशी एक स्वप्न घट्ट बांधलं होतं... ‘एक दिवस मला याच अंतराळात काम करायचंय!’ त्या स्वप्नाला अभ्यासाची शिस्त, मेहनतीची जोड आणि आई-वडिलांच्या भक्कम पाठिंब्याची साथ मिळाली. रायगडच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या गुणवत्तेची छाप उमटवणारी अलिबाग तालुक्यातील पंतनगरची लेक श्रावणी अमर थळे हिने आता आपल्या स्वप्नाच्या दिशेने आकाशाएवढी मोठी झेप घेतली आहे. देशातील प्रतिष्ठित आयआयईएसटी शिबपूरमध्ये एरोस्पेस इंजिनिअरिंगसाठी प्रवेश मिळवत तिने अंतराळाच्या दिशेने आपल्या आयुष्यातील पहिलं पाऊल टाकलं आहे. भविष्यात इस्रोची शास्त्रज्ञ होऊन देशसेवा करण्याचं श्रावणीचं स्वप्न आहे.

देशातील प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजी (IIEST), शिबपूर येथे तिला एरोस्पेस इंजिनिअरिंग अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. त्यामुळे तिच्या अंतराळ स्वप्नाच्या दिशेने आता पहिले ठोस पाऊल पडले आहे. १८५६ मध्ये स्थापन झालेली आयआयईएसटी शिबपूर ही भारतातील ऐतिहासिक आणि प्रतिष्ठित तंत्रज्ञान संस्थांपैकी एक असून, भारत सरकारने तिला ‘राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेचा’ दर्जा दिला आहे. अशा संस्थेत प्रवेश मिळवून श्रावणीने आपल्या कष्टांना यशाची पहिली पावती मिळवून दिली आहे.



श्रावणीने २०२४ मध्ये पनवेल येथील सी.के.टी. विद्यालयातून दहावीची परीक्षा ९८.८० टक्के गुणांनी उत्तीर्ण होत संपूर्ण रायगड जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावला होता. बारावीमध्येही तिने ७६ टक्के गुण मिळवले. त्यानंतर जेईई ॲडव्हान्समध्येही चांगली कामगिरी करत तिने आयआयईएसटी शिबपूरमध्ये एरोस्पेस इंजिनिअरिंगसाठी प्रवेश मिळवला आहे.

अभ्यासाबरोबरच श्रावणीने आपल्या कलागुणांनाही जपले आहे. भरतनाट्यममध्ये ती पारंगत असून, पुणे विद्यापीठाची ती सुवर्णपदक विजेती आहे. अभ्यास, कला आणि भविष्यातील ध्येय यांचा सुंदर समतोल साधत तिने ही कामगिरी केली आहे. या स्वप्नासाठी तिने अभ्यास, जिद्द आणि मेहनतीची साथ सोडली नाही. त्यामुळेच श्रावणीच्या स्वप्नाला नवी दिशा मिळाली आहे.

**चंद्र-ताऱ्यांकडे पाहताना मनाशी बांधली होती गाठ**

लहानपणापासूनच आकाशातील चंद्र, सूर्य, तारे आणि ग्रहांविषयी श्रावणीला प्रचंड कुतूहल होते. या विषयाचा ती सातत्याने अभ्यास करत होती. त्यातूनच ‘मला अंतराळात काम करायचं, एरोस्पेस इंजिनिअर व्हायचं आणि इस्रोमध्ये शास्त्रज्ञ म्हणून देशासाठी काम करायचं,’ हे स्वप्न तिने मनाशी पक्कं केलं. आज आयआयईएसटीमध्ये मिळालेला प्रवेश म्हणजे या स्वप्नाच्या दिशेने पडलेलं पहिलं महत्त्वाचं पाऊल आहे.

**आई-वडिलांच्या कष्टांचं सार्थक करायचंय!**

श्रावणी मूळची अलिबाग तालुक्यातील पंतनगरची. वडील कामानिमित्त पनवेल येथे स्थायिक झाल्याने तिचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पनवेलमध्येच झाले. वडील अमर थळे हे खासगी कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी असून, आई रिना थळे या पनवेलमधील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षिका आहे. आजोबा राम थळे आणि आजी तिलोत्तमा थळे यांचेही तिला सातत्याने मार्गदर्शन लाभले. श्रावणीच्या यशामागे आई-वडिलांचा मोठा वाटा आहे. लहानपणापासून तिच्या शिक्षणासाठी आणि स्वप्नांसाठी त्यांनी घेतलेल्या कष्टांची जाणीव श्रावणीला आहे. श्रावणी एरोस्पेस इंजिनिअरिंगच्या माध्यमातून विमान, अंतराळयान, उपग्रह आणि क्षेपणास्त्रांच्या रचना, निर्मिती व चाचणीचा अभ्यास करणार आहे.

> अभ्यासातील एकाग्रता, जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी असेल, तर यश नक्कीच मिळते. लहानपणापासूनच मला चंद्र, तारे, ग्रह आणि अंतराळाबद्दल कुतूहल होते. तेव्हाच मी एरोस्पेस इंजिनिअर होण्याचे आणि अंतराळ क्षेत्रात काम करण्याचे स्वप्न पाहिले. आता आयआयईएसटी शिबपूरमध्ये प्रवेश मिळाल्याने त्या स्वप्नाच्या दिशेने माझे पहिले पाऊल पडले आहे. भविष्यात इस्रोमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम करून देशसेवा करण्याचे माझे ध्येय आहे. माझ्या या प्रवासात आई-पप्पा, आजी-आजोबा आणि शिक्षकांनी दिलेला पाठिंबा माझ्यासाठी सर्वात मोठी ताकद आहे. त्यांनी माझ्यासाठी घेतलेल्या कष्टांचे सार्थक करून दाखवायचे आहे.
> – श्रावणी थळे

# भागवत, मोदींवर बोला की

मोहन भागवत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना पूर्वी वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर प्रसिध्दी मिळत नसे. सध्या मोदी राजवट असल्याने भागवत राजगुरू असल्याच्या भूमिकेत वावरतात व मिडियाही त्यांना भरपूर प्रसिध्दी देतो. गोल गोल आणि संदिग्ध बोलणे हे संघाच्या सर्व नेत्यांचे वैशिष्ट्य आहे. भागवतही त्याच परंपरेत वाढलेले आहेत. पण सध्या त्यांच्याभोवतीच्या कथित राजकीय वलयामुळे या सामान्य दर्जाच्या बोलण्याच्याही मोठ्या बातम्या होतात. गुरुवारी मुंबईत युवकांच्या मेळाव्यातील भागवतांच्या मुलाखतीचा असाच गाजावाजा करण्यात आला. एक दिवस आधीपासून भागवत जेन झी सोबत बोलणार अशी दवंडी पिटण्यात आली. शुक्रवारी त्यांचे बोलणे मोठे करून छापण्यात आले. जंतरमंतरवरच्या आंदोलनानंतर जेन झी हा परवलीचा शब्द झाला आहे. या तरुणांशी आपला संवाद तुटला आहे अशी भीती सर्वांनाच वाटू लागली आहे. इतके दिवस मोदींच्या आजूबाजूच्या आय़टीवाल्या कळपाने मोदी म्हणजे तरुणांच्या गळ्यातले ताईत असल्याची प्रतिमा निर्माण केली होती. ती जेन झीवाल्यांनी एका फटक्यात उखडून टाकली. मग पंतप्रधानांनी रात्रीचे इन्स्टाग्राम मेसेज टाकले. तरुण पोरांनी त्यांची टर उडवली. तिकडे अमित शहा संसदेत येण्याची हिंमत दाखवू शकत नाहीत. दिल्लीतल्या लाठीमाराबाबत काय स्पष्टीकरण देणार असा प्रश्न आहे. म्हणून मग भागवतबुवांना मैदानात उतरवण्यात आले. त्यांनी बऱ्याच इकडतिकडच्या गोष्टी केल्या. पण त्यातला महत्वाचा सारांश असा की, जेन झींच्या तक्रारी रास्त आहेत आणि त्यांच्याशी संवाद केला पाहिजे. भागवत आधी भाषण करणार होते, पण नंतर त्यांची मुलाखत घेतली गेली. पण प्रत्यक्षात ते मुलाखतीच्या स्वरुपातले भाषण कम प्रवचनच होते. मुलाखत नावाच्या प्रकारात उलटसुलट नाही तरी, किमान प्रतिप्रश्न आवश्यक असतात. पण इथे भागवत बोलले की मुलांनी टाळ्या वाजवायच्या असे ठरवण्यात आले होते. संघाच्या बौध्दिकामध्ये असेच असते. तिथे एका कोण्या ज्येष्ठाने येऊन बोलायचे व तरुण उर्फ स्वयंसेवकांनी कोणतेही प्रश्न न विचारता ते मुकाट ऐकून घ्यायचे अशी रचना असते.

### पोरांना देशद्रोही ठरवले कोणी

जणू काही खूप मोठे ब्रह्मज्ञान सांगत असल्याच्या थाटात भागवत म्हणाले की, जेन झीशी संवाद करायला हवा. पण हा संवाद करण्यास कोणी कोणाला रोखले होते हा प्रश्न त्यांना विचारण्यात आला नाही. नीट पेपरफुटी प्रकरणी सीजेपीतर्फे वीस जूनपासून जंतरमंतरवर आंदोलन सुरू होते. पण एका महिन्यात मोदी सरकारने त्यांच्याशी चर्चा करण्याचा एकही प्रयत्न केला नाही. पण भागवत मोदी सरकारचे नाव घेऊन त्यांना याबाबत शिव्या घालण्याची हिंमत दाखवू शकत नाहीत. मोदींचे माप आणि त्यांचे पाप त्यांच्या पदरात टाकू शकत नाहीत. जेन झींशी संवाद सोडाच, त्यांना देशद्रोही ठरवण्याच प्रयत्न झाला. आंदोलनस्थळी त्यांचे स्टेज तोडण्यात आले, पाणी, शौचालये बंद करण्यात आली. त्यांना बाहेरून लोक फुकट खाणे पाठवत होते तेही बंद करण्यात आले. या दुष्ट वागणुकीबद्दल भागवतांनी मोदींवर थेट नाव घेऊन टीका केली असती तर जेन झीला त्यांच्याविषयी आदर वाटला असता. जेन झीशी संवाद नसणे ही काहीतरी प्रशासनातील अधिकाऱ्यांची किंवा त्याहूनही अधिक म्हणजे विरोधी काँग्रेसचीच चूक असल्यासारखे भागवत गोलम टोल बोलत होते. जेन झी देशद्रोही नाहीत, देशभक्तीबाबत खरे प्रामाणिक हे युवकच आहेत अशी कौतुक सुमने भागवतांनी त्यांच्यावर उधळली. पण मुळात यांना देशद्रोही ठरवले कोणी हे भागवतांना विचारायला हवे. आंदोलन करणाऱ्यांच्या देशभक्तीचा प्रश्न उपस्थित करणे हीच एक घातक पध्दत आहे. संघाशी संबंध असल्याचे सांगणाऱ्या सोशल मिडियातील टोळ्यांनीच जेन झीला देशद्रोही ठरवले होते. त्यांचा पैसा सोरोसकडून येतो वगैरे अफवा पसरवल्या होत्या. भागवत स्पष्टपणे नाव घेऊन याचा धिक्कार करीत नाहीत. याचा अर्थ असा की, यांच्या टोळीवाल्यांनी आधी मुलांना देशद्रोही म्हणायचे, आणि नंतर त्या मुलांचा जनतेतला प्रभाव ध्यानात आला की, रिव्हर्स गियर टाकून भागवतांनी त्यांना देशभक्तीचे प्रमाणपत्र देऊन पुन्हा स्वतःकडे मोठेपणा घ्यायचा असा हा सगळा धंदा आहे. जोवर भागवत थेटपणे मोदी सरकार, अमित शहा, संघवाले सोशल मिडियातले ट्रोल यांना नाव घेऊन फटकारत नाहीत तोवर त्यांच्या जेन झीला गोंजारण्याला काडीचीही किंमत नाही.

### मुलांमध्ये फूट पाडण्यासाठी

जेन झी ही आपलीच मुले आहेत असे म्हणून त्यांना आपल्या कळपात ओढण्याचा प्रयत्न भागवत करीत आहेत. यात काही मुले त्यांच्या प्रभावाखाली येतीलही कदाचित. संघ स्वयंसेवकांचा त्याग, देशभक्ती वगैरेंचे फार मोठे चित्र आपल्या समाजात रंगवून ठेवण्यात आले आहे. त्याला काही तरुण बळी पडले तर नवल नाही. पण जेन झीचा जो उद्रेक जंतरमंतरवर दिसला ते एक बंड होते. तुम्ही वयाने किंवा पदाने मोठे आहात म्हणून आम्ही तुमचे ऐकणार नाही असे सांगणाऱ्या पिढीचा तो संताप होता. त्यामुळे त्याची भाषा व मार्ग जबरदस्त ओरिजिनल आणि वेगळे होते. ते भागवतांच्या भुलाव्यात येतील असे वाटत नाही. समजा कोणी आलेच तर त्यांच्यातले बंड संपून जाईल. मग जंतरमंतरच्या चळवळीशी वा त्याच्या स्पिरीटशी त्यांचा काही संबंध राहणार नाही. वीस जुलैच्या मोर्चावर भीषण लाठीमार करण्यात आला. पेलेट गनचा वापर करण्यात आला. या गोष्टी मिडियात सर्वत्र आहेत. पण भागवत त्याबाबत सावध भूमिका घेतात. आपण याबाबतीत जेन झीच्या म्हणण्यावर डोळे मिटून विश्वास ठेवू असे ते म्हणतात. पण जेन झी गेले पंधरा दिवस हेच तर बोंबलते आहे. पोलिसांनी लाठीमार करणे, मुलांवर गुन्हे दाखल करणे याविषयी प्रचंड आक्रोश आहे. भागवत जर डोळे मिटून त्यांच्यावर विश्वास ठेवत असतील तर त्यांच्या त्या आक्रोशाविषयी बोलायला त्यांना इतके दिवस का लागावेत हा प्रश्न आहे. शिवाय आताही मुंबईत ते बोलले, पण अमित शहा यांनी संसदेत जाऊन माफी मागायला हवी किंवा खरे तर त्यांचा राजीनामाच घ्यायला हवा अशी भूमिका काही त्यांनी मांडली नाही. असे म्हटले की संघवाले लगेच आम्ही राजकीय नव्हे तर सांस्कृतिक संघटना आहोत याचे गुऱ्हाळ लावतील. पण जर तुम्ही सांस्कृतिक संघटना असाल तर मुळात मग तुम्ही या आंदोलनाविषयी का बोलत आहात आणि मिडियाने तुम्हाला इतकी प्रसिध्दी का द्यायची असाही सवाल आहे. खरी गोष्ट अशी आहे की, जंतरमंतरवरच्या गर्दीने भाजपचा आणि संघाच्या हिंदुत्वाच्या राजकारणाचा पायाच तोडला गेला आहे. जंतरमंतरबाबत हिंदू विरुध्द मुस्लिम किंवा पाकिस्तानचे कारस्थान हे दोन हातखंडा प्रचार चालू शकलेले नाहीत. पोरांनी संघ आणि मोदी राजवटीची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. या पोरांच्यात फूट पाडणे, त्यांच्यात संभ्रम निर्माण करणे, पोरांना घोळात घेऊन भलत्याच मार्गाला घेऊन जाणे असे प्रयत्न सध्या सरकारच्या वतीने जोरात सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भागवतांचे हे भाषण होते.

## विचार

# जनशक्तीपुढे सरकारची नांगी

*विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुढे नमून शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेला राजीनामा हा केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा प्रसंग नाही. हा लाखो विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा सन्मान आहे. हा लोकशाहीच्या जिवंतपणाचा पुरावा आहे. हा नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचा विजय आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्ता कितीही बलाढ्य असली, तरी जनतेच्या सामूहिक इच्छाशक्तीपेक्षा मोठी नसते, हा संदेश त्यातून मिळाला आहे.*



**भागा वरखडे**

काही घटना या केवळ राजकीय नसतात, त्या लोकशाहीच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे ठरतात. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिलेला राजीनामा ही अशीच एक घटना ठरली आहे. या घटनेचा विचार केवळ एका मंत्र्याच्या पदत्यागापुरता मर्यादित ठेवणे म्हणजे तिचे महत्त्व कमी करून पाहणे होईल. गेल्या बारा वर्षांत केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अनेक मोठी आंदोलने, तीव्र टीका, विरोधकांचे आरोप, न्यायालयीन प्रश्न आणि विविध सामाजिक असंतोषाचा सामना केला; परंतु सरकारने माघार घेण्याची किंवा राजकीय जबाबदारी स्वीकारण्याची उदाहरणे अत्यंत दुर्मिळ होती. त्यामुळे प्रधान यांच्या राजीनाम्याकडे एका व्यक्तीच्या राजकीय भवितव्यापेक्षा सरकारच्या कार्यपद्धतीत झालेला महत्त्वाचा बदल म्हणून पाहावे लागेल. या घटनेने एक स्पष्ट संदेश दिला आहे, की जनतेचा विशेषतः तरुणांचा आवाज दीर्घकाळ दाबून ठेवणे कोणत्याही सरकारला शक्य नसते. गेल्या काही वर्षांत देशातील विविध स्पर्धा परीक्षांभोवती निर्माण झालेले प्रश्न केवळ प्रशासकीय त्रुटींचे नव्हते. पेपरफुटी, प्रश्नपत्रिका विक्री, परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवहार, संगणकीय फेरफार, बनावट उमेदवार, भरती प्रक्रियेत दलालांचे जाळे आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या टोळ्यांनी संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत केला. अनेक विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे अभ्यास केला. कुटुंबांनी आर्थिक त्याग केला, पालकांनी कर्ज काढून मुलांच्या शिक्षणाचा खर्च उचलला; पण शेवटी काही पैशांच्या जोरावर किंवा भ्रष्ट यंत्रणांच्या मदतीने गुणवत्तेवर अन्याय होत असल्याचे चित्र समोर आले. अशा वेळी विद्यार्थ्यांचा रोष हा केवळ भावनिक नव्हता, तर तो न्यायाच्या मागणीचा आवाज होता.

देशभरात तरुणांनी उभारलेले आंदोलन हे कोणत्याही एका पक्षाच्या झेंड्याखाली उभे राहिलेले नव्हते. त्यामागे होती ती भविष्याची चिंता, मेहनतीचा अपमान आणि व्यवस्थेवरील वाढता अविश्वास. या आंदोलनाने सरकारला सतत प्रश्न विचारले. परीक्षा सुरक्षित का नाहीत? दोषींवर कठोर कारवाई का होत नाही? विद्यार्थ्यांना वारंवार मानसिक त्रास का सहन करावा लागतो? लाखो तरुणांच्या आयुष्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदा का नाही? या प्रश्नांना केवळ निवेदने, पत्रकार परिषद किंवा आश्वासने पुरेशी ठरत नव्हती. सरकारवर वाढत गेलेला दबाव हा अखेर राजकीय निर्णयात परिवर्तित झाला.मोदी सरकारची गेल्या बारा वर्षांची प्रतिमा अशी राहिली, की कोणत्याही दबावापुढे न झुकणारे, विरोधकांची टीका फारशी गांभीर्याने न घेणारे आणि घेतलेल्या निर्णयांवर ठाम राहणारे सरकार. शेतकरी आंदोलन असो, विविध सामाजिक प्रश्न असोत किंवा विरोधकांचे आरोप; केंद्र सरकारने बहुतांश वेळा आपली भूमिका बदलण्यास नकार दिला. त्यामुळे प्रधान यांच्या राजीनाम्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला. सरकारला हा निर्णय घ्यावा लागला, याचा अर्थ केवळ राजकीय समीकरणे बदलली असे नाही, तर जनमताचे स्वरूप इतके प्रभावी झाले की त्याकडे दुर्लक्ष करणे शक्य राहिले नाही. लोकशाहीत सरकार बहुमताने सत्तेत येते; पण त्या बहुमताचा अर्थ जनतेच्या भावना कायम दुर्लक्षित करण्याचा परवाना नसतो. लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीपुरती मर्यादित नसते. ती रस्त्यावर उतरलेल्या नागरिकांत, प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांत, न्याय मागणाऱ्या पालकांत, सत्य समोर आणणाऱ्या माध्यमांत आणि घटनात्मक संस्थांवर विश्वास ठेवणाऱ्या समाजात असते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने हेच दाखवून दिले. शांततामय, सातत्यपूर्ण आणि व्यापक लोकदबाव निर्माण झाला तर कोणतेही सरकार निर्णय बदलण्यास किंवा जबाबदारी स्वीकारण्यास भाग पडू शकते. परीक्षांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर कायदा करण्याची वेळ सरकारवर आली, हेही या आंदोलनाचेच यश आहे. अनेक वर्षे पेपरफुटीच्या घटना घडत होत्या. विविध राज्यांमध्ये भरती प्रक्रिया रद्द होत होती. न्यायालयात खटले सुरू होते.

विद्यार्थ्यांचे वय वाढत होते, संधी कमी होत होत्या, तरीही व्यापक राष्ट्रीय पातळीवर ठोस कायदेशीर चौकट तयार करण्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले गेले नाही; परंतु जेव्हा लाखो तरुणांनी प्रश्न उपस्थित केले, तेव्हा सरकारला केवळ प्रशासनिक कारवाई पुरेशी नसल्याचे लक्षात आले. कठोर शिक्षेची तरतूद, संघटित गुन्हेगारीवर नियंत्रण आणि परीक्षा प्रक्रियेचे संरक्षण यासाठी कायदा आवश्यक असल्याचे मान्य करावे लागले. हा बदल स्वतःहून झालेला नसून लोकदबावातून घडलेला आहे. प्रधान यांचा राजीनामा हा नैतिक जबाबदारीचा स्वीकार मानला जावा, की राजकीय अपरिहार्यता, यावर मतभेद असू शकतात; परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे, की हा निर्णय सरकारने कोणत्याही कारणाशिवाय घेतलेला नाही. जर विद्यार्थ्यांचे आंदोलन इतके व्यापक झाले नसते, जर देशभरात परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले नसते, जर जनमत सरकारविरोधात ठाम उभे राहिले नसते, तर कदाचित हा निर्णयही झाला नसता. त्यामुळे या राजीनाम्यामागे खरा विजय हा आंदोलनाचा आहे. लोकशाहीत विरोध म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे, तर व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याची प्रक्रिया आहे. दुर्दैवाने अलीकडच्या काळात प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहण्याची प्रवृत्ती वाढली होती. आंदोलन करणाऱ्यांना राजकीय शिक्के मारले गेले, त्यांच्या हेतूंवर प्रश्न उपस्थित झाले; मात्र विद्यार्थ्यांनी दाखवून दिले, की भविष्याशी संबंधित प्रश्नांवर ते कोणत्याही पक्षाच्या चौकटीत अडकून राहणार नाहीत. त्यांना रोजगार हवा आहे, पारदर्शक परीक्षा हव्यात आणि गुणवत्तेला न्याय हवा आहे. ही मागणी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी सुसंगत आहे.

या घटनेतून विरोधी पक्षांनाही एक धडा मिळतो. केवळ संसदेत सरकारवर टीका करून चालत नाही. जनतेच्या प्रश्नांशी सातत्याने जोडलेले राहणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला, विविध स्तरांवर चर्चा झाली आणि त्यामुळे सरकारवर दबाव वाढला. लोकशाहीत सशक्त विरोधकांची भूमिका किती महत्त्वाची असते, याचीही या आंदोलनाने आठवण करून दिली. सरकारसाठीही हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. परीक्षा प्रणाली ही केवळ शिक्षण मंत्रालयाचा विषय नाही. ती देशाच्या भविष्यातील प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक विकासाशी जोडलेली आहे. जर गुणवंत तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वासच उडाला, तर त्याचे दूरगामी परिणाम देशाच्या प्रगतीवर होतील. त्यामुळे केवळ कायदा करून प्रश्न सुटणार नाही. परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वायत्तता, तांत्रिक सुरक्षितता, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि दोषींना तातडीने शिक्षा या सर्व बाबींमध्ये मूलभूत सुधारणा कराव्या लागतील. आजचा भारतीय युवक पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहे. तो 'सोशल मीडिया'च्या माध्यमातून माहिती मिळवतो, तथ्य पडताळतो आणि संघटित होतो. त्यामुळे कोणत्याही प्रश्नावर जनमत वेगाने तयार होते. सरकारने या नव्या वास्तवाची दखल घेणे आवश्यक आहे. संवाद टाळून, टीका नाकारून किंवा आंदोलनांना दुर्लक्ष करून प्रश्न सुटत नाहीत. उलट असंतोष वाढतो. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने हे स्पष्ट केले, की संवादाचा पर्याय कोणत्याही लोकशाहीत नसतो. प्रधान यांच्या राजीनाम्याचा राजकीय परिणाम भविष्यात काय होईल, हे काळ ठरवेल; परंतु या घटनेचे लोकशाहीतील स्थान वेगळे राहील. कारण हा प्रसंग सांगतो, की लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेकडेच असते.

निवडणुकीत दिलेले बहुमत हे जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असते; परंतु तो विश्वास टिकवण्यासाठी उत्तरदायित्वही स्वीकारावे लागते. सरकार कितीही शक्तिशाली असले, तरी लोकांच्या सातत्यपूर्ण आणि न्याय्य आवाजापुढे त्याला अखेर नमावेच लागते. ही घटना कोणत्याही सरकारसाठी इशारा आहे, की तरुणांच्या आकांक्षा दुर्लक्षित करता येत नाहीत. रोजगार, शिक्षण, गुणवत्ता आणि न्याय या प्रश्नांवर संवेदनशीलता दाखवावीच लागेल. अन्यथा, असंतोष अधिक व्यापक स्वरूप धारण करू शकतो. लोकशाहीचा खरा अर्थ निवडणूक जिंकण्यात नसून लोकांचा विश्वास जिंकण्यात आहे. आज या संपूर्ण घडामोडीकडे पाहताना असे म्हणावेसे वाटते, की हा आंदोलनाने सरकारला निर्णय बदलण्यास भाग पाडले. परीक्षांतील गैरव्यवहाराविरोधात कठोर कायद्याची गरज मान्य करायला लावली आणि उत्तरदायित्वाची जाणीव करून दिली. म्हणूनच या संपूर्ण घटनाक्रमाचे सार एका वाक्यात मांडायचे झाले, तर या संघर्षात लोकशाही जिंकली आणि एकाधिकारशाहीचा पराभव झाला, असेच म्हणावे लागेल,

## चर्चा आजची

# तरुणाईची शहराकडे वाट, शेतीकडे पाठ!



**सानिका म्हात्रे**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्वपूर्ण स्थान असून, ग्रामीण भागातील बहुसंख्य कुटुंबांचा उदरनिर्वाह आजही शेतीवर अवलंबून आहे. मात्र, गेल्या काही दशकांत ग्रामीण भारताच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेत मोठा बदल घडताना दिसत आहे. गावातील तरुणाई शेतीपासून दूर जाऊन शहरांकडे आकर्षित होत आहे. 'रुणाईची शहराकडे वाट, शेतीकडे पाठ' ही केवळ स्थलांतराची बाब नसून, भविष्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि शेतीच्या अस्तित्वाशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.

पूर्वी शेतकरी कुटुंबातील मुले वडिलोपार्जित शेती हाच आपला व्यवसाय मानत असत. जमिनीशी असलेले नाते, कुटुंबाची शेती आणि गावातील सामाजिक जीवन यामुळे शेतीला प्रतिष्ठा होती. मात्र शिक्षणाचा प्रसार, औद्योगिकीकरण, आधुनिकजीवनशैली आणि रोजगाराच्या वाढत्या संधींमुळे तरुणांच्या अपेक्षा बदलल्या आहेत. शहरांमध्ये चांगले उत्पन्न, आधुनिक सुविधा, शिक्षणाच्या संधी, मनोरंजन आणि करिअरचे विविध पर्याय उपलब्ध असल्याने ग्रामीण तरुण शहरांकडे वळत आहेत.

यामध्ये तरुणांना दोष देणे योग्य ठरेल का, हा प्रश्नही विचारात घ्यावा लागतो. शेतीकडे पाठ फिरविण्यामागे केवळ शहरांचे आकर्षण नाही, तर शेतीतील अस्थिरता हे त्यामागचे मोठे कारण आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, बदलते हवामान, कीडरोग आणि उत्पादनाला मिळणारा अपुरा भाव यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक गणित अनेकदा कोलमडते. वर्षभर कष्ट करूनही उत्पादन खर्च वजा जाता हातात अपेक्षित उत्पन्न राहत नाही. त्यामुळे शिक्षित तरुणाला शेतीत स्थिर भविष्य दिसत नाही.

शेतीचा वाढता खर्च हीदेखील मोठी समस्या आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज, सिंचन आणि वाहतूक या सर्वांचा खर्च वाढत आहे. त्यातच अनेक गावांमध्ये शेतीच्या कामासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. लहान-लहान तुकड्यांमध्ये जमिनीचे विभाजन झाल्याने शेती आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य राहात नाही. परिणामी, अनेक ठिकाणी सुपीक जमीन पडिक राहते. तरुण शहरात गेल्यानंतर शेतीची जबाबदारी वृद्ध आई-वडिलांवर येते आणि त्यांच्या क्षमतेवर शेती अवलंबून राहते. मात्र, याचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. शहरांकडे जाणाऱ्या प्रत्येक तरुणाला अपेक्षित रोजगार मिळतोच असे नाही. उच्च शिक्षण घेतल्यानंतरही अनेक तरुण बेरोजगारीला सामोरे जात आहेत. वाढती स्पर्धा, मर्यादित रोजगाराच्या संधी आणि शहरांमधील वाढता जीवनखर्च यामुळे नोकरी मिळाल्यानंतरही आर्थिक स्थैर्य मिळेलच असे नाही. अशा परिस्थितीत काही तरुण पुन्हा गावाकडे आणि शेतीकडे वळताना दिसतात. प्रश्न एवढाच आहे की, त्यांना शेतीमध्ये टिकून राहण्यासाठी आवश्यक आर्थिक आणि तांत्रिक आधार मिळतो का? आजचा तरुण शेतकरी पूर्वीच्या पिढीपेक्षा अधिक शिक्षित आणि तंत्रज्ञानाशी जोडलेला आहे. त्यामुळे शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून पाहण्याऐवजी कृषी उद्योग म्हणून पाहण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ठिबक सिंचन, हरितगृह, सेंद्रिय शेती, फळबागा, भाजीपाला उत्पादन, प्रक्रिया उद्योग, कृषी पर्यटन, थेट बाजारपेठ आणि मूल्यवर्धन यामुळे शेती अधिक फायदेशीर होऊ शकते. ड्रोन, हवामानाचा अंदाज, माती परीक्षण आणि डिजिटल बाजारपेठ यांचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याची संधी आहे.

यासाठी मात्र शेतकऱ्याला केवळ योजना जाहीर करून उपयोग नाही. योजनांची माहिती, प्रत्यक्ष प्रशिक्षण, सुलभ कर्ज, विमा, बाजारपेठ आणि योग्य दर मिळणे आवश्यक आहे. शेतमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळत नसेल तर तरुण पिढीला शेतीकडे आकर्षित करणे अवघड आहे. त्यामुळे शेतीमालाच्या बाजारपेठेतील अस्थिरता कमी करणे ही सरकारसमोरील महत्त्वाची जबाबदारी आहे.

शेतीला सामाजिक प्रतिष्ठा मिळणेही तितकेच आवश्यक आहे. आज अनेक ठिकाणी सरकारी किंवा खासगी नोकरीला प्रतिष्ठा आणि शेतीला दुय्यम व्यवसाय मानले जाते. ही मानसिकता बदलली पाहिजे. लाखो रुपयांचे उत्पन्न देणारा आधुनिक शेतकरी हा उद्योजकच आहे. शिक्षित तरुणाने शेतीत उतरले, तर त्याच्याकडे नियोजन, तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि आर्थिक व्यवस्थापनाची क्षमता अधिक प्रभावीपणे वापरता येऊ शकते. ग्रामीण भागातील तरुण शहरांकडे जाऊ नयेत, असे म्हणणेही वास्तववादी नाही. प्रत्येकाला आपल्या आवडीचे शिक्षण, व्यवसाय आणि जीवनशैली निवडण्याचा अधिकार आहे. मात्र गाव सोडणे हीच प्रगतीची एकमेव वाट आहे, अशी मानसिकता निर्माण होणे चिंताजनक आहे. गावातच दर्जेदार शिक्षण, आरोग्य, उद्योग, इंटरनेट, बाजारपेठ आणि रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या, तर तरुणांना स्थलांतर करण्याची सक्ती राहणार नाही. शेतीपासून तरुणाई दूर गेली तर त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवर होणार नाही. अन्नधान्याचे उत्पादन, ग्रामीण अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि देशाच्या एकूण आर्थिक व्यवस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे तरुणांनी शेतीकडे पाठ फिरवू नये, पण शेतीनेही तरुणांना पाठ दाखवू नये, यासाठी धोरणात्मक बदल आवश्यक आहेत.

तरुणाईची ऊर्जा, शिक्षण, तंत्रज्ञान आणि नवकल्पना यांची जोड पारंपरिक शेतीला मिळाली, तर भारतीय कृषी क्षेत्राचा चेहरामोहरा बदलू शकतो. शेतीला केवळ उदरनिर्वाहाचे साधन न मानता उद्योग आणि उद्योजकतेची संधी म्हणून पाहिले, तर गावाकडील तरुणाईला शहराकडे जाण्याची गरज कमी होईल. शेवटी प्रश्न तरुणांनी शेती करावी की शहरात जावे, एवढाच नाही; प्रश्न असा आहे की, शेतीतच तरुणांना सन्मानाने आणि आर्थिक स्थैर्याने जगण्याची संधी आपण निर्माण करणार आहोत का? याचे उत्तर आजच्या धोरणकर्त्यांनी आणि समाजाने शोधणे गरजेचे आहे.

## लोकसंसद

### 'धवललक्ष्मी' मादी कासवाचा प्रवास आणि सागरी संवर्धनाची गरज

'धवललक्ष्मी' नामकरण केलेल्या ऑलिव्ह रिडले प्रजातीच्या मादी कासवाच्या समुद्रातील विस्मयकारक प्रवासाची कहाणी शास्त्रज्ञासह सर्वांनाच थक्क करणारी आहे. १० ऑगस्ट २०२५ रोजी डहाणू येथील 'धाकटी बीच'वर मासेमारीच्या जाळ्यात अडकून गंभीर जखमी अवस्थेत सापडलेल्या या मादी कासवाला तत्परतेने डहाणू येथील कासव संवर्धन केंद्रात नेण्यात आले. तेथे तीन महिन्यांच्या उपचारानंतर तिला भारतीय वन्यजीव संस्थेच्या मदतीने २० नोव्हेंबर २०२५ रोजी पाठीवर हाय-टेक सॅटेलाइट ट्रान्समीटर बसवून पुन्हा समुद्रात सोडण्यात आले. समुद्रात सोडल्यानंतर धवललक्ष्मीने सुरुवातीला वेगवान प्रवास करत गुजरातचे पोरबंदर गाठले. नंतर गुजरातहून तिने खोल अरबी समुद्रात आंतरराष्ट्रीय सागरी हद्द ओलांडली आणि ती ओमान देशाच्या किनाऱ्याजवळ पोहोचली. नंतर तिने पुन्हा भारताच्या दिशेने प्रवास सुरू केला आणि पुन्हा अरबी समुद्र पार करून ती रत्नागिरीच्या सागरी हद्दीत परतली. ५ जुलै २०२६ रोजी मिळालेल्या शेवटच्या सिग्नलनुसार धवललक्ष्मी कर्नाटकातील मुर्डेश्वर किनाऱ्यापासून सुमारे १२५ किलोमीटर अंतरावर खोल समुद्रात होती. तोपर्यंत समुद्रातील २२८ दिवसात तिने तब्बल ४,७८५ किलोमीटरचा प्रवास केला होता. जाळ्यात अडकून जखमी झालेल्या आणि नवजीवन मिळालेल्या धवललक्ष्मीच्या या नैसर्गिक प्रवासाच्या रोचक कहाणीने कासवाच्या वैज्ञानिक संशोधनाला हातभार लावला आहे, तसेच प्लास्टिक प्रदूषणाला बळी पडणाऱ्या कासवासारख्या हजारो जलचरांचे घर असलेल्या सागरी परिसंस्थेचे गांभीर्यही अधोरेखित केले आहे.

**–प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली. त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँडवाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला 'सोंगाड्या' हा चित्रपट सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली. या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. हा चित्रपटही यशस्वी ठरला. मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

# घाटरस्त्यातील प्रवास जीवघेणा

## खड्डे ठरताहेत अपघाताला निमंत्रण



| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ–माथेरान घाटरस्त्यातील डांबरी रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे रस्त्यावरून वाहतूक करणे धोकादायक बनले आहे. घाटरस्त्याने वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांसाठी रस्त्यावरील खड्डे अपघाताला निमंत्रण देणारे ठरत आहेत. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती पावसाचा जोर कमी झाल्यावर करण्यात यावी, अशी मागणी टॅक्सीचालकांनी केली आहे.

माथेरान या पर्यटनस्थळी जाण्यासाठी नेरळ–माथेरान घाटरस्ता हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे घाटरस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाची संख्या मोठी आहे. शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवशी वाहने एकमेकांना चिकटून चालत असतात. पावसाळ्यात येथील पावसाचा आनंद घेण्यासाठी दररोज हजारो पर्यटक येत आहेत. डोंगराळ भागातील कोणताही घाटरस्ता हा डांबरी बनविला जातो. पावसाच्या पाण्यामुळे रस्ता निसरडा होऊ नये, यासाठी घाटातील रस्ते डांबरी बनवले जातात. त्यामुळे नेरळ–माथेरान हा घाटरस्ता पावसाळ्यातील प्रचंड प्रमाणात कोसळणाऱ्या पाण्यामुळे खराब होऊ लागला आहे. घाटरस्त्यात बऱ्याच ठिकाणी रस्त्यावरील डांबर वाहून गेल्याने मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे प्रामुख्याने वॉटर पाईप भागापासून रस्त्यावरील खड्डे वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत.

घाटरस्त्यात चार ठिकाणी मिनी ट्रेनची मार्गिका आहे. त्यातील वॉटर पाईप भागात तिन्ही ठिकाणी रस्ता प्रचंड खराब झाला आहे. रस्त्यावरील डांबर आणि दगड निघून गेल्याने प्रमुखाने दुचाकीचालकांची वाहने मिनी ट्रेन मार्गिकामधील रुळात अडकून पडत आहेत. त्याचवेळी बाहेरून वाहने घेऊन येणाऱ्या पर्यटकांचे या खड्डे असलेल्या रस्त्यामुळे वाहतूक करण्यात अडचणी येत आहेत.

रस्त्यावरील खड्डे चुकवताना वाहन अपघातग्रस्त देखील होण्याची शक्यता असल्याने घाट रस्ता धोकादायक बनला आहे. त्यामुळे पावसाचा जोर कमी झाल्यावर बांधकाम विभागाने तात्काळ रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी केली गेली आहे.

### दुरुस्तीची कामे मलमपट्टीसारखी

वाहनचालकांसाठी रस्ता वाहतूक करण्यायोग्य राहिला नसल्याने बांधकाम खात्याने डागडूजी सुरू केली आहे. परंतु, ही दुरुस्तीची कामे मलमपट्टीसारखी असल्याने शासनाने वाहनचालकांची फसवणूक करू नये, अशी मागणी नेरळ माथेरान टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र कराळे यांनी केली आहे. रस्त्यावर असलेले रेल्वे मार्गावरील खड्डे टॅक्सीचालक दरवर्षी भरत असतात, मग बांधकाम विभाग आहे कशासाठी? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

# धामणसे ॲग्रो फार्मला कृषी तज्ज्ञांची भेट



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खानाव येथील प्रगतशील शेतकरी मंगेश खंडू धामणसे यांनी अनुभव आणि आणि ज्ञानाचा उपयोग करून भात शेतीच्या समवेत विविध प्रकारची फळझाडे यांचे उत्पन्न घेतले आहे. त्यांनी निर्माण केलेल्या धामणसे ॲग्रो फार्मला कृषी तज्ज्ञ गव्हाणे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी अधिक उत्पन्न कसे वाढले जाईल, याविषयी मार्गदर्शन केले.

कृषी तज्ज्ञ गव्हाणे यांनी आंबा पिकातील शास्त्रोक्त छाटणी, संतुलित खत व्यवस्थापन, कीड–रोग नियंत्रण तसेच उत्पादनवाढीसाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच फणस, नारळ, चिकू आणि विविध मसाला पिकांच्या लागवड व व्यवस्थापनातील महत्त्वाच्या बाबींची माहिती देत शेतकऱ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

शेतकरी मंगेश धामणसे यांनी आपल्या शेतीतील अनुभव मांडताना आंबा बागेतील खत व्यवस्थापन, उत्पादनाचे प्रभावी विपणन, सेंद्रिय शेतीचा अवलंब आणि जीवामृताचा योग्य वापरामुळे उत्पादन व आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याचे सांगितले.

कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रगतशील शेतकऱ्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण यामुळे ही भेट ज्ञानवर्धक ठरली. आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रोक्त व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष शेतीचा अनुभव यांची सांगड घातल्यास शेती अधिक शाश्वत, उत्पादनक्षम आणि फायदेशीर होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रादेशिक कृषी प्रशिक्षण संस्था (रामेती), खोपोली येथील कृषी अधिकारी भोमे तसेच कोकणातील विविध जिल्ह्यांतील कृषी अधिकाऱ्यांनी भेट देत आंबा व फळबाग व्यवस्थापनाची पाहणी केली.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ ऑगस्ट

१) श्री.चंद्रकांत शांताराम घरत मु.नावेदार,अलिबाग, दि.८-८-१९३८

२)श्रीम.प्रभाकर तुकाराम घरत मु.लोणारे, अलिबाग दि.८-८-१९५०

३)श्री.यशवंत परशुराम बंदरी अलिबाग-कोळीवाडा, अलिबाग दि.८-८-१९४९

४) पुष्पा भवरलाल जैन श्रीबाग, अलिबाग दि.८-८-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**

९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**




**कै. सौ. मंगला रामचंद्र केळकर, स्मरणार्थ अलिबाग**

## भटक्या श्वानाचा एकाला चावा

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर सेक्टर ४ परिसरात भटक्या श्वानांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे. अशातच, एका तरुणाला श्वानाने चावा घेतल्याची घटना घडली. रहिवाशांच्या स्थानिक माहितीनुसार, सेक्टर ४ मधील बाल भारती पब्लिक स्कूल परिसरात चार भटके श्वान नेहमी फिरत असतात. हे श्वान दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनांचा पाठलाग करत मोठ्याने भुंकतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशातच, असरफूल गाझी आणि त्याचा भाऊ रस्त्याने जात होते. यावेळी श्वानाने मागून असरफूलला चावा घेतला. जवळील एका चिकन दुकानाच्या मालकाने प्रसंगावधान दाखवत तातडीने मुलाच्या पालकांशी संपर्क साधला आणि त्याला सुरक्षितपणे त्यांच्या स्वाधीन केले.

## वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**रसायनी :** पाताळगंगा परिसरातील जांभिवली येथील सामाजिक कार्यकर्ते तथा संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष रमेश कोंडीलकर यांनी आपल्या कन्या राही रमेश कोंडीलकर हिच्या सहाव्या वाढदिवसानिमित्त रसायनी–पाताळगंगा परिसरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. याप्रसंगी खाने–आंबिवली येथील राजाश्रय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना वृद्धोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या व अन्य शालेय उपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वाटप प्रसंगी राहीला उदंड आयुष्य लाभो, अशा शुभेच्छा ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांनी दिल्या. समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे रमेश कोंडीलकर यांनी सांगितले.

# ‘डिजिटल प्रसिद्धीवर भर देणे आवश्यक’

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्राचा पर्यटन ब्रँड राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी डिजिटल प्रसिद्धी, प्रभावी जनसंपर्क आणि नाविन्यपूर्ण माध्यमांचा व्यापक वापर करणे आवश्यक आहे. राज्याची समृद्ध संस्कृती, ऐतिहासिक वारसा आणि नैसर्गिक वैभव आधुनिक माध्यमांतून जगासमोर प्रभावीपणे मांडले गेले पाहिजे, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

पर्यटन संचालनालयामार्फत २०२६–२७ या वर्षातील जनसंपर्क विभाग आणि सामाजिक माध्यमांअंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचा सविस्तर आढावा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे घेण्यात आला. या बैठकीत महाराष्ट्र पर्यटनाच्या प्रसिद्धी, जनसंपर्क आणि सामाजिक माध्यमांवरील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पर्यटकांना अचूक, विश्वासार्ह आणि आकर्षक माहिती वेळेत उपलब्ध करून देणे, पर्यटन विभागाची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करणे तसेच राज्यातील पर्यटनस्थळांची देश–विदेशात प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी डिजिटल माध्यमांचा अधिक परिणामकारक वापर करण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

# प्रतिक्षा थळे यांचा सन्मान

| श्रीगाव | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील चरी गावच्या कवयित्री प्रतिक्षा सुरज थळे यांना उत्कृष्ट काव्य सादरीकरणाबद्दल विशेष सन्मान आला. को.म.सा.प. शाखा नवीन पनवेल, सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ पनवेल आणि के. आ. बांठिया माध्यमीक विद्यालय नवीन पनवेल आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळा व कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये कवी संमेलनदेखील पार पडले. यावेळी ३० कवींचे सादरीकरण झाले. त्यामधून सर्वो त्कृष्ट सादरीकरण म्हणून १० कवींची निवड करण्यात आली. त्यामध्ये कवयित्री प्रतिक्षा थळे यांचा समावेश होता. त्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तक सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या सन्मानाबद्दल कवयित्री प्रतिक्षा थळे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**रोजगार अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने नियमित आधारावर विविध श्रेणीतील खालील पदांसाठी रोजगार अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/02/2026, दिनांक 31.07.2026 प्रकाशित केली आहे.

**अधिसूचना क्र. : सीओ/पी-आर/02/2026, दिनांक 31.07.2026**

| पदाचे नाव | यू आर | ईडब्ल्यू एस | ओबीसी - एनसीएल | एस सी | एस टी | एकूण | माजी सैनिक | पी डब्ल्यू बीडी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता-सीवील | 12 | 3 | 5 | 3 | 2 | 25 | 2 | 0 |
| ट्रॅक मेंटेनर | 14 | 13 | 0 | 19 | 11 | 57 | 11 | 0 |
| वरिष्ठ विभाग अभियंता-एस अँड टी | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 05 | 0 | 0 |
| ईएसटीएम-III | 11 | 3 | 1 | 0 | 0 | 15 | 1 | 0 |
| विभाग नियंत्रक | 5 | 1 | 0 | 2 | 1 | 09 | 0 | 0 |
| स्टेशन मास्टर | 11 | 1 | 0 | 2 | 1 | 15 | 1 | 0 |
| मालगाडी व्यवस्थापक | 7 | 1 | 0 | 2 | 0 | 10 | 1 | 0 |
| सहायक लोको पायलट | 21 | 2 | 0 | 5 | 2 | 30 | 3 | 0 |
| वरिष्ठ विभाग अभियंता-मेकॅनीकल | 1 | 1 | 1 | 3 | 0 | 06 | 0 | 0 |
| कनिष्ठ अभियंता-मेकॅनीकल | 4 | 0 | 1 | 2 | 0 | 07 | 0 | 0 |
| तंत्रज्ञ/III-मेकॅनीकल | 14 | 0 | 0 | 0 | 1 | 15 | 1 | 0 |
| वाणिज्य पर्यवेक्षक | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 07 | 0 | 1 |

उमेदवारांनी अधिसूचनेचा तपशील, पात्रता निकष इत्यादींसाठी केआरसीएलच्या **www.konkanrailway.com** या संकेतस्थळावरील रिक्रूटमेंट ➔ करंट नोटिफिकेशन ➔ नोटिफिकेशन या लिंकवर जाऊन पाहावे व त्यानुसार अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

पान १ वरून

## मिसिंग लिंक बोगद्यात भीषण अपघात

(एमएच ०१ सीआर ७०७५) जोरदार धडक दिली. मिसिंग लिंक बोगद्यातील सुमारे सात किलोमीटर अंतरावर हा अपघात झाला.

प्राथमिक माहितीनुसार, फॉर्च्युनरमधील पाचही जण पिंपरी–चिंचवडमधील वाकड येथील भूमकर चौक परिसरातील रहिवासी आहेत. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, आयआरबीचे देवदूत पथक तसेच मदत यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढून जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, अपघातामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक सुमारे दोन तास बंद ठेवण्यात आली होती. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सर्व वाहने जुन्या मुंबईपुणे मार्गावरून मुंबईच्या दिशेने वळविण्यात आली. अपघातग्रस्त दोन्ही वाहने हटविल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. या अपघाताचा पुढील तपास महामार्ग पोलीस करीत आहेत.

## राफ्टिंगच्या थरारात तरुणाचा मृत्यू

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच संबंधित शासकीय विभागांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

१२ जुलै २०२६ रोजी कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धगडवाडी येथे रिव्हर राफ्टिंगदरम्यान बोट दगडावर आदळून उलटली. या दुर्घटनेत मनोज अमर नाथ याचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेनंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मात्र, मुलाच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करत त्याच्या आईने आता या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

राफ्टिंगदरम्यान सुरक्षेच्या नियमांचे पालन झाले होते का? पर्यटकांना योग्य दर्जाचे जीवरक्षक जॅकेट देण्यात आले होते का? प्रशिक्षक पात्र आणि प्रशिक्षित होते का? बचावकार्य वेळेत करण्यात आले का? संबंधित कंपनीकडे राफ्टिंगसाठी आवश्यक परवानग्या होत्या का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर यावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

आपल्या मुलाचा घातपात करून मृत्यू घडवून आणल्याचा संशय असून, या गंभीर घटनेला अपघाताचे स्वरूप देऊन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप मृताच्या आईने केला आहे. पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी करूनही त्याबाबत चालढकल होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

त्यामुळे संबंधित राफ्टिंग कंपनीची सेवा तातडीने बंद करून, कंपनीचे संचालक, आयोजक, प्रशिक्षक आणि घटनेशी संबंधित सर्व व्यक्तींची चौकशी करावी. तसेच दुर्घटनेची निष्पक्ष, तांत्रिक आणि सर्वंकष चौकशी करून सत्य बाहेर आणावे, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

दरम्यान, पोलिसांकडून उपलब्ध पुरावे, तांत्रिक बाबी आणि संबंधित व्यक्तींचे जबाब यांच्या आधारे तपास सुरू असल्याचे कोलाड पोलीस ठाण्याचे प्रभारी भारत फारने यांनी सांगितले. तपास पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध पुरावे आणि निष्कर्षांच्या आधारे आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

## कांदळवनाचा शेतीवर कब्जा

सापडले आहेत. खारे पाणी शिरल्यामुळे तसेच कांदळवनाच्या प्रसारामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी दलदलीच्या बनल्या आहेत. कांदळवनामुळे कायदेशीर मालकी हक्काचा प्रश्न निर्माण झाला आहे. भरतीच्यावेळी खाडीचे पाणी शेतात गेल्याने जमीनीच क्षारता वाढते. सुपीक जमीन नापीक व दलदलीची होत असल्याचे बोलले जात आहे.

## पीक विम्याकडे शेतकऱ्यांची पाठ

सुमारे ८७ हजार हेक्टरवर भात, तर मोठ्या प्रमाणावर नाचणीची लागवड केली जाते. जिल्ह्यातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने अतिवृष्टी, पूर, अवकाळी पाऊस आणि इतर नैसर्गिक संकटांचा फटका शेतकऱ्यांना दरवर्षी बसतो. या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

यंदा या योजनेची अंमलबजावणी करताना डिजिटल क्रॉप सर्व्हे (ई–पीक पाहणी) आणि ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. जिल्हाभर ग्रामसभा, जनजागृती मोहीम, शेतबांधांवरील भेटी आणि फलकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विम्याचे महत्त्व पटवून दिले जात आहे. रायगडमध्ये भातासाठी प्रतिहेक्टर ६५० रुपये आणि नाचणीसाठी ४०० रुपये विमा हप्ता असून, अनुक्रमे ६५ हजार आणि ४० हजार रुपयांपर्यंत संरक्षण उपलब्ध आहे.

३१ जुलैपर्यंत सुमारे २ हजार ३७० हेक्टर क्षेत्राचा पीक विमा उतरविण्यात आला आहे. मात्र, शासनाने नोंदणीची मुदत १० ऑगस्टपर्यंत वाढविल्याने उर्वरित शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची संधी विमा कंपनीला मिळाली आहे. बँकांच्या सहकार्याने कर्जदार व बिगर कर्जदार मिळून आणखी साडेआठ हजार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

## कारच्या धडकेमध्ये मोटर सायकल स्वार जखमी

शाईन कंपनीच्या या मोटरसायकल स्वराला पाठीमागून बाजूस धडक दिल्याने मोटर सायकल वरून प्रवास करणारे महाड मधील प्रमोद मनोहर काळे वय वर्ष ५५ यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना वैद्यकीय उपचारासाठी महाड येथील खाजगी रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठविण्यात आले आहे असे पोलिसांनी सांगितले आहे

याबाबत कारचालक मनीष मधुभाई पवार वय वर्षे तेथेच राहणार डोंबिवली पुढील तपास करून गुन्हा दाखल करण्यात येणार आहे असे घटनास्थळी बोलले जात होते. महामार्ग वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे पोलीस हवालदार पवार पोलीस हवालदार गोविंल कर यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले व महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

## मंत्री, लोकप्रतिनिधींनी दिखावेगिरी बंद करा

अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर व्हावा, यासाठी केवळ कागदोपत्री आढावे नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवावर आधारित निर्णय घेण्याची वेळ आली असल्याचे मतही व्यक्त होत आहे.

एसी गाडीतून महामार्ग चांगलाच वाटतो; पण लाल परीत बसल्यावरच खड्ड्यांची भाषा समजते, अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत असून, ही मागणी आता प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कितपत गांभीर्याने घेतात, याकडे संपूर्ण कोकणाचे लक्ष लागले आहे.

## पूल चोरीतील आरोपी आता वनगे मारहाणीतही!

आता त्याच व्यक्तीचे नाव पुन्हा एका गंभीर गुन्ह्यात आरोपी म्हणून समोर आल्याने गुन्हेगारीचीमालिका सुरूच आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. मयूर वनगे प्रकरणात ८० हजार रुपये रोख रक्कम आणि सुमारे पाच तोळे सोन्याची चेन चोरल्याचा, तसेच मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण केवळ मारहाणीपुरते मर्यादित न राहता चोरी आणि जीविताला धोका निर्माण करणाऱ्या गंभीर आरोपांपर्यंत पोहोचले आहे.

या प्रकरणातील चार आरोपींमध्ये मंगेश दळवी, हरेश दळवी, रुपेश दळवी आणि रणजीत दळवी यांचा समावेश असल्याची माहिती आहे. मंगेश दळवी हे भाजपचे रायगड दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष असल्याने या प्रकरणाला राजकीयदृष्ट्याही महत्त्व प्राप्त झाले आहे.

आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी आरोपी लपून बसले आहेत, तरीही त्यांच्यापर्यंत पोलिसांचा हात का पोहोचत नाही? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, आरोपींना राजकीय वरदहस्त असल्यामुळे पोलिसांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात असल्याची चर्चा पेणमध्ये सुरू आहे. या चर्चेत किती तथ्य आहे, हे पोलिसांच्या पुढील कारवाईतूनच स्पष्ट होणार आहे. मात्र, गंभीर आरोप असलेल्या व्यक्तींना राजकीय संबंधांमुळे संरक्षण मिळत असेल, तर हा कायद्याच्या राज्यासाठी गंभीर इशारा ठरेल.

यापूर्वीच्या पूल चोरी प्रकरणातील पार्श्वभूमी आणि सध्याच्या वनगे प्रकरणातील गंभीर आरोप लक्षात घेता रणजीत दळवी याच्या संपूर्ण गुन्हेगारी पार्श्वभूमीची चौकशी करून त्याच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मोका) कारवाई करता येते का, याची तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.

मात्र मोका कायदा लागू करण्यासाठी कायद्यातील आवश्यक निकष पूर्ण होणे बंधनकारक आहे. त्यामुळे पोलिसांनी आरोपीची पूर्वीची प्रकरणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि सध्याच्या प्रकरणातील भूमिका यांचा सखोल तपास करून कायद्यानुसार कठोर निर्णय घेणे अपेक्षित आहे. आरोपी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असो अथवा कोणत्याही प्रभावशाली व्यक्तीशी त्याचे संबंध असोत, कायद्यापुढे सर्व समान आहेत, हे पोलिसांना कृतीतून दाखवावे लागणार आहे.

मयूर वनगे प्रकरणातील चारही आरोपींना अटक कधी होणार? आरोपींना खरोखरच राजकीय संरक्षण मिळत आहे का? पूल चोरी प्रकरणातील पार्श्वभूमीचा सध्याच्या गुन्ह्याशी काही संबंध आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रकरणात पोलिसांची पुढील कारवाई किती कठोर असणार? या प्रश्नांची उत्तरे आता पेणकरांना अपेक्षित आहेत.

## कोकणवासियांना बाप्पा पावला!

अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या भावविश्वाशी जोडलेला सण आहे. गणपती बाप्पा, कोकणवासीय आणि एसटी यांचे अतूट नाते आहे. त्यामुळे नफा–तोट्याचा विचार न करता चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी सज्ज आहे, असे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष बदला

गुरुवारी पार पडलेल्या या बैठकीला सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि प्रशांत किशोर यांच्या कोअर टीममधील दोन सदस्य प्रत्यक्ष उपस्थित होते, तर त्यांचे दुसरे पुत्र जय पवार हे ऑनलाइन सहभागी झाले होते. या बैठकीत किशोर यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत राज्यातील मुख्य नेतृत्व रणनीतीनुसार काम करत नाही आणि दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करत नाही, तोपर्यंत आपल्याला राज्यात काम करणे कठीण होईल.

सूत्रांच्या दाव्यानुसार, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी यापूर्वी तीनवेळा प्रशांत किशोर यांची भेट घेऊन पक्षाच्या संघटनात्मक रचनेबाबत चर्चा केली होती. त्या वेळी किशोर यांनी पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी आणि मरगळ झटकण्यासाठी काही महत्त्वाचे बदल सुचवले होते. मात्र, तीन बैठका उलटूनही सुचवलेल्या बदलांची किंवा धोरणांची अंमलबजावणी झाली नसल्याचे समोर आले आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडून सहकार्य मिळत नसल्यानेच पक्षाची रणनीती रखडल्याचे सांगत, भविष्यातील निवडणुकांसाठी आपले मार्गदर्शन अपेक्षित असेल तर प्रदेशाध्यक्ष पदाबाबत ठोस निर्णय घ्यावाच लागेल, अशी भूमिका प्रशांत किशोर यांनी मांडली.

## सव्वातीन लाखांचा मद्यसाठा जप्त

मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी विकास कदम आणि योगेश चीनकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. तर कारवाईदरम्यान एक आरोपी पसार झाल्याचे विभागाने सांगितले. जप्त केलेला मुद्देमाल महाड येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात जमा करण्यात आला आहे. ही कारवाई आयुक्त राजेश देशमुख यांच्या आदेशानुसार, संचालक प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त प्रदीप पवार आणि रायगडचे अधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. महाडचे निरीक्षक सतीश गावडे, दुय्यम निरीक्षक संतोष पिसाळ, अलिबागचे दुय्यम निरीक्षक बालाजी कांबळे यांच्यासह भरारी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

दिविल परिसरात गोवा बनावटीच्या मद्याची तस्करी आणि अवैध विक्री सुरू असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. त्यामुळे या कारवाईनंतर गोवा बनावटीच्या मद्याचा पुरवठा नेमका कुठून होतो आणि त्यामागे मोठे रॅकेट आहे का, याचा तपास उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. फरार आरोपीचा शोधही घेतला जात आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक अजित बागवे व आकृती अजित बागवे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १८ | १/अ | एकुण क्षेत्र १-००-३० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-४०-०० | १-९७ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०८/०८/२०२६

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यूबिल्डींग, तळमजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री.पितांबर खियालदास खत्री वगैरे ५ यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. माणगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८१ | १ | १-४०-९० | ३-६३ |

यापैकी श्री. पितांबर खियालदास खत्री वगैरे ५ यांचे मालकीची व हिश्याची ०-४०-९० हे.आर. क्षेत्राची मिळकत देणेचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०८/०८/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं.१२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड- ४१०१०१.
मो.- ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## जाहीर नोटीस

क्र. श्रीनप/कर विभाग/मालमत्ता हस्तांतरण/नोटीस/०७८९/२०२६. दिनांक ०७/०८/२०२६

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्या प्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने श्रीवर्धन नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्या प्रकरणा अनुसूची २ व ३ मधील नोटीसी नुसार अवर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह श्रीवर्धन नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | अनुसूची दोन/तीन | करनिर्धारण पुस्तकातील मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमतेचे स्वरूप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे किंवा अभिहस्तांतरण कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांतरण कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तीन | झेड २००१३३४ | चौकर पाखाडी | घर | शशांक भालचंद्र जामगावकर | कल्पना शशांक जामगावकर |

सही/-
**मुख्याधिकारी**
**श्रीवर्धन नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे भातसई, ता. रोहा, जि. रायगड येथील...**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री. अमित विजय उशिरकर व इतर | ३२९ | जिरायत ००-३२-४० पो.ख. ००-०७-८० एकूण ००-४०-२० | ७.४४ | खालसा |
| श्री. सिताराम आनंदा अल्वा व इतर १ | ३७७ | वरकस ०३-०५-०० पो.ख. ००-७१-०० एकूण ०३-७६-०० | २.६२ | खालसा |
| श्री. किशोर जयवंत म्हात्रे व इतर १ | ३७८ | वरकस ०३-०१-०० पो.ख. ००-७०-०० एकूण ०३-७१-०० | २.५६ | खालसा |
| श्रीमती माया सिताराम अल्वा व इतर १ | ३८०/१ | वरकस ०४-७२-०० पो.ख. ००-३०-०० एकूण ०३-७१-०० | ४.०६ | खालसा |
| श्रीमती माया सिताराम उर्फ सिगाराम आनंदा अल्वा व इतर १ | ३८०/२ | जिरायत ००-५९-०० पो.ख. ००-२०-०० एकूण ००-७९-०० | ०.५० | खालसा |
| श्री. रविंद्र नरहरी म्हात्रे | ३८६ | वरकस ०५-३८-०० पो.ख. ०१-२३-०० एकूण ०६-६१-०० | ४.६९ | खालसा |
| श्री. रविंद्र नरहरी म्हात्रे | ४३१ | वरकस ०३-५०-०० पो.ख. ००-५०-०० एकूण ०४-००-०० | ३.०६ | खालसा |

वरील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींचे संबंधात आमचे अशिल श्री. संजय शिवनाथ सराफ व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार करणेचा ठरविला होता त्यानुसार सदर सर्व मिळकतींचे आमचे अशिलांनी मिळकतीच्या मालकांबरोबर मे दुय्यम निबंधक सो. रोहा यांचे कार्यालयात रजिस्टर खरेदीखत रितसर केले असुन महसुल दप्तरी तलाठी सजा शेणवई यांचेकडे ७/१२ सदरी नोंद होणेसाठी रजिस्टर दस्त दिले असून आमचे अशिलांचे ७/१२ सदरी नाव लावणे संबंधी कायदेशीर कार्यवाही चालु आहे. सदर मिळकतीसंबंधात सदरच्या शेतजमिन मालकांशी कुणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये तसे केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याकरीता सदरची नोटीस दिली आहे. सदर मिळकतीपैकी कुठल्याही मिळकतीचा अन्य कुणास व्यवहार करणेचा झाल्यास आमच्या अशिलांना माहिती देणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास केलेला व्यवहार बेकायदेशीर समजण्यात येईल व आमचे अशिल संबंधीत व्यक्तींवर दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

दि.०३/०८/२०२६

सही
**ॲड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२. बी.वींग, चौथा मजला, साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १. निसार इस्माईल दळवी रा. २०७/२ खालचा मोहल्ला, धावीर रोड रोहा, पो. रोहा ता, रोहा जि. रायगड २. रफीक इस्माईल दळवी, ३. मुजफर इस्माईल दळवी, ४. कैसर ऊर्फ कैसरीजहॉ जहुर हुसेन दळवी ५. नाजीम इस्माईल धनसे क्र. २ ते ७ सर्व रा. मु. पो. रामराज, ता. अलिबाग, जि. रायगड ६. निलोफर जमीर नक्तारे रा. दत्तवाडी मुरुड जंजिरा, ता. मुरुड, जि. रायगड, ७. नाजीया निसार खान रा. रूम नं. ३७/३६ ७ वा मजला, १३०/१३२ अबुबकर मंजिल, मोहम्मद ओमर कोकाईल मार्ग, डोंगरी मुंबई नगर सर्व सज्ञान, यांच्या नांवे असलेल्या सामाईक मालकी हक्काच्या व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकती माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| राजेवाडी ता. अलिबाग जि. रायगड | २/१ | ०-६५-९० पो.ख. ०-०६-५० एकूण क्षेत्र ०-७२-४० | १८.९४ |
| रामराज ता. अलिबाग जि. रायगड | ३३५ | ०-३०-९० पो.ख. ०-०३-०० एकूण क्षेत्र ०-३३-९० | ८.१२ |

सदर मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझे स्नेही यांस दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांच्या मुदतीमध्ये प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकती निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ०७/०८/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६
संपर्क :- मनोहर सिताराम पाटील मो.नं. ९४२३३३१७१६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - गौरकामत, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १. रशिदा हुसेन चितलवाला २. मुर्तुझा हुसेन चितलवाला | ६६ | २/अ | ०-९०-१० | १-७२ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०७/०८/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी, मुद्रे बु. कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्रीकृष्ण रामचंद धारप कडून कायमची खरेदी करण्याचे विचारात आहोत. तरी नमूद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे. मौजे गुंडगे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र.हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| गुंडगे | ४७/३ | ०.०४.०० | ०.३१ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे विचारात आहोत. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूपत्रांकीतदान, कुळवहिवाट, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०८/२०२६

सही/-
**ॲड. कमलेश शिवधारी पाल**
बी.ए.एल.एल.बी.
घर नं.१७६, विश्व नगर, गुंडगे, ता.कर्जत, जि.रायगड-४१०२०१

## जाहिर नोटिस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळवण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. गजानन गापीनाथ चिखलकर, २) श्री. विजय विष्णू चिखलकर, ३) श्री. शैलेंद्र बाळकृष्ण चिखलकर, ४) श्री. वीरेंद्र रमाकांत चिखलकर, ५) श्री. दिपक कमलाकांत चिखलकर, रा. मु. आंबेपूर, ता. अलिबाग यांच्या मौजे तळबंद आणि मौजे. आंबेपूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या एकत्र कुटुंबाच्या सामाईक मालकीच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन :-**
१. मौजे तळबंद, गट नं. १/२/२९/१२
२. मौजे. आंबेपूर, गट नं. ७५/१
३. मौजे. आंबेपूर, गट नं. ७५/३
४. मौजे. आंबेपूर, गट नं. ७५/६
५. मौजे. आंबेपूर, गट नं. ६९/१/ई
६. मौजे. आंबेपूर, गट नं. ६९/१/क/१
७. मौजे. आंबेपूर, गट नं.६९/१/क/२
८. मौजे आंबेपूर, गट नं. ६९/१ /फ
९. मौजे आंबेपूर सिटी सर्व्हे नं. ३७८
१०. मौजे आंबेपूर सिटी सर्व्हे नं. ३७९
११. मौजे आंबेपूर सिटी सर्व्हे नं. ३८०

**घर मिळकती :-** १. ग्रामपंचायत आंबेपुर घर नं. २२३
२. ग्रामपंचायत आंबेपुर घर नं. २२४
३. ग्रामपंचायत आंबेपुर घर नं. २६३

वरील सर्व मिळकती या आमच्या अशिलांच्या एकत्र कुटंबाच्या व सामाईक मालकीच्या असून आजपर्यंत त्यांचे कोणतेही कायदेशीर विभाजन, वाटप अथवा हिस्सेवाटणी झालेली नाही. तथापि, काही सहहिस्सेदार अथवा इतर व्यक्ति सदर मिळकतीमध्ये बेकायदेशिररित्या त्रयस्थ व्यक्तिंचा हक्क निर्माण करण्याचा अथवा व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे सर्वसामान्य जनतेस जाहिर इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारचा विक्री व्यवहार, खरेदी, करारनामा, साठेखत, भाडेकरार, लिज, गहाण, दान, बोजा, कुळहक्क, दावा, वहिवाट किंवा कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार आमच्या अशिलांच्या सर्व कायदेशिर सहमालकांची लेखी संमती व सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय करू नये. असा कोणताही व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. व अशा बेकायदेशिर व्यवहार करणाऱ्या व्यक्तिविरूद्ध दिवाणी व फौजदारी स्वरूपाची योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल व त्या व्यवहारामुळे होणाऱ्या सर्व परिणामांची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यवहार करणाऱ्या व्यक्तिंची राहिल.

याशिवाय जर अनुसुचित जातीच्या सहमालकांच्या मालमत्ता हक्कावर अतिक्रमण, फसवणुक, धमकी, बेकायदेशीर कब्जा किंवा जातीय हेतुने त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तर संबंधितांविरूद्ध अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ तसेच इतर लागू असलेल्या कायदयानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ०७/०८/२०२६

**ॲड. महेश श्रीवर्धन म्हात्रे**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग, बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग, मो.नं.-९२२६८४७०७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता.उरण, जि.रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र. हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| १३०/१४७ | एकूण क्षेत्र ०-१६-४० हे. आर | २.१९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०८/०८/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे नागांव, ता. अलिबाग येथील मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| नागांव | १९९६ | ०-२४-८० पो.ख. ०-००-३० ०-२५-१० | रु.३.०६ | मिहीर अनिल नेरुरकर |
| नागांव | १९९७ | ०-०७-६० | रु.१.०० | समिर अनिल नेरुरकर |
| नागांव | १९९८ | ०-०८-३० | रु.१.०० | समिर अनिल नेरुरकर |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०८/०८/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ | आकारणी रु. पै |
|---|---|---|
| १७८/४ | एकूण क्षेत्र २-२७-०० हे. आर या पैकी मोहन गंगाराम खडेकर याचे खाते क्र.११० ज्याचे एकूण विक्री क्षेत्र १-४७-०० हे.आर या मिळकतीबाबत | ०.७० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०८/०८/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## Change in Name

I have changed my name from SUTHER PRAVEEN KUMAR VELARAM to PRAVEEN VELARAM SUTHAR as per Affidavit No. 2652041781268600143234 dated 07/08/2026

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे रांजणपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड गट नं. ८७ एकूण क्षेत्र ३-१८-५० हे. आर., आकार ४.९६ रुपये पैकी क्षेत्र ०-४०-०० हे.आर., आकार ०.७३ रू. पैसे ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक संजीव सुरजभाल गर्ग व रेणु संजीव गर्ग यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०७/०८/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे आक्षी, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.श्रीकांत पांडुरंग पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ३३९ | एकूण ०-३७-७० | ६.८७ |
| या मिळकतीपैकी उत्तर-पश्चिम दिशेकडील ०-०७-०० हे.आर इतके क्षेत्र | | |

सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचे मालक सांगत आहेत. तरी वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लिएन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधीच्या लेखी हरकती असल्यास खालील पत्त्यावर वकीलांना सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात कळवावे. निर्धारित कालावधीत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीवर कोणताही दावा/हरकत नाही असे समजून सदर मालमत्तेचा खरेदी व्यवहार माझ्या अशिल व नोंदणीकृत मालक यांच्या निर्देशानुसार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत व ते माझ्या अशिल यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस जाहीर व्हावे.

अलिबाग
दिनांक : ७/८/२०२६

सही/-
**ॲड.दिपा दिलीप जोग**
रा.ऑफिस क्र.२ कृष्णवंदन सीएचएस, कोर्ट रोड, अलिबाग-रायगड
मो.नं.७७७५८०२५०३

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

मौजे वाघोलीवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र.व उपविभाग क्र. २३५/१, एकुण क्षेत्र १.३०.००(हे.आर.), आकार ३.०० (रु. पैसे) या मिळकती पैकी मिन्नल प्रकाश दिलेहर सिंह पस्ताला यांच्या मालकी व हिस्याचे क्षेत्र ०.१५.५० (हे.आर) हे जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक - ०८/०८/२०२६.

**(ॲड. परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस.टी.स्टॅड जवळ, अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड
९८५०४८१२३४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की आमचे अशीलांनी श्रीमती उज्वला प्रभाकर शिर्के, रा.ढवर, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे खुद्द मालकीचे व प्रत्यक्ष ताबे कब्जे वहीवाटीतील खालील वर्णनाचे बिनशेती भुखंड व त्यातिल घरमिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशील व विद्यमान मालकाबरोबर झालेली आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| अ. नं. | मौजे | भू.मा.क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र | आकार | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|---|
| १) | ढवर ता.अलिबाग | २९१/१३ | १.६६.२५ | १६-६३ | उज्वला प्रभाकर शिर्के |
| २) | ढवर ता.अलिबाग | २९१/१४ | १.६३.५३ | १६-६३ | |

व सदर मिळकतीतील ग्रु.ग्रा.पं. ढवर, ता.अलिबाग येथील घर मिळकत

वर नमुद केलेले मिळकतीचे मालकीहक्क निर्वेध व बिनजोखमी असल्याचे व सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्याबाबत खातरजमा करण्याकरीता जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचे अशीलांनी आमच्याकडे दिलेले आहे.

सदरहू मिळकतीचे मालकीहक्क निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलस दिलेला आहे. सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाही व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार कोणत्याही करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, पोटगी, मुत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसुलवाद असल्यास त्यानी त्यांच्या लेखीहरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या आठ दिवसाचे मुदतीत खालील सही करणार यांच्याकडे दाखल कराव्यात. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकतीचे टायटल हे निर्वेध बोजाविरहित असल्याचे गृहित धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील व मग त्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे तमाम जनतेस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०८/०८/२०२६

**ॲड. श्री. अमेय अमेश म्हात्रे**
रा.''बोफोर्स'' श्रीबाग नं.२, ता.अलिबाग, जि.रायगड
जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग
मोबाईल नं. ९०११३९९८८७

## जाहीर नोटीस

दि. ०६/०८/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) संदेश विनायक रकवी २) महेश विनायक रकवी ३) रमाकांत रायप्रोलू सरमा यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | १३/१ | क्षेत्र ०-७९-५० पो.ख ०-०७-८० एकुण क्षेत्र ०-८७-३० | ६.२५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी संदेश विनायक रकवी वगैरे यांच्या हिश्याचे एकुण क्षेत्र ०-५६-६६ हे.आर या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२१-०० हे.आर ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. (पळी आंबेघर), पो. पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे सोगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या घर मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. राजेश मनोहर परब २. सौ. रश्मिता राजेश परब यांच्या नांवे असलेल्या घर क्र. ४८८ मिळकतीपैकी अविभक्त हिस्सा नं. १ ची मावशी सौ. अरुणा प्रकाश मालकर (पूर्वाश्रमीची अरुणा रामचंद्र मल्हार) हिचे नांवे ग्रुप ग्रामपंचायत मापगाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या कार्यालयामध्ये ॲसेसमेंट दप्तरी नोंद करण्याबाबत.

**मिळकतीचे वर्णन**

सदरील घर क्र. ४८८ मधील लिहून देणार श्री. राजेश मनोहर परब हा स्वतः स्वखुशीने त्याची मावशी संमतीपत्र लिहून घेणार सौ.अरुणा प्रकाश मालकर (पूर्वाश्रमीची अरुणा रामचंद्र मल्हार) हिच्या नांवे सदर घर क्र. ४८८ या घर मिळकतीचे विभाग करुन घर क्र.४८८ अ व ४८८ ब असे विभाजन करण्यात येवून तशी नोंद ग्रुप ग्रामपंचायत मापगाव ॲसेसमेंट दप्तरी करण्यात येवून त्यापैकी पहिल्या मजलावरील घर क्र. ४८८ब, क्षेत्र २४X३४ चौ. फूट या घर मिळकतीच्या ॲसेसमेंट दप्तरी संमतीपत्र लिहून घेणार हिचे नावाची नोंद करण्यास संमतीपत्र लिहून देणार १. श्री. राजेश मनोहर परब २. सौ. रश्मिता राजेश परब यांची कोणतीही हरकत नसून पूर्ण संमती आहे. तरी ग्रुप ग्रामपंचायत मापगाव ॲसेसमेंट दप्तरी करण्यात येवून त्यापैकी पहिल्या मजलावरील घर क्र. क्षेत्र २४ X३४ चौ. फूट ही घर मिळकत सौ.अरुणा प्रकाश मालकर (पूर्वाश्रमीची अरुणा रामचंद्र मल्हार) हीचे नाव लावण्यात येवून तसा ॲसेसमेंट उतारा देण्यास १. श्री.राजेश मनोहर परब २. सौ.रश्मिता राजेश परब यांची कोणतीही हरकत नसल्याबाबत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे व त्याबाबत तसा अर्ज व संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र लिहून घेणार व लिहून देणार यांनी दिलेले आहे.

सदर मिळकतीबाबत कोणास काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी या घर मिळकतीबाबत योग्य त्या कागदपत्रांसहीत खालील वकिलांकडे कळवावे, ही विनंती.

दिनांक : ०७/०८/२०२६

सही/-
**ॲड. विनित सुनील अनमाने**
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **पाटील अँड शेख अकॅडमी** SSC, HSC, BA, B.COM, B.SC. उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच ११ऑगस्ट २०२६ पासुन सकाळी आणि संध्याकाळी सुरु होणार आहे. प्रवेश सुरू झाले ९७५७०९९९२३
- **दिशा पॅथॉलॉजी लॅब, मध्ये नोकरीची संधी!** १) नर्स १ पद(चोंढी शाखा ) अनुभवी / फ्रेशर्स दोन्ही अर्ज करू शकतात. वेळ : डे शिफ्ट २) डिलिव्हरी बॉईज २-पदे -(अलिबाग शहर) स्वतः चे टू-व्हीलर व वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क : ८५५२८ ५५२८८ दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. आप्तेष्टांच्या भेटीगाठी होतील. विद्यार्थ्यांचा कलांना वाव मिळेल.
- **वृषभ** : आजची कामं आजच करा. कायदेशीर बाबतीत दिलासा मिळेल. मोठ्या खरेदीचा उत्साह राहील.
- **मिथुन** : चैनीवर अधिक खर्च होईल. प्रेम प्रकरणात वाद-विवाद संभवतात. स्थावर प्रश्न प्रलंबित राहील.
- **कर्क** : सुवार्ता कानी येईल. छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील.
- **सिंह** : आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. बोलण्यातून गैरसमज संभवतात. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कन्या** : नोकरीत कामाचा उत्साह वाढेल. व्यवसायातील अडचणी दूर होतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **तूळ** : आत्मविश्वासानं कार्यरत रहाल. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. मुलांच्या संगतीबाबत काळजी घ्या.
- **वृश्चिक** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. अल्प प्रयत्नात यश मिळेल. थोरांचा सहवास लाभेल.
- **धनु** : जुनी येणी रखडतील. वास्तुसबंधी प्रश्न नव्याने उद्भवतील. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळेल.
- **मकर** : ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल. स्वमताग्रह टाळणंच हिताचं ठरेल.
- **कुंभ** : प्राप्तीत अपेक्षित वाढ होईल. कौटुंबिक समारंभाचे बेत ठरतील. स्थावर प्रश्नात समाधान लाभेल.
- **मीन** : नोकरीत कामाचा ताण राहील. पाहुण्यांच्या गाठीभेटी होतील. मिळालेल्या संधींचा लाभ घ्या.

स्टाईल स्टेटमेंट

## फॅशनेबल योगा सेशनसाठी...

✲ अ‍ॅथलेजर म्हणजे व्यायामासाठी वापरल्या जाणाऱ्या कपड्यांमध्ये सध्या जीम जीन्सचा भाव वधारला आहे. अत्यंत लवचिक आणि आरामदायी अशा या डेनिम्स योगा सेशनसाठी बेस्ट ठरतात. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवण्यात आलेल्या या जीन्स झटपट वाळतात. चारही बाजूंनी ताणल्या जातात. यामुळे व्यायाम करताना खूप आरामदायी वाटतं. या जीन्सवर कॉटन टी शर्ट घालता येईल. ✲ योगा पँट्स किंवा लेगिंग्ज हा सुधा चांगला पर्याय आहे. संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी कम्फर्टेबल फॅब्रिकपासून तयार केलेल्या योगा पँट्स वापरणं योग्य ठरतं. या पँट्स घाम शोषून घेत असल्यामुळे त्वचेला त्रास होत नाही. ✲ सायकलिंग शॉर्टसही कॅरी करता येतील. सध्या बऱ्याच सेलिब्रिटी अशा शॉर्टस कॅरी करताना दिसतात. आंतरराष्ट्रीय स्तरावरही ही फॅशन हिट ठरते आहे. त्यावर हुडीज किंवा टी शर्ट घालता येईल. या शॉर्टस ताणल्या जातात. यामुळे पोटाच्या खालच्या भागाला आकार येतो. त्यामुळे स्टायलिश आणि सुपर कूल सायकलिंग शॉर्टसचा ऑप्शन तुम्ही निवडू शकता.

## ८ ऑगस्ट

दिन विशेष

- **२०१३** : ख्यातनाम अभिनेत्री जयमाला शिलेदार यांचं निधन.
- **२०१५** : बिहारच्या राज्यपालपदी रामनाथ कोविंद तर हिमाचलच्या राज्यपालपदी आचार्य देवव्रत यांची नियुक्ती.
- **२०१७** : दीपक मिश्रा यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती.
- **२०१८** : मलेशियचे माजी पंतप्रधान नजिब रझाक यांच्याविरोधात अब्जावधी डॉलरच्या आर्थिक गैरव्यवहाराचा नवा आरोप ठेवण्यात आला.

टेक फन

## थ्रीडी फोटो काढणारे भन्नाट गॉगल

स्नॅपचॅट या मेसेजिंग अ‍ॅपने एक भन्नाट गॉगल तयार केला आहे. 'स्पेक्टिकल ३' असं या गॉगलचं नाव आहे. या गॉगलने तुम्ही थ्रीडी फोटोग्राफी करू शकता. यात ऑग्मेंटेड रिअ‍ॅलिटी तंत्रज्ञान वापरण्यात आलं आहे. यामुळे कॅमेऱ्याने काढलेले फोटो आणि रेकॉर्ड केलेले व्हिडिओ स्नॅपचॅटवर शेअर करता येतील. या गॉगलच्या दोन्ही कोपऱ्यात एचडी कॅमेरा बसवण्यात आला आहे. यातल्या ऑग्मेंटेड रिअ‍ॅलिटी टूलमुळे फोटो आणि व्हिडिओ जास्त आकर्षक करता येतील. म्हणजेच दोस्तांनो, तुम्ही तुमच्या कल्पनाशक्तीला चालना देऊ शकाल. यात फोटोला लायटनिंग, लँडस्केप आणि इतर बरेच इफेक्ट्स देण्याची सोय आहे.

स्नॅपचॅटने याआधी २०१६ मध्ये असे गॉगल बाजारात आणले होते. पण त्यात थ्रीडी फोटो घेण्याची सोय नव्हती. पण त्यांचा हा नवा गॉगल भन्नाट आहे. यात दोन बटणं देण्यात आली आहे. यापैकी एक बटण दाबून ६० सेकंदांचा व्हिडिओ रेकॉर्ड करता येईल. फोटोग्राफीसाठीही यापैकी एक बटण दाबावं लागेल. हे फोटो पाहण्यासाठी स्मार्टफोनमध्ये काही अ‍ॅप्स डाउनलोड करावी लागतील. त्यामुळे हा गॉगल घातला की फोटो काढण्याची काळजीच मिटली.

### पंचांग

**शनिवार, ८ ऑगस्ट २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, आषाढ कृ. १०, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : रोहिणी, योग : ध्रुव,व्याघात, सूर्योदय ६.२०, सूर्यास्त ७.०९

### फॉरवर्ड्स

**नाराज़गी भीं एक़ ख़ूबसूरत रिश्ता हैं...**

**ज़िससें होतीं हैं...**

**वो दिल औऱ दिमाग़ दोनों में रहता हैं...!**

आरोग्यमंत्र

## ...तर मेंदू सक्षम राहील

शरीराच्या सर्व क्रियांवर नियंत्रण ठेवणाऱ्या मेंदू या महत्त्वपूर्ण अवयवाची विशेष काळजी घ्यायला हवी. यादृष्टीने दैनंदिन आयुष्यात कळत-नकळत केल्या जाणाऱ्या चुकांमुळे मेंदूच्या आरोग्यावर काय परिणाम होतो हेदेखील लक्षात घ्यायला हवं.

✲ अतिसाखर मेंदूला मारक ठरते. आपण खात असलेल्या प्रत्येक पदार्थात साखर असते. त्यातच प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांचं सेवन करण्याचं प्रमाण बरंच वाढलंय. अशा पदार्थांमध्ये अधिक प्रमाणात साखर असते. बऱ्याच काळपर्यंत साखरेचं



अतिसेवक करत राहिल्याने शरीराची पोषक घटक शोषून घेण्याची क्षमता कमी होते. यामुळे कुपोषणाची समस्या निर्माण होते. कुपोषणामुळे मेंदूच्या कार्यावर परिणाम होतो. अतिसाखरेमुळे शरीराला आवश्यक ते पोषक घटक मिळत नाहीत. अपुऱ्या पोषक घटकांमुळे मेंदूच्या कार्यात अडथळे निर्माण होतात. ✲ मेंदू कार्यक्षम राहण्यासाठी ऑक्सिजनची आवश्यकता असते. शहरांमधल्या वाढत्या प्रदुषणामुळे शरीराला ऑक्सिजनचा पुरवठा कमी प्रमाणात होतो. ऑक्सिजन मेंदूपर्यंत पोहचू शकत नाही आाणि मेंदूचं कार्य मंदावतं. ✲ अतिखाण्यामुळे वजन वाढतं शिवाय मेंदूतल्या धमन्या कठीण होतात आणि मेंदूची कार्यक्षमता कमी होते. ✲ आपला मेंदू स्नायूप्रमाणे आहे. त्याला ताण द्यायला हवा. मेंदूला ताण दिला तर तो अधिक चांगल्या प्रकारे काम करू शकतो.

### वेगळ्या वाटा

इंजिनिअरींग क्षेत्राशी संबंधित विद्यार्थी क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये करिअर करू शकतात. यासोबतच 'जावा लँग्वेज' वर प्रभुत्व असणाऱ्यांसाठीही हे क्षेत्र खुलं आहे. क्लाउड कॉम्प्युटिंगच्या क्षेत्रात 'लॉजिकल रिजनिंग'चं ज्ञान उपयोगी पडेल. क्लाउड कॉम्प्युटिंगचं ज्ञान मिळवण्याआधी विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रोग्रामिंग शिकावं लागेल.

क्लाउड कॉम्प्युटिंगचे ऑनलाईन अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. यासोबतच 'गुगल क्लाउड', 'एज्योर' आणि 'एडब्ल्यूएस'सारख्या व्यासपीठांकडूनही तुम्ही प्रमाणपत्रं मिळवू शकता.

करिअरवाटा

## अर्ज हवा आकर्षक

नोकरी मिळवताना रिझ्यूम तयार करण्याबाबत दक्षता घेतली तर पात्रतेनुसार नोकरी मिळणं सोपं जातं. याबाबत लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे अनेक कंपन्यांमध्ये रिझ्यूमची प्रारंभिक पडताळणी किंवा छाननी यांत्रिक पद्धतीने होते. त्यामुळे रिझ्यूममध्ये तांत्रिक चुका असल्यास छाननीत अर्ज बाद होऊ शकतो. काही कंपन्यांमध्ये काही कीवर्ड निश्चित झालेले असतात आणि



त्यांच्या आधारे आपली माहिती द्यावी लागते. डोमेन एरिया, स्कील्स्, डेसिग्नेशन असे ते विशिष्ट शब्द असतात. त्याच्या आधारे पहिली छाननी होते. रिझ्यूमची छाननी करताना पहिल्या सहा सेकंदांमध्ये संबंधित तीनच गोष्टी प्राधान्याने बघत असतात. हा उमेदवार आता कुठे आहे, या पूर्वीच्या त्याने काम केलेल्या दोन कंपन्या कोणत्या, त्या कंपन्यांमध्ये तो कोणत्या पदावर काम करत होता आणि त्याची शैक्षणिक पात्रता काय? या तीन बाबी नवी नोकरी मिळवण्यासाठी जुळत आहेत हे अर्जातून पटकन दिसले पाहिजे. काही विद्यार्थ्यांना रिझ्यूम टाईप करताना उगाचच चित्र-विचित्र फाँट वापरण्याची सवय असते. पण फार अलंकारिक फाँट न वापरता टाईम्स रोमन किंवा एरियल यासारखा व्यवहारात नेहमी वापरला जाणारा फाँट वापरावा. याचा फायदा होतो.

खेचाखेची

### शस्त्रक्रिया

**डॉक्टर** (ऑपरेशन टेबलवरच्या रुग्णाला) : तुम्हाला घाबरायला काय झालं? घाबरु नका. काही होणार नाही.

**रुग्ण** : डॉक्टर, माझं हे पहिलंच ऑपरेशन आहे.

.
.
.
.

**डॉक्टर** : बघा, माझंही हे पहिलच ऑपरेशन आहे, तरीही मी घाबरलेलो नाही.

### वेगळं काही

जेसीबी ही भारतात कारखाना सुरू करणारी पहिली खासगी ब्रिटिश कंपनी आहे. आज जेसीबी उपकणांची सर्वाधिक निर्यात भारतातच केली जाते. १९४५ मध्ये जोसेफ बमफोर्ड यांनी सर्वात पहिल्यांदा एक टिपिंग टेलर तयार केला होता. जेसीबीने १९९१ मध्ये जगातला सर्वात जलद फास्टट्रॅक नावाचा ट्रॅक्टर तयार केला होता. १९४८ मध्ये या कंपनीत फक्त सहा लोक काम करत होते. सुरूवातीच्या काळात जेसीबी उपकरणांना लाल आणि पांढरा रंग दिला जायचा. मात्र नंतर हे उपकरण पिवळ्या रंगात उपलब्ध करून देण्यात आलं. पिवळ्या रंगामुळे हे उपकरण कधीही दिसू शकतं आणि खोदकाम सुरू असल्याची जाणीव लोकांना होते.

ट्रेंडी

## घराला द्या फ्लोरल लूक

फुलझाडांवर सर्वदूर घनघोर पाऊस होत असल्यामुळे निसर्ग फुलला आहे. विविध फुलांचे गुच्छ लगडत आहेत. तेव्हा या निसर्गदरबाराचं प्रतिबिंब घरातही दिसायला हवं. त्याचेच हे फंडे...



✲ घरात लाकडी फर्निचर असावं अशी प्रत्येकीची इच्छा असते. पण या फर्निचरची सतत देखभाल करावी लागते. कालांतराने ते जुनं दिसू लागतं. पण एका सोप्या युक्तीने तुम्ही फर्निचरला नवीन लूक देऊ शकता. यासाठी तुम्हाला बाजारातून फ्लोरल प्रिंटचा वॉलपेपर आणावा लागेल. हा वॉलपेपर फर्निचरवर चिटकवून तुम्ही फ्लोरल लूक देऊ शकता. स्वत: पेंटिंग करूनही फर्निचर सजवता येतं.

✲ बरेचदा मुलांच्या अभ्यासाकरता नकाशा आणला जातो. कालांतराने त्याचा वापर थांबतो. याच नकाशापासून तुम्ही वेगवेगळ्या प्रकारची फुलं बनवून घराला फ्लोरल लूक देण्यासाठी ती फुलदाणीत सजवू शकता. ही फुलं आकर्षक दिसतात. नकाशात अनेक रंग असतात शिवाय कागद गुळगुळीत असतो. त्यामुळेच फुलं छान दिसतात. मुख्य म्हणजे यामुळे धूळ खात पडलेल्या नकाशाचाही सुयोग्य वापर होतो.

## सुडोकू १३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ८ | | | | | ३ | ६ |
| | ३ | | ६ | | | | | ७ |
| ५ | ९ | | | ३ | ४ | २ | १ | |
| २ | | ७ | ८ | ६ | | ३ | | ९ |
| ८ | | | | ९ | | | | ५ |
| ९ | | ३ | | ४ | ७ | १ | | २ |
| | ७ | २ | १ | ५ | | ८ | ९ | ४ |
| ४ | | | | | ९ | | ६ | |
| ६ | १ | | | | | ५ | | |

**टीप -**
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ६ | ५ | ३ | ९ | २ | ७ | ८ |
| २ | ७ | ८ | १ | ४ | ६ | ५ | ३ | ९ |
| ९ | ३ | ५ | २ | ८ | ७ | ४ | ६ | १ |
| ८ | ५ | २ | ३ | १ | ४ | ६ | ९ | ७ |
| ३ | १ | ९ | ७ | ६ | २ | ८ | ५ | ४ |
| ७ | ६ | ४ | १ | ५ | ८ | ३ | १ | २ |
| ६ | २ | १ | ८ | ९ | ३ | ७ | ४ | ५ |
| ४ | ९ | ७ | ६ | २ | ५ | १ | ८ | ३ |
| ५ | ८ | ३ | ४ | ७ | १ | ९ | २ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक १३५

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ■ | ८ | | ९ | स |
| १० | | | ११ | ■ | १२ | | | ■ | १३ | | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | १४ | | | ■ | १५ | १६ | | ■ | | ■ | १७ | १८ |
| १९ | | २० | | ■ | २१ | | ■ | २२ | | २३ | | २४ | ■ | |
| | ■ | | ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | २९ | |
| ३० | | | ३१ | ■ | ■ | ३२ | | | | ■ | ३३ | ■ | | ■ |
| | ■ | ३४ | | ३५ | | | | ■ | ३६ | ३७ | | | | ३८ |
| ■ | ३९ | ■ | ४० | | ■ | | ■ | ४१ | | | | ■ | ४२ | |
| ४३ | ■ | ४४ | | ■ | ४५ | ■ | ४६ | | ■ | ४७ | | ४८ | ■ | ■ |
| ४९ | ५० | | | ■ | | ■ | ५१ | | ५२ | ■ | ५३ | | ५४ | ५५ |
| ५६ | | ■ | ५७ | ५८ | | ५९ | | ■ | ६० | | ■ | ६१ | | |
| | ■ | ६२ | ■ | | ■ | | ■ | ६३ | | ■ | ६४ | | ■ | |
| ६५ | ६६ | ■ | ६७ | | ६८ | ■ | ६९ | | | ७० | ■ | ■ | ७१ | ■ |
| ७२ | | | ■ | ७३ | | ७४ | | ■ | ७५ | | ■ | ७६ | | |
| ■ | | ■ | ७७ | | ■ | ७८ | | ■ | ७९ | | | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) बातमी
४) बगल
६) जाणून-बुजून, हटकून
८) अधिक महिना
१०) लिंबू, साखर पाण्याचे पेय
१२) तुकडा, चावा
१३) पिता
१४) वेदना
१५) पत्र
१७) पृथ्वी
१९) एक आदिवासी जमात
२१) कुबेराचा सेवक
२२) एकाद्याच्या वतीने घातलेली भीड
२५) हाण! मार!
२७) धपाटा
२८) ओलसर हवा
३०) मर्यादा हद्द
३२) कोलकाताचे विमानतळ
३४) बारीक -सारीक
३६) आपले राष्ट्रगीत
३९) मान्यतेचा शब्द
४०) टिंगल
४१) ✲✲✲✲ कमीज एक पोषाख
४२) सत्ता
४४) दोरा
४६) प्रामाणिक
४७) रत्न
४९) फांदी तुटतानाचा आवाज
५१) धोका
५३) साल
५६) अवघड, कडक (इं )
५७) कमीतकमी
६०) माफ
६१) संगीतातील एक राग
६२) जोखड
६३) चामखीळ
६४) त्वरा
६५) बशीचा जोडीदार
६७) चाबूक
६९) थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
७२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७३) दुर्गंधी येऊ लागलेला
७५) बारीक खांब
७६) युद्ध
७७) गीत
७८) दही घुसळण्याचे साधन
७९) पोलीस

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) भरभराट
३) घासणे (इं)
५) दुष्ट माणूस
६) गुमान, मुकाट्याने
७) टप्प्याटप्पा घेत घेत
८) मध
९) गुरुजी
११) सिद्धता
१६) झाडाभोवतीचा कट्टा
१८) चीर, भेग, फट
१९) मंगळवेढ्यात जन्मलेली एक स्त्री संत
२०) तलवार
२३) कलंक
२४) घोडा, गाढवाची विष्ठा
२६) फूल, पुष्प
२९) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
३२) पानासकट कोवळी फांदी
३३) समुद्रकिनारा
३५) पुरुष
३७) बाज विणण्याची कापडी पट्टी
३८) नूतन
४१) नवऱ्याची दुसरी पत्नी
४३) सरसकट
४४) भीती, वचक, दरारा
४५) गवंड्याकडील दोरीचे एक साधन
४६) शर्करा
४८) मवाळ धोरण
५०) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५२) जबरदस्तीने लावलेला विवाह
५४) लोकर (इं )
५५) मध्यस्थ
५८) लज्जास्पद
५९) स्थान, जागृत
६३) अंत:करण
६६) वारा
६८) मच्छर
६९) सटवाई, दुष्ट स्त्री
७०) छोटी विश्रांती
७१) मृत्यु नसलेला
७४) हात
७६) सदोदित, नेहमी

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | रा | त | ■ | मा | ■ | व | ■ | हे | ळ | सां | ड | ■ | सा | फ |
| न | ■ | ळ | ■ | ला | म | ण | दि | वा | ■ | गा | र | वा | ■ | जि |
| मा | सा | ■ | त | मा | ■ | वा | ल | ■ | स | डा | ■ | रे | व | ती |
| ला | ल | न | पा | ल | न | ■ | दा | द | र | ■ | ■ | मा | न | ■ |
| ■ | स | र | स | ■ | स | म | र | स | ■ | क | ल | प | ■ | का |
| ख | ■ | के | ■ | का | न | न | ■ | रा | ज | व | ट | ■ | सा | प |
| स | रा | स | री | ■ | ख | न | न | ■ | र | ■ | का | ल | व | ड |
| ख | ■ | री | ■ | पा | व | ■ | द | म | दा | टी | ■ | व | ध | ■ |
| स | भा | ■ | डा | को | डा | क | ■ | क | ■ | का | र | ण | ■ | द |
| ■ | र | त | ■ | ळी | ■ | म | नो | ब | ल | ■ | ख | ■ | श | र |
| रा | त | सा | र | ■ | आ | ळ | ■ | रा | स | ग | र | बा | ■ | बा |
| ज | ■ | च | म | त्का | र | ■ | प | ■ | ल | ■ | खी | ■ | आ | र |
| भ | ट्टी | ■ | णी | ■ | सा | प | ट | ■ | स | व | त | ■ | भा | ■ |
| व | ■ | पा | य | ल | ■ | खा | ल | सा | ■ | प | ■ | बा | ळ | से |
| न | र | क | ■ | व | की | ल | ■ | रा | म | न | ग | री | ■ | ना |

# कलासक्त



## 'रामायणम'ची अग्निपरीक्षा!

रणबीर कपूर, साई पल्लवी आणि यश यांची प्रमुख भूमिका असलेला बहुचर्चित चित्रपट 'रामायणम' अजून प्रदर्शितही झालेला नाही; पण त्याची चर्चा मात्र रंगात आली आहे. कारण आहे श्री रामलीला महासंघाची भूमिका. महासंघाने चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी त्यांना विशेष प्रीव्ह्यू दाखवावा, अशी मागणी केली आहे. त्यांच्या मते, २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आदिपुरुष' चित्रपटातील काही दृश्यांवर मोठा वाद झाला होता. त्यामुळे 'रामायणम'मध्येही धार्मिक भावना दुखावणारे प्रसंग किंवा संवाद असतील का, याची आधी खात्री करून घ्यावी, अशी त्यांची भूमिका आहे. महासंघाचे अध्यक्ष अर्जुन कुमार यांनी दिग्दर्शक नीतेश तिवारी आणि निर्मात्यांना याबाबत पत्र पाठवले असून, मागणी मान्य न झाल्यास चित्रपटगृहाबाहेर आंदोलन करण्याचाही इशारा दिला आहे. ही मागणी केवळ भारतापुरती नसून, परदेशातील प्रदर्शनापूर्वीही प्रीव्ह्यू व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. ही मागणी आणि आंदोलनाचा इशारा दिल्याची माहिती विविध वृत्तसंस्थांनी प्रसिद्ध केली असून ती अधिकृतरीत्या समोर आली आहे.

या घडामोडींमुळे 'रामायणम'भोवती पुन्हा एकदा उत्सुकतेचे वादळ निर्माण झाले आहे. चित्रपटाचा ट्रेलर भव्य दृश्यांनी सजलेला असून रणबीर कपूर प्रभू राम, साई पल्लवी सीता, तर यश रावणाच्या भूमिकेत दिसत आहेत. सनी देओल हनुमानाची भूमिका साकारणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. ट्रेलरमध्ये राम-सीतेचा विवाह, वनवास, सीतेचे अपहरण आणि राम-रावण युद्धाची झलक पाहायला मिळते. संगीतासाठी हान्स झिमर आणि ए. आर. रहमान ही जोडी एकत्र आल्याने चित्रपटाची भव्यता आणखी वाढली आहे. निर्माते आधीपासूनच जागतिक स्तरावर या चित्रपटाचे सादरीकरण करण्याच्या तयारीत आहेत आणि प्रचारासाठीही वेगवेगळे उपक्रम राबवत आहेत.





चित्रपटसृष्टीत एक गोष्ट नेहमीच पाहायला मिळते, मोठा चित्रपट असेल, मोठी स्टारकास्ट असेल आणि विषय धार्मिक किंवा ऐतिहासिक असेल, तर त्याभोवती चर्चा आणि वादही ओघाने येतात. 'रामायणम'च्या बाबतीतही सध्या असेच चित्र दिसत आहे. मात्र अद्याप चित्रपट प्रदर्शित झालेला नसल्याने त्यातील आशयाबाबत कोणतेही निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. महासंघाने प्रीव्ह्यूची मागणी केली असली, तरी निर्मात्यांकडून त्यावर अधिकृत प्रतिसाद आलेला नाही.

## 'महाप्रभू जगन्नाथ'ला हिरवा कंदील




चित्रपट, श्रद्धा आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांचा संगम झाला की चर्चा रंगतेच. यावेळी चर्चेच्या केंद्रस्थानी आहे 'महाप्रभू जगन्नाथ' हा ॲनिमेशन चित्रपट. चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती द्यावी, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावत चित्रपटाला प्रदर्शित होण्याचा मार्ग मोकळा केला. सुनावणीदरम्यान ओडिशा सरकारच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, भगवान जगन्नाथ यांचे चित्रण डोरेमॉन किंवा स्पायडर-मॅनसारख्या ॲनिमेशन शैलीत करता येणार नाही. त्यावर चित्रपट निर्मात्यांच्या बाजूने असा दावा करण्यात आला की, देवतेचा कोणताही अवमान करण्यात आलेला नाही आणि चित्रपटाची विशेष स्क्रीनिंगही संबंधितांना दाखवण्यात आली होती. या संपूर्ण वादात न्यायालयाने एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, न्यायालय कला आणि सर्जनशीलतेवर निर्णय देऊ शकत नाही. एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन करण्याचे काम न्यायालयाचे नसून, कलाकारांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे 'महाप्रभू जगन्नाथ'भोवती रंगलेला हा वाद केवळ एका चित्रपटापुरता मर्यादित न राहता कला आणि श्रद्धा यांच्यातील समतोलाचा चर्चेचा विषय ठरला.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने केलेली निरीक्षणेही तितकीच लक्षवेधी होती. न्यायालयाने म्हटले की, जर प्रत्येक देवतेच्या चित्रणावर आक्षेप घेतला गेला, तर भविष्यात रामायण, महाभारत किंवा इतर पौराणिक कथांवर चित्रपट, मालिका किंवा ॲनिमेशन तयार करणेच अशक्य होईल. भारतात वाल्मिकी रामायण, कबीर रामायण, स्कंद रामायण अशा अनेक परंपरा आहेत आणि प्रत्येक कलाकाराला त्या आपल्या शैलीत मांडण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने (सीबीएफसी) चित्रपटाला प्रमाणपत्र दिल्यानंतर न्यायालयाने त्यात सहज हस्तक्षेप करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे, न्यायालयाने जुन्या काळातील 'यशोधाम'सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा उल्लेख करत, लोक रात्री एकत्र येऊन वर्गणी गोळा करून धार्मिक आणि सांस्कृतिक सादरीकरणे पाहत असत, याची आठवण करून दिली. मुलांसाठी तयार होणाऱ्या ॲनिमेशन चित्रपटांकडेही त्याच व्यापक दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे न्यायालयाने सांगितले. या निरीक्षणांमुळे सुनावणीला केवळ कायदेशीर नव्हे, तर सांस्कृतिक संदर्भही लाभला.

चित्रपटसृष्टीत धार्मिक विषयांवर आधारित चित्रपट किंवा मालिका आल्या की चर्चा, मतभेद आणि वाद निर्माण होणे नवे नाही. मात्र या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला संदेश अनेकांसाठी महत्त्वाचा ठरला. श्रद्धा जपतानाच कलात्मक अभिव्यक्तीलाही स्थान असले पाहिजे, हा समतोल राखण्याचा प्रयत्न न्यायालयाच्या निरीक्षणांत दिसून आला. या चित्रपटाला यापूर्वी ओडिशा उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली होती.

## 'स्पायडर-मॅन'चं विक्रमी कमाईचं 'जाळं'

टॉम हॉलंडचा 'स्पायडर-मॅन : ब्रँड न्यू डे' प्रदर्शित होताच जगभरातील चित्रपटगृहांवर अक्षरशः धडकला आहे. अवघ्या चार दिवसांत या सुपरहिरो चित्रपटाने जागतिक बॉक्स ऑफिसवर सुमारे ९२७ दशलक्ष डॉलर्सची, म्हणजेच सुमारे ८,८१९ कोटी रुपयांहून अधिक कमाई करत इतिहास रचला आहे. ही कामगिरी मार्व्हल सिनेमॅटिक युनिव्हर्समधील सर्वात मोठ्या ओपनिंगपैकी एक मानली जात आहे. 'ॲव्हेंजर्स: एंडगेम'नंतर पहिल्याच विकेंडमध्ये सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत या चित्रपटाने दुसरे स्थान मिळवले आहे. भारतातही या चित्रपटाची जादू तितकीच जबरदस्त पाहायला मिळत आहे. चार दिवसांत चित्रपटाने सुमारे २५६ कोटी रुपयांची नेट, तर ३०६ कोटी रुपयांपेक्षा अधिक ग्रॉस कमाई केली आहे. विशेष म्हणजे हिंदी आवृत्तीला मिळालेला प्रतिसादही प्रचंड आहे. रविवारी हिंदी शोमध्ये सुमारे ९५ टक्के प्रेक्षक उपस्थिती नोंदवली गेली. इंग्रजीसह हिंदी डब आवृत्तीलाही मोठ्या प्रमाणावर प्रेक्षक मिळाल्याने




भारतात हॉलिवूड चित्रपटांचा वाढता प्रभाव पुन्हा एकदा स्पष्ट झाला आहे. अवघ्या चार दिवसांत इतकी मोठी कमाई करून 'स्पायडर-मॅन: ब्रँड न्यू डे'ने केवळ विक्रमच केला नाही, तर इतर मोठ्या चित्रपटांसमोरही मोठे आव्हान उभे केले आहे. या सुपरहिरोच्या तुफानी यशामुळे इतर मोठ्या चित्रपटांच्या कमाईवरही परिणाम झाल्याचे चित्र दिसत आहे. ख्रिस्तोफर नोलन यांचा 'द ओडिसी' हा चित्रपट जागतिक स्तरावर सुमारे ९११ दशलक्ष डॉलर्सचा टप्पा गाठूनही चर्चेचा केंद्रबिंदू ठरू शकला नाही, कारण स्पायडर-मॅनच्या विक्रमी कमाईने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भारतात 'द ओडिसी'ने १७ दिवसांत जवळपास १५० कोटी रुपयांची नेट कमाई केली असून, जागतिक स्तरावर तो लवकरच एक अब्ज डॉलर्सच्या क्लबमध्ये प्रवेश करेल, अशी अपेक्षा आहे. दुसरीकडे, थलपती विजयचा राजकीय ॲक्शनपट 'जन नायकन'ही स्पर्धेत टिकून आहे. दहाव्या दिवसानंतर या चित्रपटाची भारतातील नेट कमाई सुमारे १७५ कोटी रुपयांवर पोहोचली असली, तरी २०० कोटी रुपयांच्या बजेटमुळे पुढील आठवड्यांतील कमाई त्याच्यासाठी निर्णायक ठरणार आहे. अजय देवगण, रितेश देशमुख आणि अरशद वारसी यांचा 'धमाल ४'ही अजून थिएटरमध्ये टिकून आहे. चौथ्या आठवड्यातही या चित्रपटाने प्रेक्षक खेचले असून भारतातील नेट कमाई १६१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## 'रामायणा'तील दागिन्यांचा रंजक किस्सा

नितेश तिवारी यांच्या 'रामायणम'च्या ट्रेलरनंतर सोशल मीडियावर व्हीएफएक्स, वेशभूषा आणि दागिन्यांवर जोरदार चर्चा सुरू झाली. काहींनी आधुनिक शैलीतील पोशाखांवर टीका केली, तर अनेकांनी लगेच रामानंद सागर यांच्या गाजलेल्या 'रामायण' मालिकेची आठवण काढली. त्यानंतर पुन्हा एकदा या मालिकेच्या पडद्यामागील रंजक किस्स्यांची चर्चा रंगू लागली. विशेष म्हणजे, राम, सीता, लक्ष्मण, रावण यांसारख्या पात्रांची प्रभाव केवळ अभिनयामुळे नव्हे, तर त्या काळासाठी अत्यंत अभ्यासपूर्वक तयार केलेल्या पोशाखांमुळेही निर्माण झाला होता.

'रामायण'मधील दागिन्यांची गोष्ट तर आणखीच रंजक आहे. उपलब्ध माहितीनुसार, प्रसिद्ध कला दिग्दर्शक हीराभाई पटेल यांनी हे दागिने तयार करण्याची जबाबदारी सांभाळली होती. दागिना बनवण्यापूर्वी ते संबंधित पात्राचा अभ्यास करत, त्यानंतर कागदावर हाताने त्याचे रंगीत रेखाचित्र तयार करत आणि ते रामानंद सागर यांना दाखवत असत. डिझाइनला मंजुरी मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष दागिने तयार केले जात. हा किस्सा हीराभाई पटेल यांचे पुत्र विपिन पटेल यांनी एका मुलाखतीत सांगितला होता. हीराभाई पटेल यांनी केवळ दागिनेच नव्हे, तर लंकेचा राजवाडा,



वेशभूषा आणि दागिने तयार करण्यासाठी त्या काळात अत्यंत बारकाईने काम करण्यात आले होते. विविध मुलाखतींमध्ये आणि उपलब्ध माहितीनुसार, रामानंद सागर प्रत्येक पोशाख आणि प्रत्येक दागिन्याच्या रचनेत स्वतः लक्ष घालत असत. 'मगनलाल ड्रेसवाला' या शंभर वर्षांहून अधिक परंपरा असलेल्या प्रसिद्ध वेशभूषा संस्थेने या मालिकेतील प्रमुख कलाकारांचे पोशाख तयार केले होते. भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक ऐतिहासिक चित्रपट आणि मालिकांसाठी काम केलेल्या या संस्थेने 'रामायण'मधील वेशभूषेतही पारंपरिकतेचा आणि साधेपणाचा सुंदर मिलाफ साधला. त्यामुळे आजही अरुण गोविल यांचा राम, दीपिका चिखलिया यांची सीता किंवा सुनील लहरी यांचा लक्ष्मण यांचे रूप प्रेक्षकांच्या मनात जसेच्या तसे कोरलेले आहे. या मालिकेचा मोठा अशोकवाटिका, अयोध्या आणि इतर अनेक भव्य सेट्सही उभारले होते. त्या काळात आजसारखे आधुनिक संगणकीय तंत्रज्ञान नव्हते, तरीही कल्पकता, हातकौशल्य आणि पारंपरिक कलाकुसरीच्या जोरावर त्यांनी प्रेक्षकांना भुरळ घालणारे दृश्यविश्व उभे केले. विशेष म्हणजे, संपूर्ण 'रामायण' मालिका तुलनेने कमी खर्चात तयार झाली होती.




## 'नेटफिल्क्स'च्या ऑफिसमधून चित्रपट गायब!

हॉलिवूडमध्ये अनेकदा चित्रपटापेक्षा त्यामागच्या घटना अधिक रंगतदार ठरतात आणि यावेळी तर एखाद्या सस्पेन्स थ्रिलरलाही मागे टाकणारा किस्सा समोर आला आहे. ऑस्कर विजेता अभिनेता निकोलस केज याचा अद्याप प्रदर्शित न झालेला 'फोर्टिट्यूड' हा चित्रपट अचानक चर्चेचा विषय ठरला. पण त्यामागे कारण होते त्याची कथानक नव्हे, तर त्याची मास्टर कॉपी. चित्रपटाचे निर्माते सायमन अफ्राम यांनी कॅलिफोर्नियातील न्यायालयात नेटफ्लिक्सविरोधात तब्बल १०५ दशलक्ष डॉलर्स, म्हणजेच सुमारे एक हजार कोटी रुपयांहून अधिक नुकसानभरपाईचा दावा दाखल केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार, दुसऱ्या महायुद्धावर आधारित या चित्रपटाची एन्क्रिप्शन नसलेली मास्टर कॉपी नेटफ्लिक्सकडे संभाव्य वितरणासाठी पाठवण्यात आली होती. त्यानंतर अवघ्या नऊ दिवसांनी कंपनीकडून आलेल्या ई-मेलमध्ये कार्यालयातील काही हार्ड ड्राइव्ह चोरीला गेल्याची माहिती देण्यात आली. त्या चोरी झालेल्या ड्राइव्हमध्ये 'फोर्टिट्यूड'ची मास्टर कॉपीही असल्याचे नमूद करण्यात आले. तब्बल सात वर्षांच्या मेहनतीनंतर तयार झालेल्या आणि ४५ दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त खर्च झालेल्या चित्रपटाबाबत अशी बातमी समोर येताच हॉलिवूडमध्ये एकच खळबळ उडाली. रिलीजपूर्वीच चित्रपटाच्या सर्वात मौल्यवान प्रतीचा ठावठिकाणा नसल्याने हा प्रकार एखाद्या चित्रपटातील रहस्यकथेप्रमाणेच वाटू लागला.

या वादाला आणखी गंभीर बनवणारी गोष्ट म्हणजे निर्मात्यांनी मांडलेला आर्थिक मुद्दा. त्यांच्या मते, एखाद्या चित्रपटाची मास्टर कॉपी हरवली किंवा चुकीच्या हातात गेली, तर तो चित्रपट कधीही पायरसीच्या जाळ्यात अडकू शकतो. अशा परिस्थितीत कोणताही वितरक कोट्यवधी डॉलर्स मोजून चित्रपट विकत घेण्यास धजावणार नाही. कारण चित्रपट अधिकृत प्रदर्शनापूर्वीच इंटरनेटवर मोफत उपलब्ध होण्याचा धोका कायम राहतो. त्यामुळे चित्रपटाचे व्यावसायिक मूल्य जवळपास संपुष्टात येते, असा दावा निर्मात्यांनी न्यायालयात केला आहे. मात्र नेटफ्लिक्सने या सर्व आरोपांना ठाम विरोध केला आहे. कंपनीने स्पष्ट केले की, 'फोर्टिट्यूड'चे वितरण हक्क त्यांच्याकडे नव्हते. तसेच चित्रपटाची प्रत उद्योगातील मानक सुरक्षा पद्धतींशिवाय त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्याचा दावा करत नुकसानाची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर टाकता येणार नाही, असे कंपनीचे म्हणणे आहे.

## रहस्य आणि संशयाचे जाळे

रहस्य, मानसिक गुंतागुंत आणि शेवटच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांना विचार करायला लावणारे चित्रपट आवडत असतील, तर तेलुगू चित्रपट 'राव बहादूर' तुमच्या वॉचलिस्टमध्ये असायलाच हवा. सत्यदेवच्या दमदार अभिनयामुळे आणि दिग्दर्शक वेंकटेश महा यांच्या वेगळ्या कथनशैलीमुळे हा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून चर्चेत आहे. जुलैमध्ये चित्रपटगृहांत प्रदर्शित झाल्यानंतर आता तो नेटफ्लिक्सवर तेलुगूसह हिंदी, तमिळ, मल्याळम आणि कन्नड भाषांमध्ये उपलब्ध झाला आहे. अनेक प्रेक्षकांनी या चित्रपटाला 'कल्ट' दर्जाचा अनुभव म्हटले आहे. विविध प्लॅटफॉर्मवर या चित्रपटाचे भरभरून कौतुक होत असून, त्याला



आयएमडीबीवर सुमारे ८.७ इतके उच्च रेटिंगही मिळाले आहे. हा चित्रपट सुमारे १७० मिनिटांचा असला, तरी त्यातील प्रत्येक टप्प्यावर नवीन रहस्य उलगडत जाते. विशेष म्हणजे ही केवळ सस्पेन्स थ्रिलर नाही, तर डार्क कॉमेडी, कौटुंबिक नाट्य आणि मानसशास्त्रीय संघर्ष यांचेही प्रभावी मिश्रण आहे. त्यामुळे प्रेक्षक एका क्षणी पात्रांवर दया करतात, तर पुढच्याच क्षणी त्यांच्या कृतींमागील कारणांचा शोध घेऊ लागतात. चित्रपटाच्या मध्यवर्ती पात्राचे नाव आहे भुवनम रामप्पा राव बहादूर. तो श्रीमंत, हट्टी, मद्यपी आणि मानसिकदृष्ट्या अस्वस्थ वृद्ध आहे. यकृताच्या कर्करोगामुळे त्याच्याकडे अवघे काही महिने उरल्याचे डॉक्टर सांगतात, पण त्याच्या मनात एकच प्रश्न सतत घोंगावत असतोधाकटा मुलगा कुसुमा खरोखरच आपलाच मुलगा होता का? या एका संशयाने त्याचे संपूर्ण आयुष्य पोखरलेले असते.

## सलमानची दिलदारी

बॉलिवूडमध्ये मानधनाचे कोट्यवधींचे व्यवहार नवे नाहीत, पण एखादा सुपरस्टार स्वतःहून आपल्या फीमध्ये मोठी कपात करतो, अशी चर्चा मात्र क्वचितच ऐकायला मिळते. सध्या अशीच एक बातमी सलमान खानमुळे रंगली आहे. विविध माध्यमांतील वृत्तांनुसार, दिग्दर्शक वामशी पैडीपल्ली यांच्या 'एसव्हीसी ६३' या आगामी ॲक्शनपटासाठी सलमानने आपल्या कथित १२० कोटी रुपयांच्या मानधनाऐवजी सुमारे ७० कोटी रुपये स्वीकारण्याची तयारी दाखवली आहे. म्हणजेच तब्बल ५० कोटी रुपयांची कपात केल्याची चर्चा आहे. मात्र, ही माहिती अद्याप अधिकृतपणे सलमान खान किंवा चित्रपटाच्या निर्मात्यांनी जाहीर केलेली नाही, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. या निर्णयामागे निर्माता रफी काझी यांच्याशी असलेली सलमानची जुनी मैत्री कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. रफी काझी हे या चित्रपटाशी सहनिर्माता म्हणून जोडले गेले असून, त्यांनीच सलमानला या प्रकल्पासाठी तयार केल्याचेही वृत्त आहे. त्यामुळे या चित्रपटाची चर्चा केवळ स्टारकास्ट किंवा कथेमुळे नाही, तर पडद्यामागच्या मैत्रीच्या या कथित किस्स्यामुळेही रंगली आहे.



# घुम : भारतातील सर्वांत उंच रेल्वे स्टेशन

भारतीय रेल्वे ही देशाच्या वाहतूक व्यवस्थेचा कणा मानली जाते. दररोज लाखो प्रवासी रेल्वेच्या माध्यमातून देशाच्या कानाकोपऱ्यात प्रवास करतात. त्यामुळे भारतीय रेल्वेला देशाची 'जीवनवाहिनी' असेही संबोधले जाते. देशभरात हजारो रेल्वे स्थानके असून प्रत्येक स्थानकाचे स्वतःचे वेगळे वैशिष्ट्य आहे. ओडिशातील बांसपानी हे सर्वांत लहान रेल्वे स्थानक म्हणून ओळखले जाते, तर पश्चिम बंगालमधील हावडा जंक्शन हे सर्वांत मोठ्या आणि सर्वाधिक वर्दळीच्या स्थानकांपैकी एक आहे. मात्र या सर्वांमध्ये विशेष आकर्षण ठरते ते भारतातील सर्वांत उंच रेल्वे स्थानक असलेलेघुम. पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यात वसलेले हे स्थानक समुद्रसपाटीपासून सुमारे२,२५८ मीटर (७,४०७ फूट)उंचीवर आहे. दार्जिलिंग हिमालयन रेल्वे मार्गावरील हे स्थानक केवळ अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना




नाही, तर हिमालयाच्या कुशीत वसलेले एक महत्त्वाचे पर्यटनस्थळही आहे.

घुम स्थानकाचा इतिहासही तितकाच रंजक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कोलकात्याहून दार्जिलिंगपर्यंत पोहोचण्यासाठी तब्बल पाच ते सहा दिवस लागत असत. या समस्येवर उपाय म्हणून १८७९ मध्ये दार्जिलिंग हिमालयन रेल्वेच्या उभारणीला सुरुवात झाली. या रेल्वेमुळे डोंगराळ भागातील प्रवास अधिक सोयीचा झाला आणि दार्जिलिंगचा देशाच्या इतर भागांशी संपर्क अधिक मजबूत झाला. आजही न्यू जलपाईगुडी ते दार्जिलिंगदरम्यान धावणारी प्रसिद्ध 'टॉय ट्रेन' घुम स्थानकातून प्रवास करते. अरुंद रेल्वेमार्ग, तीव्र वळणे, उंच चढ आणि निसर्गरम्य पर्वतरांगा यांमधून होणारा हा

**माहीत असावे**

प्रवास पर्यटकांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरतो. युनेस्कोच्या जागतिक वारसा दर्जा प्राप्त दार्जिलिंग हिमालयन रेल्वेचा हा मार्ग भारतीय रेल्वेच्या ऐतिहासिक आणि तांत्रिक वैभवाची साक्ष देतो.

# झाडाच्या जतनासाठी...

सध्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होताना दिसते. झाडं तोडल्यामुळे पृथ्वीवरचं तापमान वाढत चाललं आहे. प्रदूषणाचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना मास्क घालून फिरावं लागत आहे. घरांमध्ये हवा शुद्धिकरण यंत्रं बसवली जात आहेत. मात्र झाडं हा वातावरण शुद्ध करणारा नैसर्गिक स्रोत आहे. म्हणूनच काही देशांमध्ये हा हरित ठेवा टिकवून ठेवला जातो. इंग्लंडमधल्या लिव्हरपूलमध्ये एक हजार वर्षांपूर्वीचं ओकचं झाड आहे. हे झाड जपून ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. हा ओक वृक्ष अजून बरीच वर्षं जगावा यासाठी निधी गोळा करण्यात आला आहे. या झाडावर बरेच पैसे खर्च होत आहेत.

युरोपमध्ये अनोख्या स्पर्धेचं आयोजन केलं जात आहे. या स्पर्धेत झाडं सहभागी होतात. यापैकी एका झाडाला 'ट्री ऑफ द ईयर' हा पुरस्कार दिला जातो. २०२० मध्ये होणाऱ्या 'युरोपियन ट्री ऑफ द ईयर' स्पर्धेत हे ओकचं झाड सहभागी झालं होतं. 'ट्री ऑफ द ईयर' ठरण्यासाठी या झाडाला बरीच मतं मिळणं गरजेचं आहे. ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या



**जागरूक व्हा**

झाडांना या स्पर्धेत सहभागी करून घेतलं जातं. लिव्हरपूलमधला हा ओक वृक्ष ऐतिहासिक ठेवा आहे. म्हणूनच त्याचं जतन करण्यासाठी इथलं प्रशासन बरीच मेहनत करत आहे.

# रवंथ करणारा शाकाहारी पक्षी

पृथ्वीवरील पक्ष्यांच्या जगात अनेक विलक्षण प्रजाती आढळतात; परंतु त्यांपैकी 'होटझिन'हा पक्षी सर्वांत आगळावेगळा मानला जातो. दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन खोऱ्यात आढळणारा हा पक्षी पाहिल्यावर एखाद्या प्रागैतिहासिक काळातील डायनासोरचीच आठवण येते. डोक्यावरचा तुरा, निळसर चेहरा, लाल डोळे आणि विस्कटलेल्या पिसांमुळे त्याचा देखावा अतिशय राकट आणि धाकदायक वाटतो. त्यामुळे प्रथमदर्शनी हा एखादा हिंस्र, मांसाहारी पक्षी असावा, असा समज होणे स्वाभाविक आहे. मात्र प्रत्यक्षात होटझिनचा स्वभाव आणि आहार त्याच्या बाह्यरूपाच्या अगदी विरुद्ध आहे. निसर्गाने त्याला दिलेले वैशिष्ट्य इतके वेगळे आहे की, तो पक्षीजगतामधील एक अद्भुत अपवाद म्हणून ओळखला जातो.



**अजब-गजब**

होटझिनचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो जगातीलएकमेव 'रमिनेटिंग' पक्षीआहे. म्हणजेच गाय, म्हैस किंवा हरिण यांसारख्या रवंथ करणाऱ्या प्राण्यांप्रमाणे हा पक्षीही प्रथम अन्न गिळतो आणि नंतर ते पुन्हा तोंडात आणून चावतो. पक्ष्यांमध्ये अशी पचनप्रक्रिया आढळत नसल्याने होटझिनचे स्थान अत्यंत वेगळे ठरते. त्याची पचनसंस्था इतर पक्ष्यांपेक्षा भिन्न असून पोटातील सूक्ष्मजीवांच्या साहाय्याने तो पाने आणि वनस्पतींचे अन्न पचवतो. त्यामुळे तो पूर्णपणेशाकाहारीआहे. क्वचितच एखादा छोटा कीटक त्याच्या आहारात असला, तरी त्याचा मुख्य आहार झाडांची पाने, कोवळे कोंब आणि वनस्पतींचे भाग हाच असतो. बाह्यरूपाने भयंकर वाटणारा हा पक्षी प्रत्यक्षात अत्यंत शांत आणि निरुपद्रवी आहे.

होटझिन हा निसर्गाच्या उत्क्रांतीतील एक जिवंत चमत्कार मानला जातो. त्याच्या रूपामुळे अनेकदा त्याची तुलना डायनासोरशी केली जाते, तर त्याच्या रवंथ करण्याच्या सवयीमुळे तो पक्षीजगतातील सर्वांत वेगळ्या प्रजातींपैकी एक ठरतो. बाह्यरूपावरून एखाद्या सजीवाचा स्वभाव किंवा जीवनशैली ठरवता येत नाही, याचे होटझिन हे उत्तम उदाहरण आहे. भयावह दिसणारा हा पक्षी प्रत्यक्षात वनस्पतींवर जगणारा, पर्यावरणातील जैवविविधतेचा महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच वैज्ञानिकांसाठी तो संशोधनाचा विषय ठरला असून, सामान्य निसर्गप्रेमींसाठी तो आश्चर्याचा आणि कुतूहलाचा विषय आहे. निसर्गात अजूनही अनेक अशा विलक्षण प्रजाती दडलेल्या आहेत, ज्या आपल्याला उत्क्रांतीचे अनोखे पैलू आणि जैवविविधतेचे अद्भुत वैभव समजून घेण्याची संधी देतात.

# असा आहे पृथ्वीचा शेजारी

आपल्या सूर्यमालेतला लाल रंगाचा ग्रह म्हणजे मंगळ. या मंगळाबद्दल पृथ्वीवासीयांना प्रचंड कुतूहल आहे. मंगळावर जीवसृष्टी आहे का, याचा शोध लावला जात आहे. भारताच्या इस्रो या अंतराळ संशोधन संस्थेसह अमेरिकेची नासा ही संस्थाही मंगळाच्या पृष्ठभागाचा अभ्यास करत आहे. तुम्हा लहानग्यांचा बालदिन असतो. त्याचप्रमाणे मंगळाचाही खास दिवस आहे. या दिवसाला 'रेड प्लॅनेट डे' असं म्हटलं जातं. २८ नोव्हेंबर हा दिवस 'रेड प्लॅनेट डे' म्हणून पाळला जातो. २८ नोव्हेंबर १९६४ या दिवशी मॅरिनर नावाचं अंतराळयान आकाशात झेपावलं. याच कारणामुळे २८ नोव्हेंबर हा दिवस रेड प्लॅनेट डे म्हणून साजरा होऊ लागला. मंगळाचा पृष्ठभाग खडकाळ आहे. लाल रंगामुळे मंगळाला रेड प्लॅनेट म्हटलं जातं. 'रेड प्लॅनेट डे'ला तुम्ही बरंच काही करू शकता. रात्री

**जाणून घ्या**

**वीणा देशमुख**

निरभ्र आकाशाकडे डोळे लावून बसा. तुम्हाला लाल रंगाचा हा ग्रह म्हणजे मंगळ दिसेल. हे शक्य नसेल तर मंगळाबाबत माहिती मिळवा. अंतराळाची माहिती देणारी पुस्तकं वाचा. इंटरनेटवरही तुम्हाला भरपूर माहिती मिळू शकते. मंगळ हा सूर्यमालेतला चौथ्या क्रमांकाचा ग्रह. म्हणजेच पृथ्वीचा शेजारी आहे. त्यामुळे मंगळावर जीवसृष्टी असेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# 'डेक्कन क्वीन'चा अपमान!

महाराष्ट्राच्या रेल्वे इतिहासात१ जून १९३०हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. याच दिवशी मुंबई आणि पुणे यांना जोडणारीडेक्कन क्वीनही आलिशान आणि वेगवान रेल्वेगाडी प्रथमच धावली. त्या काळी ही गाडी आधुनिकतेचे, वक्तशीरपणाचे आणि रेल्वेच्या प्रतिष्ठेचे प्रतीक मानली जात होती. प्रवाशांमध्ये तिची लोकप्रियता इतकी होती की, डेक्कन क्वीनने प्रवास करणे हीच एक प्रतिष्ठेची बाब समजली जाई. पण या मानाच्या गाडीच्या आयुष्यात एक असा प्रसंग आला, ज्याची चर्चा आजही रेल्वेप्रेमी आवर्जून करतात. हा प्रसंग घडला सन १९३६मध्ये. त्या वेळी ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेने कल्याण नगरपालिकेचा काही कर भरलेला नव्हता. न्यायालयाच्या आदेशानंतर नगरपालिकेने थेट डेक्कन क्वीनचे

**जाणून घ्या**

इंजिन जप्त केले. प्रवाशांनी भरलेली गाडी कल्याण येथेच थांबली आणि रेल्वे




प्रशासनाची मोठी पंचाईत झाली. अखेर दंड भरल्यानंतर इंजिनाची सुटका झाली आणि गाडी पुन्हा मार्गस्थ झाली. या खटल्यात कल्याण नगरपालिकेच्या बाजूनेडॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी प्रभावीपणे बाजू मांडल्याची ऐतिहासिक नोंद आढळते. त्या काळात देशातील सर्वात प्रतिष्ठित गाडीचे इंजिनच जप्त होणे, ही रेल्वे प्रशासनासाठी मोठी नामुष्की मानली गेली.

या घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने नाराजीपोटी डेक्कन क्वीनला कल्याण स्थानकावर नियमित थांबा न देण्याचा निर्णय घेतल्याची कथा आजही लोकप्रिय आहे. अर्थात, याबाबत अधिकृत रेल्वे नोंदींमध्ये हा निर्णय केवळ त्या घटनेशी जोडलेला असल्याचा ठोस पुरावा उपलब्ध नाही. रेल्वेच्या मते, डेक्कन क्वीनचा सुपरफास्ट दर्जा, कमी प्रवासवेळ आणि वेळापत्रकाचे काटेकोर पालन ही कारणेही तितकीच महत्त्वाची होती. तरीही 'डेक्कन क्वीनचा अपमान'हा किस्सा महाराष्ट्राच्या रेल्वे इतिहासातील सर्वाधिक रंगतदार कथांपैकी एक मानला जातो.

# तमिळनाडूची शान

कोईंबतूरला दक्षिणेचं मँचेस्टर म्हटलं जातं. कोईंबतूर हे तमिळनाडूमधलं तिसऱ्या क्रमांकाचं मोठं शहर आहे. नोय्यल नदीच्या किनारी वसलेलं हे शहर निलगिरी पर्वताच्या पायथ्याशी आहे. इथली स्थानिक देवता कोनियाम्मनच्या नावावरून या शहराला कोईंबतूर हे नाव मिळालं. बंगलोर, पुणे या शहरांप्रमाणेच कोईंबतूर हे आयटी हब बनून गेलं आहे. हे वस्त्रोद्योगाचं मोठं केंद्र आहे. इतकंच नाही तर इथे बरीच इंजिनिअरींग महाविद्यायलं आहेत. त्यामुळे कोईंबतूरला शिक्षणाचं माहेरघर म्हटलं जातं. तमिळनाडूच्या जडणघडणीत कोईंबतूरचा मोठा वाटा आहे. या शहराच्या आसपास बरेच धबधबे आहेत. सिरूवनी हा इथला प्रसिद्ध धबधबा आहे. कोईंबतूरची लोकसंख्या २.४ दशलक्ष इतकी आहे. उटी, कुन्नूर, वालपराईसारखी पर्यटनस्थळं कोईंबतूरपासून हाकेच्या अंतरावर आहेत. त्यामुळे या शहरात पर्यटकांची गर्दी झालेली असते.



**सफर शहरांची**

# बायोकेमिकल इंजिनिअरींगचा विचार करा

इंजिनिअरींगच्या विविध शाखा आहेत. त्यापैकी एक म्हणजे बायोकेमिकल इंजिनिअरींग. केमिकल इंजिनिअरींग, मायक्रोबायोलॉजी आणि बायोकेमिस्ट्रीच्या अभ्यासासाठी इंजिनिअरींगची ही शाखा तयार करण्यात आली आहे. बायोकेमिकल इंजिनिअर्स सेल्स व्हायरस, प्रोटिन्स तसंच इतर बायप्रोडक्टसच्या विकासासाठी, यांच्या विकासात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील असतात. बायोकेमिकल इंजिनिअरींगअंतर्गत तुम्ही बायोकेमिस्ट्री, बायो आंत्रप्रिनरशीप, बायो प्रोसेस,



एन्व्हायर्न्मेंटल स्टडीजसारख्या विविध विषयांचा अभ्यास करू शकता. या शाखेत प्रवेश

**कोण होणार?**

घेण्यासाठी तुम्हाला विविध प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. पदवी मिळवल्यानंतर तुम्ही मास्टर्स तसंच पीएचडीही करू शकता.

बायोकेमिकल इंजिनिअर्स रंग, बायो फ्युअल, अल्कोहोल, स्टेरॉइड्स, एंझाइम्स, बायो फर्टिलायझर्सची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करतात.

# वडा होतो कुरकुरीत

गरम सांभारात बुडवलेला कुरकुरीत वडा... अहाहा! विचार केला तरी तोंडाला पाणी सुटते, नाही का? मुलांनो, हा फक्त एक चविष्ट नाश्ता नाही तर दक्षिण भारताची ओळखही आहे. तुम्हीही या पदार्थाचा असंख्य वेळा आस्वाद घेतला असेल. पण मेदूवड्याच्या मध्यभागी गोल छिद्र का असते हे तुम्हाला माहिती आहे का? मित्रांनो, हे फक्त डिश सुंदर दिसण्यासाठी नाही



**वाचा तर खरं**

**पंकजा देव**

हे प्रथम जाणून घ्या.

वड्याचे पीठ खूप जाड असते. ते छिद्राशिवाय गोल बनवले तर बाहेरील थर लवकर शिजेल आणि कुरकुरीत होईल, परंतु असे केल्यास आतील भाग कच्चा राहतो. तो नीट शिजत नाही. छिद्रामुळे गरम तेल वड्याच्या आतील पृष्ठभागावर सहजपणे पोहोचू शकत असल्यामुळे वडा आतून आणि बाहेरून समान पद्धतीने शिजतो.

वडा तेलात तळला जातो तेव्हा छिद्रांमुळे तो सर्व बाजूंनी कुरकुरीत होतो. आतूनही तेलाच्या संपर्कामुळे वड्याची पोत खूप कुरकुरीत होते. छिद्र नसतील तर वडा बाहेरून कुरकुरीत असला तरी आतून मऊ राहू शकतो. तसेच तळल्यानंतर वडा तेलातून बाहेर काढला जातो. असे करताना छिद्रांमुळे अतिरिक्त तेल सहजपणे बाहेर पडते आणि वडा कमी तेलकट होतो. खाण्यास हलकाही वाटतो. वडा चिकटही होत नाही.

वड्यातील छिद्राचा आणखी एक फायदा म्हणजे तुम्ही सांभार किंवा चटणीमध्ये वडा बुडवता तेव्हा सांभार आणि चटणीची चव छिद्रातून वड्याच्या आत पोहोचते आणि ही डिश अधिक रुचकर लागते.

## दोस्त हे मस्त

### प्लॅटिपस पेरी



प्लॅटिपस पेरी हा अनोखा प्राणी आहे. त्याची चोच बदकासारखी असते. त्याचे पायही विचित्र असतात. हा प्राणी दिसायला खूपच विचित्र असतो. प्लॅटिपस पेरी नर विषारी असतात. हा प्राणी जमिनीसोबतच पाण्यातही रहातो. या प्राण्यांना पोहायला खूप आवडतं. पायांच्या विशिष्ट रचनेमुळे त्यांना पाण्यात पोहणं सोपं होतं. हा प्राणी पाण्यात शिकार करतो. ऑस्ट्रेलियाच्या २० सेंटच्या नाण्यावर प्लॅटिपसचं पेरीचं चित्र आहे.

## खादाडी

### मस्त स्ट्रॉबेरी क्रॅकर

तुम्हाला स्ट्रॉबेरी आवडत असेल. या आंबटगोड फळात भरपूर पोषक घटक असतात. म्हणूनच तुम्ही स्ट्रॉबेरीपासून छान छान पदार्थ बनवू शकता. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स हा पदार्थ खूप मस्त लागेल. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स बनवण्यासाठी दोन स्ट्रॉबेरी, दोन मोठ्या आकाराची बिस्किटं आणि दोन चमचे फ्रेश क्रीम असं साहित्य घ्या. स्ट्रॉबेरीचे तुकडे करा. त्यात फ्रेश क्रीम घाला. आता हे मिश्रण एका बिस्किटावर पसरा. त्यावर दुसरं बिस्किट ठेवा. तुमचं स्ट्रॉबेरी क्रॅकर तयार आहे!



## स्टडी टिप्स

### उद्दिष्ट ठरवा

कोणत्याही उद्दिष्टाशिवाय केलेला अभ्यास लक्षात रहात नाही. त्यामुळे एकाच दिवशी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्यापेक्षा एका विषयाची निवड करून तयारीला लागा. एका विषयाचा किती अभ्यास करायचा हे ठरवा. एक उद्दिष्ट ठरवा. आज दोन धडे पूर्ण करायचे आहेत, असं ठरवून अभ्यासाला लागा. यामुळे हे



## योगा टाईम

### लाभ त्रिकोणासनाचे

योगासनांमुळे ताणतणाव कमी व्हायला मदत होते. त्रिकोणासन हे असंच एक आसन आहे. यामुळे पाठीचा कणा बळकट होतो. विविध दुखणी कमी होतात. त्रिकोणासन केल्याने वजनही कमी होतं. हे आसन थोडं कठीण असलं तरी याचे बरेच लाभ आहेत. त्यामुळे त्रिकोणासन नियमितपणे करायला हवं.



## निवडक



### देव स्पोर्ट्सची ऐतिहासिक कामगिरी

**पाली :** चामुंडी स्टेडियम, म्हैसूर येथे आयोजित ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये देव स्पोर्ट्स अकॅडमी, उलवे व पनवेल येथील खेळाडू मधुश्री रत्नावत व मानव धनावत यांनी प्री यूथ मिश्र जोडी गटात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकावून महाराष्ट्र राज्याला मानाचा बहुमान मिळवून दिला. याशिवाय, देव स्पोर्ट्स अकॅडमीचे इतर खेळाडूही महाराष्ट्र संघाचे सदस्य म्हणून राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाले. त्यामध्ये मेन्स पेअर गटात मितेश धनावत व शारव बेलसरे, युथ ट्रायो गटात मेहक सालेशा, रिद्धी गेल्डा व आयेशा पाटील, तसेच ज्युनिअर वुमेन्स पेअर गटात आरोही भणगे व नंदिका मंडल यांनी महाराष्ट्र संघाकडून राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट सहभाग नोंदवत देव स्पोर्ट्स अकॅडमी व रायगड जिल्ह्याचा गौरव वाढवला. देव स्पोर्ट्स अकॅडमीच्या इतिहासातील हे राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतील पहिले पदक असून, अकॅडमीसाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरला आहे. या यशामागे खेळाडूंचे अथक परिश्रम, पालकांचे मोलाचे सहकार्य तसेच देव स्पोर्ट्स अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक अविनाश मोरे आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक व पंच ज्योती मोरे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, नियोजन आणि मेहनत यांचा मोठा वाटा आहे.

### गंभीरची टीम इंडियाला थेट वॉर्निंग

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघ १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी श्रीलंकेत आहे. त्याआधी, भारत ७ ऑगस्टपासून एक सराव सामना खेळणार आहे. भारतीय संघ सध्या ५ ऑगस्टपासून कोलंबोमध्ये सराव करत आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने टीम इंडियाला आगामी मालिकेबद्दल सावध केले आणि श्रीलंकेने दिलेल्या आव्हानाला कसे सामोरे जायचे हे समजावून सांगितले. गंभीरने टीम इंडियामध्ये सामील झालेल्या तीन नवीन खेळाडूंचे स्वागतही केले. वेगवान गोलंदाज आकिब नबी आणि फिरकी गोलंदाज सारांश जैन पहिल्यांदाच भारतीय कसोटी संघात सामील होत आहेत. जसप्रीत बुमराहच्या दुखापतीमुळे नबीचा भारतीय संघात समावेश करण्यात आला, तर वॉशिंग्टन सुंदरच्या दुखापतीमुळे सारांशला संधी मिळाली. आता मालिकेपूर्वी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी संघाला एक वॉर्निंग दिली आहे. सुभदीप घोष श्रीलंका दौऱ्यापासून टीम इंडियासोबत क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून आपल्या कामाला सुरुवात करत आहेत. यांनी टी. दिलीप यांची जागा घेतली, ज्यांचा कार्यकाळ इंग्लंड दौऱ्यासोबत संपला होता. टीम इंडियाच्या सरावापूर्वी गंभीरने नबी, सारांश आणि सुभदीप यांचे स्वागत केले.

### शाकिबच्या घरावर पेट्रोल बॉम्ब

**नवी दिल्ली :** बांगलादेश राष्ट्रीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि अवामी लीगचा माजी खासदार शाकिब अल हसन याच्या घरावर अज्ञातांनी पेट्रोल बॉम्बने हल्ला केला. बुधवारी रात्री ८:४५ वाजण्याच्या सुमारास केशबमोर भागातील त्याच्या निवासस्थानी ही घटना घडली. अज्ञातांनी घराच्या मुख्य दरवाजावर आणि खिडक्यांवर तुफान दगडफेक करत तोडफोड केली व परिसरात आग लावण्याचा प्रयत्न केला.नवी दिल्लीतील फॉरेन कॉरस्पॉन्डेंट्स क्लब ऑफ साऊथ एशियाद्वारे आयोजित पत्रकार परिषदेत शाकिबने श्रीलंकेतून थेट ऑनलाईन सहभागी होत शेख हसीना यांना पाठिंबा दर्शवला होता. हा कार्यक्रम पार पडल्यानंतर काही तासांतच बांगलादेशात शाकिबच्या घरावर हा हल्ला करण्यात आला. स्थानिक माध्यमांच्या माहितीनुसार, अज्ञात टोळक्याने शाकिबच्या मागुरा येथील घराला लक्ष्य केले. आधी त्यांनी घराच्या खिडक्यांच्या काचा फोडल्या. त्यानंतर लोखंडी दरवाजाच्या वरच्या भागावर पेट्रोल ओतून आग लावली. सुदैवाने, आजूबाजूच्या नागरिकांनी तातडीने धाव घेत ही आग आटोक्यात आणली. घटनेच्या वेळी घरात कोणीही उपस्थित नव्हते. या घटनेमुळे मागुरा शहरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

### बटलरच्या टी-२० सर्वाधिक धावा

**नवी दिल्ली :** इंग्लंडचा यष्टीरक्षक-फलंदाज जोस बटलरने टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार किरॉन पोलार्डला मागे टाकले आहे. त्याच्या ५२२ टी-२० सामन्यांमध्ये १४,८३३ धावा झाल्या आहेत, तर पोलार्डच्या ७४६ सामन्यांमध्ये १४,८०३ धावा आहेत.बटलरने द हंड्रेड लीगमध्ये मँचेस्टर सुपर जायंट्सकडून खेळताना वेल्श फायरविरुद्ध २० चेंडूंमध्ये ५१ धावांची खेळी करून ही कामगिरी केली. सामन्यानंतर स्काय स्पोर्ट्सशी बोलताना, ३४ वर्षीय बटलर म्हणाला, टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनणे एक अद्भुत भावना आहे. पण एक दिवस कोणीतरी हा विक्रम नक्कीच मोडेल. मला वाटते की तो खेळाडू कदाचित भारताचा वैभव सूर्यवंशी असू शकतो.बटलर आणि वैभव राजस्थान रॉयल्समध्ये एकत्र खेळले आहेत.

# टीम इंडियाला दुखापतींचं ग्रहण

## जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्यासह ६ प्रमुख खेळाडू अनफीट!



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका दौऱ्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाला दुखापतींचा मोठा फटका बसला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील महत्त्वाच्या सामन्यांच्या तयारीला वेग आला असतानाच संघातील अनेक प्रमुख खेळाडू दुखापतींमुळे फिटनेसच्या समस्यांना सामोरे जात आहेत.

भारतीय संघाला सर्वात मोठा धक्का वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या दुखापतीमुळे बसला आहे. इंग्लंड दौऱ्यात त्याच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली असून, त्यामुळे तो श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून बाहेर पडला आहे. याच दुखापतीमुळे तो लॉर्ड्स येथे झालेल्या अखेरच्या वनडे सामन्यातही खेळू शकला नव्हता. बीसीसीआयने त्याच्या दुखापतीची पुष्टी करत जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीचा संघात समावेश केला आहे.

अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरही सध्या फिटनेसच्या समस्येशी झुंज देत आहे. इंग्लंडविरुद्ध कार्डिफ येथे झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात त्याच्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाली. फलंदाजी करताना त्रास जाणवल्यानंतर त्याला मैदान सोडावे लागले. त्यानंतर बीसीसीआयने स्पष्ट केले की, तो श्रीलंका दौऱ्यातील पहिल्या कसोटीसाठी उपलब्ध असणार नाही.

युवा अष्टपैलू नीतीश कुमार रेड्डीही दुखापतीमुळे श्रीलंका दौऱ्याला मुकला आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या पहिल्या वनडेदरम्यान त्याच्या डाव्या पायाच्या क्वाड्रिसेप्स स्नायूला दुखापत झाली होती. त्यामुळे त्याला दुसऱ्या सामन्यात विश्रांती देण्यात आली. मात्र, चेन्नईतील तिसऱ्या वनडेदरम्यान ही दुखापत अधिक गंभीर झाली आणि त्याला संघाबाहेर जावे लागले.

वेगवान गोलंदाज हर्षित राणाच्या पुनरागमनाला पुन्हा एकदा दुखापतीने ब्रेक लावला आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्याला टी-२० विश्वचषक आणि आयपीएल स्पर्धेला मुकावे लागले होते. आयर्लंड दौऱ्यात त्याने पुनरागमन केले, पण इंग्लंडविरुद्ध ट्रेंट ब्रिज येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात त्याच्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाली.

स्टार फिरकीपटू वरुण चक्रवर्तीची दुखापतीची मालिका अद्याप कायम आहे. आयपीएलदरम्यान त्याच्या डाव्या पायाला हेअरलाइन फ्रॅक्चर झाले होते. त्या दुखापतीतून सावरल्यानंतर त्याने मैदानात पुनरागमन केले, मात्र इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात त्याच्या हॅमस्ट्रिंगला पुन्हा दुखापत झाली. त्यामुळे त्याच्या फिटनेसबाबत पुन्हा चिंता निर्माण झाली आहे.

स्टार अष्टपैलू हार्दिक पांड्या आयपीएल २०२६ नंतर सतत दुखापतींमुळे मैदानापासून दूर आहे.

या हंगामात त्याने मुंबई इंडियन्ससाठी १४ पैकी केवळ १० सामने खेळले. पाठीच्या स्नायूंमध्ये आलेला ताण आणि त्यानंतर क्वाड्रिसेप्सच्या दुखापतीमुळे तो इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेतही खेळू शकला नाही. सध्या तो पुनर्वसन प्रक्रियेत असून, त्याच्या पुनरागमनाची भारतीय संघाला प्रतीक्षा आहे.

## हर्षित राणाला मिळाली खास सूट?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



हर्षित इंग्लंड दौऱ्यादरम्यान दुखापतीमुळे संघाबाहेर बाहेर पडला. परंतु, आता असा दावा केला जात आहे की, हर्षित गंभीर दुखापतीमुळे नाही, तर खराब फिटनेस आणि स्नायूंच्या क्रॅम्प्स येण्याच्या समस्येमुळे मैदानाबाहेर गेला होता. ही बाब समोर आल्यानंतर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळात नाराजी असल्याचेही वृत्त समोर आले आहे.

दुखापतीमुळे हर्षितला २०२६ च्या टी-२० विश्वचषकातून बाहेर पडावे लागले होते. त्यानंतर त्याने बंगळुरू येथील ङ्गसेंटर ऑफ एक्सलन्सफ्मध्ये दीर्घकाळ चाललेल्या पुनर्वसन प्रक्रियेत सहभाग घेतला आणि फिटनेस चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतर इंग्लंड दौऱ्यासाठीच्या भारतीय संघात स्थान मिळवले. मात्र, तिसऱ्या टी-२० सामन्यानंतर गोलंदाजी करताना त्याला अस्वस्थ वाटू लागले आणि त्याला मैदान सोडावे लागले. सुरुवातीला जुनी दुखापत पुन्हा उद्भवली असावी असे वाटले होते, परंतु आता समोर आलेल्या वृत्तांनी संपूर्ण परिस्थितीच बदलून टाकली आहे. गोलंदाजी करताना हर्षितला वारंवार क्रॅम्प्स येत होते. याचे कारण त्याचे अतिरिक्त वजन असल्याचे मानले जाते. त्याचे वजन सुमारे ९७ किलो होते, तर फिटनेसच्या निर्धारित निकषांनुसार ते ९६ किलोपेक्षा कमी असणे आवश्यक होते. असे असूनही, त्याला फिट घोषित करून संघासोबत पाठवण्यात आले. संघ व्यवस्थापनाला हर्षित राणाचा संघात समावेश करायचा होता आणि म्हणूनच त्याला तंदुरुस्तीबाबतची मंजुरी देण्यात आली होती. मात्र, या दाव्याबाबत बीसीसीआय किंवा सेंटर ऑफ एक्सलन्सने कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही.

- **संघात खेळवण्यासाठी मॅनेजमेंटचा निर्णय**
- **फिटनेस प्रकरणामुळे बीसीसीआय नाराज**

## यश धूलची आक्रमक शतकी खेळी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारताला अंडर-१९ वर्ल्डकप जिंकवून देणारा माजी कर्णधार यश धुलने दिल्ली प्रीमियर लीगमध्ये शानदार खेळी केली आहे. त्याने आपल्या बॅटचा तडाखा दिला आहे.

अरुण जेटली स्टेडियमवर सेंट्रल दिल्लीचा कर्णधार यश धूलने जुनी दिल्ली या संघाविरुद्ध ४७ बॉलमध्ये आक्रमक खेळी केली आहे. त्याने शानदार शतकी खेळी केली आहे.

अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली प्रीमियर लीग स्पर्धा सुरू आहे. इथे खेळल्या गेलेल्या कर्णधार यश धुलने ४७ बॉलमध्ये १०० रन्सची आक्रमक आणि तूफान खेळी केली आहे. त्याच्या या आक्रमक खेळीमुळे सेंट्रल दिल्ली किंग्सने १४ व्या ओव्हरमध्ये सामना जिंकून दणदणीत विजय मिळवला आहे.

पावसामुळे हा सामना प्रत्येकी १५-१५ ओव्हर्सचा खेळवण्यात आला आहे. सध्या दिल्ली प्रीमियर लीगचे सामने खेळवले जात आहेत.

## इरा गुजर जर्मनीत फडकवणार भारताचा तिरंगा!

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोह्यातील सुप्रसिद्ध व्यापारी स्वर्गीय रमेशभाई गुजर यांची नात तसेच प्रशांत रमेश गुजर यांची कन्या इरा गुजर हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर रोह्याचे नाव अभिमानाने उंचावणारे यश मिळवले आहे. जर्मनीमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित फॉर्म्युला स्टुडंट जर्मनी-२०२६ या आंतरराष्ट्रीय अभियांत्रिकी व डिझाईन स्पर्धेसाठी तिची निवड झाली असून, ती भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.



सध्या इरा मुंबईतील सोमय्या कॉलेजमध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग या शाखेत शिक्षण घेत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि अभियांत्रिकी कौशल्य यांचा संगम असलेल्या या जागतिक स्पर्धेत ती आपल्या टीमसोबत फॉर्म्युला रेसिंग कारची संकल्पना, डिझाईन, निर्मिती आणि प्रत्यक्ष ट्रॅकवरील कार्यक्षमता सादर करणार आहे.

फॉर्म्युला स्टुडंट जर्मनी ही जगातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या विद्यार्थी अभियांत्रिकी स्पर्धांपैकी एक मानली जाते. या स्पर्धेत जगभरातील नामांकित विद्यापीठे आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी होत असतात. वाहन अभियांत्रिकी, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, संशोधन, टीमवर्क आणि व्यवस्थापन कौशल्याची कसोटी पाहणाऱ्या या स्पर्धेत निवड होणे हेच मोठे यश मानले जाते.

या स्पर्धेसाठी सहभागी होण्यासाठी इरा गुजर जर्मनीकडे रवाना होत आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे गुजर कुटुंबीयांसह संपूर्ण रोहा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. इराच्या या यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जर्मनीतील स्पर्धेत इरा आणि तिची टीम उत्कृष्ट कामगिरी करून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## हॉकी वर्ल्डकपमध्ये भारत-पाकिस्तान १९ ऑगस्टला भिडणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



येत्या १५ ते ३० ऑगस्ट दरम्यान दरलँड्स आणि बेल्जियम येथे पुरुष हॉकी वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा होणार आहे. यामध्ये भारत अन् पाकिस्तान भिडणार आहेत.

अबू बकर मेहमूद पाकिस्तानच्या हॉकी संघाचे कर्णधारपद भूषविणार आहे. पाकिस्तानने २० सदस्यांची अधिकृत घोषणा केली आहे.

दीर्घ प्रतीक्षेनंतर जागतिक हॉकीच्या या सर्वात मोठ्या व्यासपीठावर स्थान मिळवल्यानंतर पाकिस्तानचा संघ पूर्ण ताकदीनिशी उतरण्यासाठी सज्ज झाला आहे. हॉकी वर्ल्ड कप २०२६ मध्ये जगभरातील चाहत्यांचे लक्ष लागलेल्या भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमधील महामुकाबला १९ ऑगस्ट रोजी रंगणार आहे.

१८ ऑगस्टला भारत अन् पाकिस्तान भिडणार आहेत. दोन्ही संघांचा समावेश पूल डी मध्ये करण्यात आला असून यामध्ये इंग्लंड आणि वेल्स यांसारख्या बलाढ्य संघांचाही समावेश आहे.

## तन्वी शर्मा कोरिया मास्टर्सच्या क्वार्टर फायनलमध्ये

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



भारताची १७ वर्षीय बॅडमिंटनपटू तन्वी शर्माचा उत्कृष्ट फॉर्म कायम आहे. गेल्या आठवड्यात तायपे ओपन सुपर-३०० चे विजेतेपद पटकावून इतिहास रचणाऱ्या तन्वीने आता कोरिया मास्टर्सच्या महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले आहे.

सहजपणे खेळल्या गेलेल्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये तिने आपल्याच देशाच्या श्रेयांशी वालिशेट्टीला २१-१६, १७-२१, २१-१३ असे हरवले.

निर्णायक गेममध्ये तन्वीने पूर्णपणे वर्चस्व गाजवले. तिने सुरुवातीपासून आघाडी घेतली आणि श्रेयांशीला परत येण्याची संधी दिली नाही.

वर्ल्ड ॲथलेटिक्स २० चॅम्पियनशिप

## ३ भारतीय अंतिम फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेतील यूजीन येथे सुरू असलेल्या वर्ल्ड ॲथलेटिक्स २० चॅम्पियनशिपच्या पहिल्या दिवशी भारताच्या तीन खेळाडूंनी आपापल्या इव्हेंटच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले. पुरुषांच्या भालाफेकीमध्ये आशिष यादव आणि टी धरणीधरन यांनी पात्रता मिळवली, तर महिलांच्या डिस्कस थ्रोमध्ये अमानत कंबोजने हंगामातील सर्वोत्तम कामगिरी करत अंतिम फेरीचे तिकीट मिळवले.

आशिष यादवने पुरुषांच्या भालाफेकीच्या गट-अ पात्रता फेरीत ६९.८७ मीटरचा थ्रो करून पहिले स्थान पटकावले. मात्र, एकूण क्रमवारीत तो दक्षिण आफ्रिकेच्या जन-हेन्ड्रिक हेमन्स नंतर दुसऱ्या स्थानावर राहिला. आशिषची कारकीर्द आणि हंगामातील सर्वोत्तम कामगिरी ७४.४९ मीटर आहे. या इव्हेंटमध्ये स्वयंचलित पात्रता गुण ७२.५० मीटर होता, जो केवळ हेमन्सच पार करू शकला.भारताचा दुसरा भालाफेकपटू टी धरणीधरनने ६८.०७ मीटरच्या थ्रोसह गट-ब मध्ये पाचवे स्थान मिळवले. एकूण तो १२व्या आणि अंतिम पात्रता स्थानावर राहून अंतिम फेरीत पोहोचला.भालाफेकीचा अंतिम सामना शुक्रवारी होईल. या स्पर्धेचा २० जागतिक विक्रम भारताच्या नीरज चोप्राच्या नावावर आहे. त्याने २०१६ मध्ये ८६.४८ मीटरचा थ्रो केला होता.

महिलांच्या थाळीफेकीत अमानत कंबोजने ग्रुप-ए मध्ये ५२.५८ मीटरचा थ्रो केला, जी या हंगामातील तिची सर्वोत्तम कामगिरी आहे. ती ग्रुपमध्ये सहाव्या आणि एकूण १२व्या स्थानावर राहिली. यासह तिने अंतिम पात्रता स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.चीनची सू यिशिन ५८.०६ मीटरच्या थ्रोसह पात्रतेत अव्वल स्थानी राहिली. या स्पर्धेचा स्वयंचलित पात्रता गुण ५५ मीटर होता.

पुरुषांच्या ८०० मीटर शर्यतीत मोगाली वेंकटरामने हीट-५ मध्ये १ मिनिट ५२.८१ सेकंदांची वेळ नोंदवून तिसरे स्थान पटकावले आणि उपांत्य फेरीत पोहोचला.तर, उविन आनंद हीट-१ मध्ये १ मिनिट ५२.३७ सेकंदांची वेळ नोंदवूनही सातव्या आणि एकूण ३०व्या स्थानावर राहिल्याने बाहेर पडला. युगांडाचा शफेक मुरुंगी १ मिनिट ४६.६४ सेकंदांच्या वेळेसह पहिल्या फेरीत सर्वात वेगवान ठरला.

पीयूष राज, तहुरा खातून, सय्यद सबीर आणि थिया अरुमुगम यांचा भारतीय संघ ३ मिनिटे २२.८५ सेकंदांच्या वेळेसह त्यांच्या हीटमध्ये चौथ्या स्थानावर राहिला.

३ ते ५ हजार धावपटू सहभागी होणार | फिटनेसद्वारे स्वातंत्र्य हा या मॅरेथॉनचा हेतू

## १५ ऑगस्टला पुण्यात ऐटेनेक्स् इंडिपेंडन्स् डे रन

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

ऐटेनेक्स् तर्फे पुणे शहरामध्ये सलग चौथ्या ऐटेनेक्स् इंडिपेंडन्स् डे रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही मॅरॅथॉन शनिवारी, १५ ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून, या मॅरॅथॉनमध्ये पुण्यातील नामांकित क्रीडा व्यक्तिमत्वांसह सुमारे ३ ते ५ हजार धावपटू सहभागी होणार आहेत.



भारतातील आघाडीचे उद्योजक आणि चार वेळा जागतिक विजेतेपद पटकावणारे आदित्य गणेशवाडे यांनी याबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनी होणारी मॅरॅथॉन ही पुण्यातील सामुदायिक धावण्याची चळवळ म्हणून ओळखली जाईल. या स्पर्धेत सुमारे ३ ते ५ हजार स्पर्धक सहभागी होतील, असा विश्वास आम्हाला आहे. यामध्ये हौशी तरूण, कॉर्पोरेट क्षेत्रातील संघ, कुटूंबे आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्व वयोगटांतील स्पर्धक सहभागी होतील.

या स्पर्धेत ३ किमी, ५ किमी, १० किमी आणि २१ किमी असे चार गट असणार आहेत. या स्पर्धेची सुरूवात कोथरूड-कर्वेनगर येथील गांधी लॉन्स् येथून पहाटे ४ वाजता होणार आहे. आदित्य गणेशवाडे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या धावण्याच्या स्पर्धेत उच्च दर्जाची क्रीडा कौशल्ये आणि उद्योजकीय नेतृत्वाचा संगम पाहायला मिळणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी भारतीय क्रिकेटपटू ऋतुराज गायकवाड, अव्वल महिला टेनिसपटू ऋतुजा भोसले, अर्जुन पुरस्कार प्राप्त कबट्टीपटू शांताराम जाधव, आशियायी पदकविजेता स्केटर सिध्दांत कांबळे आदि मान्यवर एकत्र येणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन आणि फ्लॅग ऑफ पुण्याचे लोकप्रतिनिधी आणि नगरसेवक यांच्यासह पुण्यातील अनेक आंतरराष्ट्रीय व ऑलिम्पिक पदकविजेते, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील दिग्गज यावेळी उपस्थित राहणार आहेत.

माजी भारतीय महिला कर्णधार वाहबिझ बरूचा, माजी पोलिस सहआयुक्त राजेंद्र भामरे, नगरसेवक निलेश कोंढाळकर, गोखले ग्रुपचे अध्यक्ष विशाल गोखले, अर्चित गोखले, भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर, स्केटर आर्य जुवेकर, बॅडमिंटनपटू पुर्वा बर्वे, महाराष्ट्राचे क्रिकेटपटू राजवर्धन हंगरगेकर आणि दिव्यांग हिंगणेकर, क्षितीज दाते हे प्रमुख पाहूणे उपस्थित राहणार आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)